


# जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय





✦ अमरावती, बुधवार १४ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## गंगा नदीत बोट उलटली
# १५ मुलांचा मृत्यू



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** वैशालीच्या राघोपूरमध्ये गंगा नदीत बोट उलटली. या दुर्घटनेत १५ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्व मृतांचे वय १० ते १८ वर्षांदरम्यान असल्याचे सांगितले जात आहे.छोट्या नावेतून सुमारे २० जण मेजवानीला जात होते, त्याच वेळी ही दुर्घटना घडली. मृतांमध्ये पिंकी कुमारी (१३), अंकिता कुमारी (६), सुनीता कुमारी, आर्यन कुमार, अलीशा कुमारी (१८), सिकी कुमारी, भोणू कुमारी आणि मीरा कुमारी यांचा समावेश आहे. उर्वरित मृतदेहांची ओळख पटवली जात आहे. बिहारमधील वैशाली जिल्ह्यात, राघोपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रामपूर श्यामचंद गावाजवळ एक बोट उलटल्याने ११ जणांचा मृत्यू झाल्याची मोठी दुर्घटना घडलीय. हाती आलेल्या माहितीनुसार या बोटीतून २० जण एका मेजवानीच्या कार्यक्रमासाठी जात होते. बोट नदीतून दुसऱ्या किनाऱ्याकडे जात असताना बोटीवरील नियंत्रण सुटले आणि ती उलटली, ज्यामुळे त्यातील लोक बुडाले.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी एका मेजवानीच्या कार्यक्रमासाठी काही तरूण बोटीतून प्रवास करत होती. बोट नदीच्या मध्यभागी पोहोचली असता खलाशाचं बोटीवरील नियंत्रण सुटलं आणि बोट उलटली. अचानक बोट उलटल्यानं लोकांना जीव वाचण्याची संधी मिळाली नाही. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी पोलिसांना कळवले. माहिती मिळताच राघोपूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी वरिष्ठ जिल्हा अधिकाऱ्यांना या घटनेची कल्पना दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने घटनास्थळी एसडीआरएफ (SDRF) पथक रवाना केले. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समजताच गावात शोककळा पसरलीय. राज्य आपत्ती प्रतिसाद दलाकडून नदीत बुडालेल्यांचा शोध घेतला जातोय. चौकशीनंतरच बोट उलटण्यामागची कारणे स्पष्ट होतील. तसेच, बोटीवर नेमके किती लोक होते आणि अपघातानंतर किती जणांची सुटका करण्यात आली. बोटीची क्षमता, प्रवाशांची संख्या आणि सुरक्षिततेची व्यवस्था यांसारख्या बाबींचीही चौकशी केली जाईल.

# मंदिरातही मुली सुरक्षित नाहीत?; अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन

**पुणे/प्रतिनिधी-** पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी परिसरात मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या एका अल्पवयीन मुलीशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. मेट्रोच्या पिलर उभारणीच्या कामावर कार्यरत असलेल्या एका कामगारावर हा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हा प्रकार कैद झाला असून, घटनेची माहिती समोर येताच परिसरात संतापाची लाट उसळली आहे. निगडी पोलिसांनी संबंधित संशयित कामगाराला ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी निगडी परिसरातील एका मंदिरात दर्शनासाठी गेली होती. दर्शन घेतल्यानंतर ती काही वेळ मंदिराच्या गाभाऱ्यात थांबली होती. याच वेळी मेट्रोच्या कामावर असलेला एक कामगार गाभाऱ्यात आला. मुलगी एकटी असल्याचे पाहून त्याने तिला कोपऱ्यात ओढत तिच्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

**मुलीचा धाडसी प्रतिकार; संशयिताने काढला पळ**

संबंधित व्यक्तीने गैरवर्तन करण्याचा प्रयत्न करताच मुलीने धाडसाने प्रतिकार केला. तिने त्याला हिसका देत स्वतःची सुटका करून घेतली आणि मोठ्याने आरडाओरडा केला. त्यानंतर संशयिताने घटनास्थळावरून निघून जाण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे घाबरलेली मुलगी मंदिरातच रडू लागली.



**सीसीटीव्ही फुटेजमुळे प्रकार उघडकीस-** मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही घटना कैद झाल्याची माहिती समोर आली आहे. फुटेजमधील प्रकाराची माहिती परिसरात पसरताच स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. मंदिरासारख्या ठिकाणी अल्पवयीन मुलीच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याने नागरिकांमधून कठोर कारवाईची मागणी होत आहे.

**निगडी पोलिसांची कारवाई; संशयित ताब्यात-** घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन निगडी पोलिसांनी संबंधित संशयित कामगाराला ताब्यात घेतले आहे. प्राप्त माहितीनुसार, त्याच्याविरुद्ध संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील महिला आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

**आरोपीला अटक; पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल-** १२ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, ही घटना ११ ऑक्टोबर रोजी निगडीतील यमुनानगर परिसरात घडली. निगडी पोलिसांनी विशाल सिंह या संशयिताला अटक केली असून, त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४ आणि पॉक्सो कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी या कारवाईची पुष्टी केल्याचे वृत्त आहे.

# महाराष्ट्रात पहिल्यांदाच हवाई रुग्णवाहिका




**मुंबई/प्रतिनिधी-** राज्यात दरवर्षी १५ हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती आहे. यापैकी अनेक अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळणे हे मोठे आव्हान ठरते.राज्यातील महामार्गवर दररोज असंख्य अपघात होता. या अपघातात जखमी झालेला रुग्ण हॉस्पिटलपर्यंत पोहोचेपर्यंतच दगावला जातो. त्यामुळे अपघातात मोठ्या प्रमाणावर मृत्यू होतात. आता महामार्गावरील हेच मृत्यू टाळण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकार घेण्याच्या तयारीत आहे. या हवाई रुग्णवाहिकेमुळे अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळणार आहेत.

राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांतील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत आणि त्यांचे प्राण वाचविण्यास मदत व्हावी, या उद्देशाने 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच 'गोल्डन अवर', हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. या निर्णायक काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्यासाठी हवाई रुग्णवाहिका सेवा प्रभावी ठरू शकते, अशी भूमिका परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मांडली. या संबधित बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# देशात अराजकता पसरवण्याचे आंतरराष्ट्रीय षडयंत्र



**मुंबई/प्रतिनिधी-** विदेशी शक्तींच्या मदतीने काँग्रेस आणि इंडिया आघाडीला देशात अराजकता पसरवायची असून हे आंतरराष्ट्रीय षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेला मोर्चा हा भारताच्या इतिहासातील काळा दिवस होता, अशी टीकाही त्यांनी केली.काँग्रेसच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला होता. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत घेऊन विरोधी पक्षाच्या आंदोलनावर टीकास्त्र सोडले. सोमवारचा दिवस हा देशाच्या इतिहासातील काळा दिवस होता. न्यायालयावर मोर्चा काढणे, आंदोलन करणे हे यापूर्वी इतिहासात कधीही घडले नाही. ही घटना म्हणजे भारताच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेवर हल्ला आणि न्यायव्यवस्थेचा अपमान असल्याचे सांगत शिंदे यांनी याप्रकरणी विरोधकांकडून माफीची मागणी केली.पंतप्रधानांच्या निवासस्थानसमोर आंदोलन असो किंवा सध्या दिल्लीत दररोज सुरु असलेली राजकीय आंदोलने, ही देशासाठी धोकादायक आहेत. अनेक विदेशी शक्ती भारताला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## नवजात बाळाच्या आगमनाचा आनंद क्षणात विरला;
# दोन सख्ख्या भावांसह तिघांचा मृत्यू



**दारव्हा/प्रतिनिधी-** घरात नवजात बाळाच्या आगमनाने आनंदाचे वातावरण असतानाच काळाने घाला घातला. रुग्णालयातून पत्नीला सुटी मिळाल्यानंतर बाळासाठी आवश्यक साहित्य आणण्याकरिता दारव्हा येथे आलेल्या पित्याचा परतीच्या प्रवासातच मृत्यू झाला. दारव्हा-आर्णी मार्गावर साजेगावजवळील पेट्रोलपंपाजवळ एसटी बस आणि दुचाकीत मंगळवारी दुपारी २:३० वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या भावांसह तिघांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात किशोर रामराव चव्हाण (३३), दीपक रामराव चव्हाण (२८), दोघेही रा. रामगाव (हरू), आणि कुणाल लक्ष्मण पवार (१६), रा. झोंबाडी, ता. नेर, ह.मु. रामगाव (हरू) यांचा मृत्यू झाला. किशोर हा पुणे येथील खासगी कंपनीत नोकरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत होता. पत्नीच्या प्रसूतीनिमित्त तो गावी रामगाव हरू येथे आला होता. दारव्हा येथील उपजिल्हा रुग्णालयात पत्नीची प्रसूती झाल्यानंतर तिला सुटी मिळाली. बाळासाठी आवश्यक साहित्य आणण्याकरिता किशोर आपल्या लहान भावासह आणि कुणालसोबत दारव्हा येथे आला होता. मात्र, साहित्य घेऊन घरी परतताना त्यांच्यावर काळाने झडप घातली.

किशोर आणि दीपक यांचे वडील रामराव चव्हाण हे अल्पभूधारक शेतकरी असून, काही वर्षांपूर्वी झालेल्या अपघातात त्यांना एका पायाने अपंगत्व आले. शेती आणि भजनाच्या माध्यमातून ते उदरनिर्वाह करतात. दीपक शेती व मोलमजुरी करून कुटुंबाला हातभार लावत होता. दोन्ही मुलांच्या मृत्यूने या पित्याचा आधार हरपला आहे. अवघ्या १६ वर्षांच्या कुणालच्या मृत्यूने त्याच्या आई आणि बहिणीवरही दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघाताने तीन कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. जन्मानंतर काही दिवसांतच बाळाच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरपल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

**परतीचा प्रवास ठरला अखेरचा**

दारव्हा येथून आवश्यक साहित्य घेऊन तिघेही दुचाकीने (एमएच १४ जेजे ९२३८) रामगावकडे परत निघाले होते. मात्र, दारव्हा-आर्णी मार्गावरील साजेगावपासून काही अंतरावर असलेल्या पेट्रोल पंपाजवळ एसटी बस (एमएच ४० एन ९९८३) आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत तिघांचाही जागीच मृत्यू झाला. काही वेळापूर्वी एकत्र असलेले तीन जीव क्षणार्धात काळाच्या पडद्याआड गेले आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आयुष्याला वेदनादायी वळण मिळाले. दीपकच्या कष्टकरी हातांची साथ हरपली, तर कुणालच्या कुटुंबानेही आपला लाडका सदस्य गमावला.

# दुष्काळाच्या झळा! पाच दिवसांत चार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे खळबळ



**चंद्रपूर/प्रतिनिधी-** पावसाने ओढ दिली, डोळ्यांदेखत पिके करपू लागली आणि हातातोंडाशी आलेला घासही हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली. अशा परिस्थितीत पुढील संसाराचा गाडा कसा हाकायचा, या विवंचनेत वेळवा (माल) येथील महेंद्र दिवाकर राऊत (३५) यांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी समोर आली आहे. या घटनेने गावावर शोककळा पसरली असून, जिल्ह्यात पाच दिवसांत चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याने जिल्ह्यातील शेतीसंकटाचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित झाले आहे.शेतीवरच उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसाठी पाऊस हा केवळ निसर्गाचा घटक नसून जगण्याचा आधार आहे. मात्र, यंदा पावसाने दिलेली ओढ, पावसातील खंड आणि पिकांचे होणारे नुकसान यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणिताचा ताळमेळ बिघडला आहे. मोठ्या आशेने पेरणी केलेली पिके डोळ्यांदेखत सुकू लागल्याने हाती येणाऱ्या उत्पन्नाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. उत्पन्नाची आशा मावळत असताना पुढील खर्च भागवायचा कसा, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.महेंद्र राऊत यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, अवघ्या एक वर्षाची तान्ही मुलगी, आई आणि लहान भाऊ असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार हरपल्याने या कुटुंबासमोर आता भविष्यातील उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. जिल्ह्यात पाच दिवसांत चार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर गांभीर्याने विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे. पिकांचे नुकसान, उत्पन्नातील घट आणि आर्थिक विवंचना यांसारख्या समस्यांनी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांनी दिलासा मिळणार नाही. नुकसानग्रस्त शेतीचे तातडीने सर्वेक्षण, पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई आणि संकटग्रस्त कुटुंबांना वेळेत आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेण्यासाठी आणखी किती बळींची प्रतीक्षा करावी लागणार, असा बोचरा प्रश्न या घटनांमुळे उपस्थित होत आहे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना वेळीच मदतीचा हात मिळावा आणि त्यांचे जगणे सुसह्य व्हावे, यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी होत आहे.

# दुष्काळात वसुलीसाठी फायनान्स कंपनी शेतकऱ्यांच्या दारात

**अकोला/प्रतिनिधी-** भीषण दुष्काळामध्येही फायनान्स कंपनीकडून वसुलीसाठी त्यांचे प्रतिनिधी शेतकऱ्यांकडे तगादा लावत




असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. वसुलीसाठी गेल्याचा पुरावा म्हणून कंपनीच्या प्रतिनिधींकडून शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे छायाचित्र देखील काढले जात आहे. विशेष म्हणजे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांकडे कुणालाही वसुली करता येणार नाही, असे आदेश दिले होते. मात्र, मंत्री व प्रशासनाचे आदेश हवेतच असल्याचे स्पष्ट होते.

**शेतकरी वर्ग मोठ्या संकटात-** दुष्काळी परिस्थितीमध्ये यंदा पावसाची मोठी तूट आहे. पावसाअभावी शेतातील पिके करपली. सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. दुष्काळाच्या संकटामध्ये बळीराजा होरपळला असून खरीप हंगाम हातचा गेला. राज्य सरकारकडून दुष्काळ जाहीर करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही. खरीप हंगामातून शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागले नाही. पेरणीसाठी केलेला खर्च देखील पाण्यात गेला. त्यातच दुष्काळाच्या संकटात आता रब्बी हंगाम देखील आला आहे. खरीपमध्ये आलेल्या दुष्काळाच्या संकटातून बळीराजा सावरला नसताना आता रब्बीचे नियोजन कसे करावे? असा मोठा प्रश्न पडला. शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. कर्ज कसे फेडावे या विवंचनेत बळीराजा आहे. कर्जाचा हप्ता थकला तरी कोणत्याही बँकेने किंवा खासगी सावकाराने शेतकऱ्यांना त्रास देऊ नये. तसेच खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना वेठीस धरू नये. ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली आहे मात्र, वारसांची नोंद न झाल्यामुळे लाभ मिळाला नाही, त्यांच्या वारस नोंदी तातडीने पूर्ण करून घेण्याच्या सूचना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अकोला जिल्हा दौऱ्याच्या दरम्यान दिल्या होत्या. मात्र, खासगी फायनान्स कंपन्यांकडून मंत्री व प्रशासनाचे हे आदेश झुगारून शेतकऱ्यांकडे वसुलीसाठी तगादा सुरू केल्याचा प्रकार अकोला जिल्ह्यातून समोर आला. अकोला जिल्ह्यातील डोंगरगावमध्ये एका अल्पभूधारक शेतकऱ्याकडे वसुलीसाठी फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी गेले होते.









# गुहेत आढळले दहशतवाद्यांचे पुरी, चणे, ग्रेनेड आणि एके-४७

**पूंछ :** जम्मू आणि कश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील सुरक्षा दलांकडून दहशतवाद्यांच्या शोधासाठी शोध मोहिम सुरू आहे. या मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांना दहशतवाद्यांचा अड्डा सापडला. या अड्डयातून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला आहे. या जागेचा वापर दहशतवादी शस्त्रे आणि इतर साहित्य लपवण्यासाठी केला जात होता. या ठिकाणाहून सुरक्ष दलाने एके-४७ रायफल, ३० काडतुसे, सहा ग्रेनेड, बँडेज, बॅटरी, एक टॉर्च आणि वैद्यकीय साहित्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू जप्त केल्या आहेत.शोध मोहिमेदरम्यान सुरक्षा दलाला सुरानकोटच्या सजवान सेक्टरमधील साथरबन परिसरात एक गुहा सापडली. या गुहेचा वापर शस्त्रे आणि इतर वस्तू लपवण्यासाठी केला जात होता. गुहेची झडती घेतली असता आत शस्त्रे आणि दारुगोळा आढळला. यासह पुरी, चणे आणि सुका मेवा देखील सापडला. गुहेत आढळलेले ग्रेनेड बॉम्ब निकामी करणा-या पथकाने नष्ट केले. सुरक्षा दलांकडून परिसरात शोधमोहीम सुरू आहे.

# दिवाळीनंतर यूपीआय व्यवहारांवर शुल्क

नवी दिल्ली : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य ग्राहक आणि व्यापा-यांना मोठा दिलासा देणारा निर्णय नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) घेतला आहे. यूपीआयद्वारे होणा-या विशिष्ट मर्चंट व्यवहारांवर लागू करण्यात येणारे मर्चंट डिस्काउंट रेट(एमडीआर) शुल्क १५ ऑक्टोबरऐवजी आता दिवाळीनंतर लागू करण्यात येणार आहे. एनपीसीआयच्या यूपीआय अँड सर्व्हिसेस स्टीअरिंग कमिटी च्या बैठकीत मंगळवार दि. १३ ऑक्टोबर रोजी यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.डिजिटल इंडियाचा डंका पिटणा-या मोदी सरकारने आता स्मार्ट पेमेंट्सवर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार, व्यापा-यांना २,००० पेक्षा जास्त रकमेच्या सर्व वढक व्यवहारांवर कर भरावा लागणार होता. हा नियम येत्या १५ ऑक्टोबर पासून लागू होणार होता. मात्र मोदी सरकारच्या या निर्णयाला देशभरातून होणा-या विरोधामुळे सरकारने आता हे शुल्क लागू करण्याची तारिख पुढे ढकलली आहे. आता हे शुल्क दिवाळीनंतर लागू केले जाणार आहेत. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने मंगळवारी ही माहिती दिली.

सणांच्या खरेदी हंगामात कोणत्याही प्रकारचा अडथळा किंवा गोंधळ निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने याबाबत एक निवेदन देत हा निर्णय जाहीर केला. हे प्रस्तावित शुल्क आधी १५ ऑक्टोबरपासून लागू करण्याचे नियोजन होते. मात्र, सणासुदीच्या काळात याचा थेट फटका व्यापारी आणि ग्राहकांना बसू नये, म्हणून व्यापारी संघटना, फिनटेक कंपन्या आणि डिजिटल पेमेंट संस्थांनी हा निर्णय काही काळ स्थगित करण्याची मागणी केली होती.




# तिवसा येथे युवक काँग्रेसचे चक्काजाम आंदोलन

**तिवसा/प्रतिनिधीः-**
SIR प्रक्रियेतील कथित घोळाच्या निषेधार्थ आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी तिवसा विधानसभा युवक काँग्रेस व तिवसा तालुका युवक काँग्रेसच्या वतीने आज, दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी तिवसा येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी महामार्गावर चक्काजाम आंदोलन करून सरकार व ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार निषेध व्यक्त केला.

SIR प्रक्रियेतील कथित अनियमिततेमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून,



## ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी!

लोकशाही आणि मतदारांच्या अधिकारांच्या रक्षणासाठी ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

यावेळी राहुल येवले, तालुका अध्यक्ष वैभव वानखडे, रितेश पांडव, अनिकेत ढेंगळे, जसबीर ठाकुर, सुनिल बाखडे, लुकेश केने, प्रद्युम पाटील, अतुल गवड, शरद वानखडे, मुकुंद पुनसे, योगेश वानखडे, धिरज ठाकरे, गजानन भोंबे, संजय चौधरी, अंकुश जुनघरे, अमर वानखडे, योगेश कोहळे, सुरज धूमनखेडे, प्रणव गौरखेडे, अक्षय पवार, श्रीकांत माहोरे, विश्वजित बाखडे, अनिकेत बादशे, दीपक पावडे, अमोल पन्नासे, तुषार लेवटे, गौरव चौधरी, स्वप्नील गंधे, विशाल सावरकर, वैभव काकडे, अनिकेत प्रधान, आकाश मकेश्वर, गौरव चौधरी, मंगेश हिमाने, आशिष ताथोडे, आदर्श लांडगे, अनंत शेंद्रे, सचिन वानखडे, गोपाल पडोळकर, सुनील केने, अमर मालगे, राज निकाळजे, आदी युवक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोहळा खानापूर शेत शिवारात जुगारावर धाड

## ८ जुगारी अटक, २.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-**
नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाणे हद्दीत कोहळा खानापूर शेतशिवारात सुरू अवैध जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या पथकाने धाड मारून आठ जुगा-यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून २ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राहुल गुरुनाथ मेश्राम ( रा. दिघी कोल्हा), शरद सुधाकरराव तायडे (वय ४२, रा. धानोरा ), राजेश अजाबराव शेलोकार (वय ४२, रा. म्हाडा कॉलनी अकोली),कुलदीप उर्फ श्याम अनंतराव यादव (वय ३२, रा. कोहळा खानापूर),विक्की वसंतराव भगत (वय ३२, रा. कोदरी ,हरक),धिरज रमेशराव सोळंके ( रा. कोहळा खानापूर), ज्ञानेश्वर जीवनराव चव्हाण (वय ५०, रा. कोहळा खानापूर),दिनेश गजानन गुल्हाने(वय ४३, रा. नांदगाव खंडेश्वर) अशी अटक आरोपींची नावे आहे तर आणखी ३ आरोपी फरार आहे.

स्थानिक गुन्हे पथकाने पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारावर कोहळा खानापूर शेत शिवारातील नितीन सोळंके यांच्या शेतात धाड मारून ८ जुगार यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख ३१हजार, ६२ हजार रुपये किमतीचे ७ मोबाईल,३ मोटार सायकल १ लाख ९० हजार असा एकूण २ लाख ८३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.सर्व आरोपी आणि मुद्देमाल पुढील कारवाई साठी नांदगाव खंडेश्वर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर अधीक्षक दत्ता तोटेवाड, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनात उपनि. सागर हटवार, अंमलदार शिवाजी घुगे, रविंद्र वऱ्हाडे, श्याम गावंडे, प्रशांत वैद्य, दिनेश कनोजीया, पोकॉ. युवराज सोळंके, चापोकॉ. प्रज्वल राऊत यांनी केली.

# आ. सुलभा खोडके यांचा पाठपुरावा -चारा वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे सुधारित आदेश

**अमरावती/प्रतिनिधी :-**
अमरावती जिल्ह्यात गुरांच्या चाऱ्याची टंचाई रोखण्यासाठी अमरावतीचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिष येरेकर यांनी शेतातील सोयाबीन आणि तूर पिकांचे कुटार (वैरण) केवळ जनावरांच्या चाऱ्यासाठी आरक्षित ठेवण्याबाबत आदेश दिले होते. या आदेशामुळे शेतकरी गड्डू निर्मिती उद्योगांसाठी कुटार खरेदी व वापरास काहीसा प्रतिबंध लावल्यात आल्याने बायोमास ब्रिकेट/पेलेट्स निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणी निर्माण



होण्याची शक्यता होती. या संदर्भात शेतकरी उद्योजकांनी अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांची भेट घेऊन सदरच्या आदेशामध्ये शिथिलता देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. सदरचे सुधारित आदेश ९ ऑक्टोबर २०२६ रोजी देण्यात आलेल्या मूळ आदेशातील इतर अटी कायम ठेवून तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे. कुटार शिल्लक राहिल्यासच उद्योगांना वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली असून यामुळे बायोमास ब्रिकेट/पेलेट्स निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबद्दल उत्पादक समूहांनी आ. सुलभा खोडके यांचे आभार मानून अभिनंदन केले आहे. यावेळी अभिजित निंभोरकर, तेजस जामठे, अंकुश बंबाळ, प्रतीक तेलखाडे, उद्धव गोमासे, मयूर जैन, सागर शेळके, सागर देशमुख, सुमित चौखंडे, अनिल लोहपुरे, अमोल डहाके, जगमलानी, प्रतीक मालवीय, अजिंक्य गुडधे, आशुतोष लाहोटी, अनुप खलोकार, उपस्थित होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियानाच्यावतीने भव्य भोजनदान

## दीक्षाभूमी वरून परतीचा प्रवास करणाऱ्या बांधवांसाठी उपक्रम

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-**
डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियान महाराष्ट्र राज्य यांच्या धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त नागपुर येथे अजनी मेट्रो स्टेशन जवळील पोल क्रमांक २३८/२३९ या ठिकाणी २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ५ वाजता भोजनदान करण्यात येणार आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दरवर्षी मोठ्या प्रमाणात दीक्षाभूमीवरून परतीचा प्रवास करणाऱ्या बांधवांसाठी भोजनदान करण्यात येत असते. अभियान मार्फत संपूर्ण महाराष्ट्रात पाच दिवसीय धम्म शिबिर, एक दिवसीय व्यक्तिमत्त्व ध्यान शिबिर, धम्म सहल आयोजित करण्यात येतात.

वर्षावास कालावधी मध्ये घर घर बुद्ध धम्म आपल्या दारी, अधिष्ठान स्पर्धा, या सारखे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. तरी भोजनदान कार्यक्रमसाठी बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अभियान प्रमुख जगदीश शिंदे, महिला संघटिका पपीता मनोहरे, इंदुबाई नारनवरे यानी केले आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियान जिल्हा प्रमुख बंडु आठवले, पद्माकर वाहिले, ज्योती मेश्राम, करुणा मून, ॲड सुधीर वानखडे, सुशीला दिघाडे, डॉ रश्मी नारनवरे, विलास मेश्राम, भूषण मोरे, मृदुलता हेरोडे , लता बागडे, रजनी गजभिये, अरुणा आठवले, मनोज गवई, प्रदीप कोकाटे, संतोष पाटील, मुकुंदा गवई, रमा बनसोड, रमेश गडलिंग, सतीश गवई डॉ मिलिंद गजभिये, माया काळबांडे, अमर भांगे काशिनाथ गजभिये, भूपेश बोंबले धम्म बांधवानी उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

# १ व १० वरिल उर्वरित

## बंडखोरी रोखण्यासाठी महायुतीची

मैदानात उतरले आहे.

**महायुतीच्या मतांची जबाबदारी बावनकुळे, राठोड यांच्यावर-** मंत्री उदय सामंत म्हणाले की, अमरावतीमध्ये महायुतीच्या मतांची पूर्ण जबाबदारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री संजय राठोड यांनी घेतली आहे. महायुतीच्या घटक दलाची सर्व मते महायुतीच्या उमेदवाराला मिळणे आवश्यक आहे, त्यासाठी सर्व नेत्यांना जबाबदारी आणि खबरदारी घ्यावी लागेल. सर्व नेत्यांनी जबाबदारी घेऊन काम करावे लागेल, असे सामंत यांनी स्पष्ट केले. त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठ्या प्रमाणात बाजू घेतली. ते म्हणाले की, आमचे नेते एकनाथ शिंदे यांच्या डिक्शनरीत नाराजी असा कोणताही शब्द नाही. एकनाथ शिंदे जे काही करतात, ते मनमोकळेपणाने करतात.

**डॉ.बोंडे हे सरनाईक यांच्यासोबत - आ.बच्चू कडू-** दुसरीकडे शिवसेनेचे आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी देखील विधान परिषद निवडणूकीं संदर्भातील राजकीय बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना दावा केला की, भाजप मध्ये बंडखोरी आहे, पण जिथपर्यंत डॉ. अनिल बोंडे यांचा प्रश्न आहे, ते शेवटपर्यंत भाजप सोबत निष्ठावान राहतील. महायुतीच्या नियमानुसार येथील उमेदवार किरण सरनाईक यांच्यासोबतच राहतील. बच्चू कडू यांनी सांगितले की, आजच्या बैठकीत निवडणूक संबंधित पक्ष आणि महायुतीची रणनीती फायनल झाली आहे. बच्चू कडू पुढे म्हणाले की, खासदार असणे ही मोठी जबाबदारी आहे. डॉ. बोंडे यांच्यावर जबाबदारी आहे. कडू यांनी स्पष्ट केले की, पहिल्या पसंतीचे मत बोंडे देखील महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक यांनाच देतील. दुसऱ्या पसंतीसाठी ते दुसऱ्या कोणाचे नाव घेऊ शकतात.

## पुस नदीच्या पुलावर काळाचा घाला!

ए ५१३२ वरून पुसदकडे येत असताना ट्रकच्या चाकाखाली आल्याची प्राथमिक माहिती आहे. यातील एकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दुसऱ्याला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात नेत असताना वाटेतच मृत्यूने गाठले.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले. अपघातानंतर ट्रकखाली अडकलेला मृतदेह बाहेर काढण्याची कार्यवाही करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच पुसद शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र क्षीरसागर यांच्यासह पोलीस पथक आणि जिल्हा वाहतूक शाखेचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहतूक सुरळीत केली. अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून फरार झाल्याची प्राथमिक माहिती आहे.वर्दळीच्या पुलावर वाहनांची सुरक्षितता, वाहतूक नियंत्रण आणि अपघात प्रतिबंधक उपाययोजनांचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. अपघाताचे नेमके कारण शोधणे, फरार चालकाचा शोध घेणे आणि पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे काम पुसद शहर पोलीस करीत आहेत.

## जुन्या वादात तरुणावर हल्ला

धनराज सरदार (२९, कपिल वस्तू नगर) याला अटक केली.

माहितीनुसार, कपिल वस्तू नगर निवासी शेखर सावळे याचा आरोपी अक्षय धनराज सरदार (वय २९) याच्यासोबत काहि दिवसांपूर्वी वाद झाला होता. हाच राग मनात धरून आरोपी अक्षयने सोमवारी रात्री शेखरला घेरले आणि त्याच्यावर चाकूने सपासप वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या शेखरला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले.घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने त्वरित कारवाई करत काही तासांच्या आत आरोपीला वायगाव फाट्या जवळील जंगलातून ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपी विरुद्ध खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. ही कारवाई पीआय अतुल वर, पीआय दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली एपीआय महेश इंगोले, पीएसआय गजानन सनुने, सुनील लासूरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल, योगेश पवार, रॉजीक रायलावाले आदींनी केली.

## प्रयोगशाळा सहायकांच्या वेतनश्रेणीचा

मागण्यांबाबत ठाम भूमिका घेतली होती. या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रयोगशाळा सहायकांच्या वेतनश्रेणीबाबत स्पष्टीकरण देणारे पत्र/परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामुळे विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या स्तरावर निर्माण झालेला संभ्रम दूर होऊन संबंधित निर्णयाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा होण्यास मदत होणार आहे. यापूर्वी अर्जित रजेच्या रोखीकरणाचा प्रश्न आणि आता प्रयोगशाळा सहायकांच्या वेतनश्रेणीच्या अंमलबजावणीबाबत झालेली प्रगती, ही सेवक संयुक्त कृती समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची आणि संघर्षाची फलश्रुती आहे. शासन पत्र निर्गमित झाल्यानंतर आज संयुक्त कृती समितीचे पदाधिकारी ज्ञानेश्वर बारस्कर, प्रशांत देशमुख, जयंत निखारे, प्रफुल्ल घवळे, प्रविण गोंडीकर व संदीप झोडे यांनी अमरावती विभागाचे सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर यांची भेट घेऊन शासनाचे आभार मानले व प्रयोगशाळा सहायकांच्या त्वरित वेतननिश्चिती करून त्यांना सुधारित वेतन लागू करणे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सुधारित निवृत्तीवेतन मंजुरीची कार्यवाही करण्याबाबत विनंती केली. त्यास सहसंचालकांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच वेतननिश्चिती शिबीर आयोजित करून वेतननिश्चिती करण्यात येऊन पुढील महिन्यापासून सर्व कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन लागू करण्यात येईल व सुधारित सेवानिवृत्तीवेतन प्रकरणे मंजुरीस्तव महालेखाकार कार्यालयास सादर करण्याचे आश्वासन दिले. सर्व कर्मचाऱ्यांनी वेतन निश्चिती व सुधारित सेवानिवृत्तीवेतन प्रस्ताव तयार ठेवण्याचे व शिबिरात मंजुरीस्तव सादर करण्याचे आवाहन डी. एम. बारस्कर यांनी केले आहे.

## वैनगंगा प्रकल्पासाठी जमिन

पूर्वी वास्तविक बाजारमूल्याचे आकलन करून रेडी रेकनर दर अपडेट केले जावेत. क्षेत्रात गेल्या काही वर्षांत कृषी भूमीच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. अशा वेळी जुन्या दरांच्या आधारावर मोबदला मिळाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. शेतकऱ्यांनी दावा केला आहे की, मांजरखेड कसब्यात मुख्य रस्त्याला लागून असलेल्या जमिनीची किंमत ७० ते ७५ लाख रुपये प्रति एकरपर्यंत आहे, तर रस्त्या पासून दूर असलेल्या जमिनीची किंमत यापेक्षा ५ ते १० लाख रुपये कमी असू शकते. त्यांनी प्रशासनाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून बाजारमूल्य निश्चित करावे जमिनीचे मूल्यांकन करताना केवळ नोंदणीकृत दस्तऐवजांच्या आधारावर न करता शेतकऱ्यांशी चर्चा करून वास्तविक बाजार दर शोधावा.रेडी रेकनर दरात सुधारणा करावी आणि प्रशासकीय निर्णयांची माहिती लिखित स्वरूपात द्यावी.भूमी अधिग्रहणाच्या प्रक्रियेपूर्वी संबंधित गावातील जमीन मालकांना आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी.

या वेळी अंकुश शिंदे, शरद खोडे, आशा खोडे, राजेंद्र राऊत, रामदास गडपायले, ललीता बनसोड, अनुराग मार्कंड, विमल मार्कंड, अरुण वासनिक, दीपिका पांडे, अनिल बोंडकर, शिवपाल बोंडकर, रमेश वाडेकर, करण वासनिक, सोहम बाखडे, वैभव ढगे, सौरभ गडपायले, शुभांगी झाडे, उत्तमराव गवई, दिनांबर धोटे, गजानन वैघडे, प्रदीप गवई, विजया भगत, देवानंद गवई, तुलसीराम शिंदे, सुखदेव मेश्राम, गजानन तायवाडे, युवराज खेडे, नवकिशोर आवारे, अवधूत आखरे, भारत आखरे, पुंडलिक पचगाडे, पंकज होले, सागर तायवाडे, श्रीमंत मुले, श्याम जोशी समेत अनेक शेतकरी उपस्थित होते.

## मनपाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे

गांभीर्य लक्षात घेऊन शिष्टमंडळाने आयुक्तांसमोर कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी मांडली आणि थकीत वेतन तात्काळ देण्याची मागणी केली.यावर आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले यांनी सकारात्मक भूमिका घेत सांगितले की, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन लवकरात लवकर देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यांनी १६ ऑक्टोबर पर्यंत वेतन देण्याचे आश्वासन दिले आहे.

आयुक्तांची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळात नगरसेवक संजय गव्हाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे मनीष बजाज, गुड्डू धर्माळे, शिवसेना विधि समिती सभापती स्नेहा लुल्ला यांचे पती आशीष लूल्ला आणि नगरसेविका रेखा तायवाडे यांचे पती पंजाबराव तायवाडे सहभागी होते.

## दर्यापूरच्या प्रबोधन शाळेत

झालेल्या विद्यार्थिनींनीही आपली बाजू मांडली असून, या घटनेबाबत आपला कोणताही आक्षेप नसल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. तसेच शाळा समितीतील पालकांचाही यावर आक्षेप नसल्याचे स्पष्ट केले आहे.

शाळेची दिवसेंदिवस होत असलेली प्रगती आणि शाळेचा रुबाब हा कुठेतरी खंडित व्हावा यासाठी हे कट कारस्थान होत असल्याचा आरोप केल्या जात आहे.

## मजुरांची ट्रॅक्टर-ट्रॉली नाल्यात

आरोप आहे. या अपघातात शोशन कमल खेस (वय ४८, रा. गजनगुडा, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) यांचा मृत्यू झाला. ललिता दसरू गोटा (वय २५, रा. घोडसूर, जि. गडचिरोली) आणि प्रियांशू सुरजन खेस (वय ५) हे जखमी झाले. ट्रॅक्टर-ट्रॉलीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी होते का, तसेच अपघाताच्या वेळी वाहनाचा वेग किती होता, यासह अन्य बाबी तपासातून स्पष्ट होतील. फिर्यादीतील माहितीनुसार ट्रॉलीत १२ महिला, आठ पुरुष आणि एक लहान मुलगा असे एकूण २१ जण प्रवास करीत होते. या संख्येची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. उर्मिला सुरजन खेस (वय ४५) यांच्या तक्रारीवरून चालक सुकरू ऋषी ताडामी (वय २८, रा. पावीमुडा, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) आणि ट्रॅक्टरमालक चेतन प्रल्हादराव धवणे (वय ३०, रा. धानोरा सिका, ता. नांदगाव खंडेश्वर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ व २८१ तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदगाव खंडेश्वर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## ७ मेडिकलमधून विना बिल

एकच खळबळ उडाली. ज्या मेडिकल दुकानांची तपासणी करण्यात आली, ती दुकाने लालखडी, पठाण चौक, पटवा चौक आणि कठोरा नाका परिसरातील असल्याचे सांगण्यात येत आहे.या ७ दुकानांच्या तपासणीत अल्प्राझोलम ०.२५/०.५० गोळ्या, ट्रामाडॉल गोळ्या, क्लोनाझेपाम गोळ्या, एटिझोलम गोळ्या आदी सायकोट्रॉपिक अर्थात झोप आणणाऱ्या औषधांची बिना बिल विक्री केल्याचे उघडकीस आले आहे. ही औषधे सेवन केल्याने बेहोशी येते आणि त्यांचा वापर नशेसाठी केला जात असल्याचा प्रकार अनेक जिल्ह्यांमध्ये समोर आला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, सर्व सातही दुकानांना नोटीस देण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात औषध व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४० अंतर्गत कारवाई केली जात आहे. ही कारवाई अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे वरिष्ठ निरीक्षक प्रदिप परदेशी, पीएसआय युसूफ सौदागर, पीएसआय राजू आप्पा, इमरान, दीपक श्रीवास, हेड कॉन्स्टेबल रूपेश अंभोरे, कॉन्स्टेबल रियाज आणि एफडीएचे सहाय्यक आयुक्त डॉ. ए. एम. माणिकराव व इतर अधिकाऱ्यांनी केली. दिल्लीच्या नार्कोटिक्स कंट्रोल ब्युर महाराष्ट्राचे आदेशानुसार राज्यात १ ते १५ ऑक्टोबर पर्यंत औषध दुकाने, फार्मसीचे लायसन्स तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्या निर्देशानुसार अमरावतीमध्ये ही मोहीम राबविण्यात आली.

## हुंडा छळ प्रकरणातील आरोपींना

दाखल केला होता. पिडितेने सांगितले की, तिचा निकाह ५ एप्रिल रोजी झाला होता. दोन महिन्यानंतर सासरच्या मंडळींनी माहेरहून ५० हजार रुपये आणण्यासाठी तिचा छळ सुरू केला. पीडितेने ४० हजार रुपये माहेरहून आणून दिले. तरीही सासरचे लोक तिला मारहाण करीत होते.

घटनेच्या दिवशी पती आणि सासरच्या लोकांनी तिला बॅटने मारहाण केली आणि हुंडा न आणल्यास घरातून हाकलून दिले, असा आरोप पीडितेने केला होता. यावरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता.या प्रकरणी आरोपींनी एड. रुबीना शेख आणि एड. अर्चना पाटील यांच्या मार्फत अटकपूर्व जामीन याचिका दाखल केली होती. न्यायालयाने बचाव पक्षाच्या युक्तिवादाला मान्यता देत जामीन मंजूर केला.या प्रकरणात ॲड. मयूर राजवाडे, ॲड.रुपाली कांबळे, ॲड.शहीन शेख, ॲड. अनामिका थुल यांनी सहकार्य केले.

## पोलिस असल्याचे सांगून वृद्धाला

दागिने ठेवण्याचा बहाणा करून हातचलाखीने ते दागिने लंपास केले. त्यानंतर दोघांनीही दुचाकीवरून घटनास्थळावरून पळ काढला. काही वेळाने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तिवारी यांनी बडनेरा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## दर्यापूर तालुक्यात महावितरणचे

तसेच विविध व्यावसायिकांना महावितरणच्या विज सेवेशी संबंधित अनेक कामांसाठी वारंवार कार्यालयीन चकरा माराव्या लागतात. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाढत असून, ग्रामिण भागातील शेतकऱ्यांनाही विविध कामांसाठी मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तालुक्यात विज जोडणी, नविन विज कनेक्शन, कृषी पंपांसाठी विज जोडणी, विज बिलातील त्रुटी, रोहित्र (डीपी) बदलणे, विज वाहिन्यांची दुरुस्ती तसेच इतर तांत्रिक व प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना संबंधित वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. अनेकदा या कामांसाठी वेळ आणि पैसा खर्च करूनही कामे मार्गी लागण्यास विलंब होतो. तालुक्यातील वाढती लोकसंख्या, कृषी क्षेत्राची व्याप्ती आणि विज ग्राहकांच्या वाढत्या संख्येचा विचार करता दर्यापूर येथे स्वतंत्र महावितरण विभाग कार्यालय सुरू झाल्यास नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण होण्यास मदत होईल. तसेच विज वितरण व्यवस्थेचे नियोजन, देखभाल आणि दुरुस्तीची कामे अधिक वेगाने व प्रभावीपणे करता येतील. शेतीसाठी विजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा असल्याने कृषी पंपांच्या विज जोडण्या, रोहित्रांमधील बिघाड, विज वाहिन्यांची दुरुस्ती आणि इतर तांत्रिक समस्यांवर तातडीने उपाययोजना होणे आवश्यक आहे. स्वतंत्र विभाग कार्यालय उपलब्ध झाल्यास या कामांमध्ये समन्वय वाढून शेतकरी आणि सर्वसामान्य विज ग्राहकांना दिलासा मिळू शकतो.

दर्यापूर तालुक्यातील नागरिकांना विज सेवेशी संबंधित कामांसाठी इतर कार्यालयांवर अवलंबून राहावे लागू नये, तसेच प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ व्हावे, यासाठी दर्यापूर येथे स्वतंत्र महावितरण विभाग कार्यालय मंजूर करून ते तातडीने सुरू करण्यात यावे, अशी आग्रही मागणी निलेश मोपारी यांनी केली आहे.

या निवेदनाची प्रत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि महावितरणच्या अमरावती येथिल मुख्य कार्यालयातील मुख्य कार्यकारी अभियंत्यांना पाठविण्यात आली आहे. संबंधित विभागाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून आवश्यक सर्वेक्षण व प्रशासकीय कार्यवाही करावी आणि दर्यापूर तालुक्यातील विज ग्राहकांच्या हितासाठी स्वतंत्र विभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. हे निवेदन तालूका अध्यक्ष निलेश पाटील मोपारी यांच्या नेतृत्वात शहर अध्यक्ष अमोल गहरवाल, नगरसेवक राहुल बैताडे, अनंतराव राऊत, निलेश जुनघरे, कुलदीप काळे, नितीन गावंडे, प्रतिक नाकट, अनिस भाई, योगेश हिंगणकर, शुभम होले, गजानन मानकर, राहुल घायसुंदर, गौरव गावंडे, तौसिफ भाई, प्रफुल राहाटे, गजानन सोळंके, प्रविण आठवले, हर्षल खाडे, चेतन देशमुख, आशिष अरबट व इतर पदाधिकारी व कार्यकर्त यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

## पाण्याशिवायच साईट पट्टीची

पट्टीवर दोन ते तीन बारीक झाडे आहेत. ठेकेदाराने ही झाडे काढून टाकण्याऐवजी ती तशीच ठेवून त्यांच्या आजूबाजूला मुरूम टाकून दबाई उरकून घेतली आहे. भविष्यात ही झाडे रस्त्याच्या कडेला तशीच राहिल्यास रात्रीच्या वेळी किंवा अचानक समोरून येणाऱ्या वाहनांमुळे येथे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे ठेकेदाराने ही झाडे तात्काळ काढून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी केली जात आहे.

या महत्त्वाच्या रस्त्याचे काम सुरू असताना संबंधित विभागाच्या एकाही जबाबदार अधिकाऱ्याने अद्याप या ठिकाणी भेट देऊन पाहणी केलेली नाही. अधिकारी फिरकत नसल्यामुळे ठेकेदाराचे चांगलेच फावले असून, कुठेतरी पाणी मुरत असल्यामुळेच या निकृष्ट कामाकडे अधिकारी डोळेझाक करत आहेत का? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# भयावह दुष्काळात लाखो लिटर पाण्याची नासाडी थांबवा

## सावरगांव कान्होबा लघु प्रकल्पाचे पाणी कालव्याने न सोडता पाईपलाईनने विहिरीत सोडण्याची माजी सरपंचांची मागणी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

सध्या राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती असताना सावरगांव कान्होबा लघु प्रकल्पाचे पाणी नादुरुस्त कालव्याद्वारे सोडून ९० टक्के पाण्याची नासाडी टाळण्यात यावी आणि त्याऐवजी जलवाहिनी व मोटर पंपाद्वारे अधिकृत विहिरीत पाणी सोडण्यात यावे, अशी अत्यंत महत्त्वाची आणि तातडीची मागणी माजी सरपंचांनी जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे केली आहे.याबाबत गट ग्रा.पं. सावरगांव कान्होबा चे माजी सरपंच भीमराव नामदेव इंगोले यांनी तहसीलदार मं.पिर ह्यांचे मार्फत जिल्हाधिकारी वाशिम यांना दि. १२/१०/२०२६ रोजी निवेदन दिले आहे.

माजी सरपंच इंगोले यांनी दिलेल्या निवेदनानुसार तीन गावांची तहान याच प्रकल्पावर गट ग्रापं सावरगांव कान्होबा अंतर्गत सावरगांव का., खापरी कान्होबा, साळंबी या तीन गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा हा सावरगांव कान्होबा लघु प्रकल्पावर अधारित असलेल्या विहिरीद्वारे केला जातो. सध्या राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती असून विहिरीची पाणी पातळी खालावली आहे. ग्रापं च्या विहिरीत पाणी सोडण्यासाठी ग्रापं प्रशासन सावरगांव का. लघु प्रकल्पाचे जुने कालवे वापरण्याच्या तयारीत आहे. परंतु



सदर कालवे हे गेल्या अनेक वर्षांपासून पूर्णपणे नादुरुस्त, फुटलेले, मोडकळीस आलेले व गळती लागलेले आहेत. या कालव्यामधून पाणी सोडल्यास अंदाजे ९०३ पाणी वाटेतच जमिनीत मुरून व ओढ्याला जाऊन वाया जाणार आहे. दरवर्षी याच पद्धतीने लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे. सावरगांव कान्होबा लघु प्रकल्प वन परिसरामध्ये असल्यामुळे ८०० हेक्टरपेक्षा अधिक जंगलातील वन्य पशु-पक्षी व पाळीव जनावरांचे एकमेव या जलस्रोतावर अवलंबून आहे. त्यामुळे या धरणातील प्रत्येक पाण्याची थेंब जपून वापर करणे ही काळाची गरज असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सन २०१८-१९ मध्ये लघु प्रकल्पामध्ये पाण्याचा साठा कमी असतानाही या धरणातील पाणी जलवाहिनी (पाईपलाईन) व मोटर पंपाच्या सहाय्याने अधिकृत केलेल्या विहिरीत दोन वर्षे कुठेही नासाडी न करता नियोजनपूर्वक आणले होते, असा दाखलाही इंगोले यांनी दिला आहे. महाराष्ट्र टंचाई निवारण संहिता १९६२ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०(२) अन्वये पाणीटंचाई काळात उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर व सूक्ष्म नियोजन करणे ही जिल्हाधिकारी यांची जबाबदारी आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ अन्वये पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य असून पाण्याचा अपव्यय टाळणे हे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे नियोजनात नमूद करण्यात आले आहे.

### कारवाईची मागणी

यांप्रकरणी तात्काळ दखल घेऊन जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग वाशिम, उपविभागीय अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, मं.पिर गटविकास अधिकारी, पं. स. मं.पिर यांना आदेशित करावे की, कालव्याद्वारे पाणी न सोडता जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा करण्याचा तांत्रिक आराखडा तयार करून तात्काळ अंमलबजावणी करावी व अमूल्य जलसंपदेची नासाडी थांबवण्याची मागणी केली आहे.

# शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत प्रश्नांची सरबत्ती; उमेदवारांच्या भूमिकेकडे शिक्षकांचे लक्ष!

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणूक ठरणार लक्षवेधी; शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर ठोस भूमिका मांडण्याचे उमेदवारांसमोर आव्हान

■ प्रतिनिधी | रिसोड ■

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांच्या प्रलंबित समस्या आणि त्यांच्या हक्कांचा मुद्दा पुन्हा चर्चेत येण्याची शक्यता आहे. शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विधान परिषद सदस्याकडून नेमक्या कोणत्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाते, शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी किती प्रभावी प्रयत्न होतात आणि शासनदरबारी त्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा कसा केला जातो, यावर या निवडणुकीत भर राहणार आहे.

शिक्षक मतदारसंघ हा शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणारा महत्त्वाचा मतदारसंघ मानला जातो. त्यामुळे या निवडणुकीत उमेदवारांची लोकप्रियता किंवा प्रचाराची धामधूम यापेक्षा शिक्षकांच्या प्रश्नांबाबत त्यांची भूमिका किती स्पष्ट आहे, याला अधिक महत्त्व प्राप्त होणार आहे.

### शिक्षकांच्या प्रश्नांवर कोण मांडणार ठोस भूमिका?

शिक्षकांच्या सेवाविषयक अडचणी, वेतनविषयक प्रश्न, जुनी पेन्शन योजना, सेवा-सुरक्षा, रिक्त पदे, शिक्षक भरती, शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय हस्तक्षेप आणि शाळांमधील विविध समस्या हे मुद्दे निवडणुकीच्या केंद्रस्थानी येऊ शकतात. या प्रश्नांवर केवळ आश्वासने देण्याऐवजी त्यांची सोडवणूक करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जाणार, हे उमेदवारांना स्पष्ट करावे लागणार आहे. शिक्षकांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविणे एवढीच प्रतिनिधीची जबाबदारी नसून, त्या मागण्यांवर निर्णय होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे शिक्षक मतदार उमेदवारांच्या कार्यपद्धतीचा, त्यांच्या पूर्वीच्या कामाचा आणि भविष्यातील नियोजनाचा विचार करून निर्णय घेतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### प्रचारातील घोषणांपेक्षा कृतीचा आराखडा महत्त्वाचा

निवडणुकीच्या काळात विविध आश्वासने दिली जातात; मात्र निवडणुकीनंतर शिक्षकांच्या प्रश्नांसाठी नेमके काय केले जाणार, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी विधान परिषदेत कोणते मुद्दे मांडले जातील, शासनाकडे कोणत्या मागण्या लावून धरल्या जातील आणि प्रलंबित प्रश्नांच्या निराकरणासाठी कोणती दिशा स्वीकारली जाईल, याकडे शिक्षकांचे लक्ष राहणार आहे.

# सातबारा, फेरफारसाठी कोतवाल बुक नक्कल नागरिकांची गैरसोय



■ प्रतिनिधी | शेलुबाजार ■

मंगरूळपीर तहसील कार्यालयात शासनाकडून डिजिटल कारभाराचा गाजावाजा केला जात असताना मंगरूळपीर तहसील कार्यालयातील QR मशीन बंद असल्याने शेतकरी आणि सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याची तक्रार समोर येत आहे. सातबारा उतारा, फेरफार आणि इतर महसुली कामांसाठी तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना या सुविधेअभावी गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे.

एकीकडे शेतकरी दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक संकटाचा सामना करत आहेत, तर दुसरीकडे शासकीय कार्यालयातील आवश्यक सुविधा बंद असल्याने नागरिकांच्या अडचणींत भर पडत आहे. QR मशीन बंद असल्यामुळे नागरिकांना पर्यायी पद्धतीने शुल्क भरावे लागत असेल आणि त्यासाठी अधिक रक्कम मोजावी लागत असेल, तर प्रशासनाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे.

# अडोळी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी एक कोटी वीस लाख रुपये मंजूर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथून जवळच असलेल्या अडोळी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी एक कोटी वीस लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. सविस्तर वृत्त असे की,अडोळी हे गाव वाशीम तालुक्यातील असून या गावी प्राथमिक आरोग्य केंद्र तोंडगांव अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे.या गावाची लोकसंख्या ही पाच हजार असून या गावाच्या परिसरात २० ते २५ गावे येत असून येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी इमारत नसल्याने अडोळी येथील व परिसरातील जनतेची आरोग्य हेळसांड होत होती.म्हणून अडोळी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व्हावे.अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीपराव देशमुख,राजकुमार पडघान व गावकऱ्यांच्या वतीने नेहमीच करण्यात आली होती.



यासाठी ग्रामपंचायत वतीने तत्कालीन सरपंच, सविता इढोळे, उपसरपंच भगवान इढोळे व ग्रामपंचायत सदस्य यांचे वतीने कर्तव्य दक्ष ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी तसे प्रस्ताव देखील संबंधितांना सादर केले होते.

यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी नेहमीच संबंधितांना निवेदने व पाठपुरावा केला.नंतर अडोळी येथील राहूल गव ई अभियंता आरोग्य विभाग मंत्रालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडे प्रस्ताव व मागणी केल्यानंतर लगेच राहूल गवई यांच्या माध्यमातून अडोळी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी एक कोटी वीस लाख रुपये मंजूर झाल्याचे आदेश जिल्हा परिषद वाशीम यांचेकडून दि.७ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित झाले आहेत.

यासाठी जिल्हा परिषदेचे ,माजी सदस्य दिलीपराव देशमुख, ग्रामपंचायत सरपंच सविता इढोळे, उपसरपंच भगवान इढोळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान .व कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी सतत पाठपुरावा व प्रयत्न केल्याने अडोळी येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी एक कोटी वीस लाख रुपये मंजूर झाले आहेत.

यासाठी माजी सरपंच नारायण इढोळे व तत्कालीन ग्रामपंचायत सदस्य यांनी सुद्धा सहकार्य केले.म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी ठोंबरे, यांनी ग्रामपंचायत ने सादर केलेल्या प्रस्तावाला मंजूरी दिली आहे.त्यामुळे त्यांचे अडोळी परिसरात कौतुक होत आहे.

# जलसंकटावर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची नितांत गरज!



■ प्रतिनिधी | वाशिम ■

यंदा पावसाळ्यातील दीर्घ खंडांमुळे आगामी काळात जलसंकटाची तीव्रता वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जलसंवर्धन, पाणी बचत आणि लोकसहभागातून विविध उपाययोजना राबविण्याचा निर्धार येथे आयोजित चर्चासत्रात करण्यात आला. घटस्थापनेच्या पर्वावर रविवार, ११ ऑक्टोबर रोजी जुनी आय.यू.डी.पी. कॉलनीतील श्री संत गजानन महाराज मंदिरात हे चर्चासत्र पार पडले. कार्यक्रमास नगराध्यक्ष अनिल केंदळे, ज्येष्ठ समाजसेवक गिरीशराव सारडा, डॉ. हरीश बाहेती, संस्थेचे अध्यक्ष दयाराम राऊत, अविनाश मारशेटवार, युवा सामाजिक कार्यकर्ते मयुर राऊत हायांच्यासह विविध क्षेत्रांतील महिला-पुरुषांची उपस्थिती लाभली. यावेळी डॉ. बाहेती यांनी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मोल लक्षात घेण्याचे आवाहन केले. जलसंकटावर मात करण्यासाठी केवळ प्रशासकीय उपाययोजनांवर अवलंबून न राहता नागरिकांनीही पुढाकार घेणे आवश्यक आहे.

# पाणीटंचाईच्या काळात हायड्रोपोनिक हिरवा चारा ठरू शकतो प्रभावी पर्याय!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान, वाढते तापमान आणि दीर्घ कोरड्या कालावधीमुळे वाशिम जिल्ह्यात पशुधनासाठी वर्षभर पुरेसा हिरवा चारा उपलब्ध करणे आव्हानात्मक ठरत आहे. विशेषतः पाणीटंचाईच्या काळात चारा उत्पादनावर मर्यादा येत असल्याने पशुधनाचे पोषण, आरोग्य आणि दुग्धोत्पादन टिकविण्यासाठी पर्यायी चारा व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान हे कमी जागेत आणि नियंत्रित पाणी वापरून हिरवा चारा उत्पादन करण्यासाठी एक उपयुक्त पूरक पर्याय ठरू शकते.

### मातीविरहित पद्धतीने अल्पावधीत चारा उत्पादन

हायड्रोपोनिक्स ही मातीविरहित उत्पादन पद्धती असून, यामध्ये ट्रे किंवा रॅकच्या साहाय्याने मका, गहू, बार्ली आदी धान्यांचे अंकुरण करून हिरवा चारा तयार केला जातो. योग्य दर्जाचे बियाणे, तापमान, आर्द्रता, स्वच्छता आणि पाणी व्यवस्थापन राखल्यास साधारणतः ७ ते १० दिवसांत अंकुरित चारा पशुखाद्यासाठी उपलब्ध होऊ शकतो. कमी जागेत उभ्या पद्धतीने उत्पादन घेता येत असल्याने अल्पभूधारक शेतकरी आणि मर्यादित जागा असलेल्या पशुपालकांसाठीही हे तंत्रज्ञान विचारात घेता येते.

### पाण्याचा कार्यक्षम वापर आणि चारा व्यवस्थापन

या पद्धतीत पाणी नियंत्रित प्रमाणात वापरता येत असल्याने पारंपरिक चारा पिकांच्या तुलनेत पाण्याची बचत करण्याची क्षमता असते. तथापि, प्रत्यक्ष बचत ही उत्पादन पद्धती, व्यवस्थापन आणि स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असते. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील पाणीटंचाईच्या परिस्थितीत पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याचा पूरक स्रोत निर्माण करण्यासाठी हायड्रोपोनिक्सचा वापर उपयुक्त ठरू शकतो. हायड्रोपोनिक चारा हा पशुधनाच्या संपूर्ण आहाराचा पर्याय नाही. संतुलित पशुखाद्य व खनिज मिश्रण यांचा योग्य समतोल राखणे आवश्यक आहे.

# महाराणी ताराबाई स्वराज्यरुपी अग्नीची धगधगती ज्वाला

**अकोला :** स्वराज्याच्या संरक्षणात महाराणी ताराबाई चे कार्य हे मोठे होते.महाराणी ताराबाईने संकट समयी स्वराज्या चे रक्षण करून स्वराज्याला घडविण्याचे महान कार्य केले. त्यामुळे स्वराज्याच्या एकंदर शिलेदारात महाराणी ताराबाई या मुकुटमणी होत्या असे प्रतिपादन व्याख्याता अँड स्नेहाताई लव्हाळे यांनी केले.स्थानीय जुने आरटीओ रस्त्यावरील मराठा सेवा संघाच्या जिजाऊ सांस्कृतिक भवनात मराठा सेवा संघ जिजाऊ ब्रिग्रेड व ३२ कक्षाच्या विद्यमाने नवरात्र निमित्ताने सुरू असलेल्या नऊ महानायीकांच्या जीवनकार्यावरील व्याख्यानमालेचे सोमवारी द्वितीय पुष्प अँड सरीताताई लव्हाळे यांनी गुंफले.

# महावितरण अभियंत्याला मारहाण प्रकरणी वैभव सरनाईक यांना चार वर्षांचा सश्रम कारावास

## वाशिम सत्र न्यायालयाचा निकाल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महावितरणच्या सहाय्यक अभियंत्याला मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याच्या प्रकरणात वाशिम जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती तथा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वैभव प्रतापराव सरनाईक यांना वाशिम येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने चार वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ आणि ३३२ अंतर्गत दोषी ठरवित न्यायालयाने दोन्ही कलमांखाली प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावला आहे. दंड न भरल्यास प्रत्येक दंडासाठी दोन महिन्यांच्या साध्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. पी. झापटे यांनी दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी हा निकाल दिला.

या प्रकरणातील माहितीनुसार, ३० ऑक्टोबर २०२३ रोजी वाशिम शहरातील पुसद नाका परिसरातील महावितरण कार्यालयात तत्कालीन सहाय्यक अभियंता संजय कौतिक माळी हे शासकीय कामकाज करीत होते. त्यावेळी वैभव सरनाईक हे कार्यालयात गेले. 'माझ्या लोकांना रोहित्र (डीपी) का देत नाही?' असा जाब विचारत त्यांनी सहाय्यक अभियंता संजय माळी यांच्या कानशिलात मारल्याची तक्रार करण्यात आली होती. या घटनेमुळे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला होता.

या घटनेनंतर सहाय्यक अभियंता संजय माळी यांच्या तक्रारीवरून वाशिम शहर पोलीस ठाण्यात वैभव सरनाईक यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३, ३३२, ५०४ आणि ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.खटल्याच्या सुनावणीदरम्यान आरोपीने गुन्हा नाकारला. सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच, घटनेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज असलेला पेनड्राइव्ह न्यायालयात पुरावा म्हणून सादर करण्यात आला. साक्षीदारांचे जबाब आणि सादर केलेल्या पुराव्यांचा विचार करून न्यायालयाने कलम ३५३ आणि ३३२ अंतर्गत आरोप सिद्ध झाल्याचे नमूद करीत आरोपीला दोषी ठरविले.

मात्र, भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ आणि ५०६ अंतर्गत असलेल्या आरोपांतून न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे. त्यामुळे या प्रकरणात सर्वच आरोप सिद्ध झालेले नसून, दोन कलमांखाली दोषसिद्धी झाली आहे.

न्यायालयाने कलम ३५३ आणि ३३२ या दोन्ही कलमांखाली प्रत्येकी चार वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

# शिरपूर येथे मूल्यवर्धन उपक्रमाचे एकदिवसीय उजळणी प्रशिक्षण संपन्न



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिरपूर येथील कै. कोंडबा तात्या ढवळे विद्यालयात केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेअंतर्गत शांतीलाल मुथा फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या मूल्यवर्धन उपक्रमाचे एकदिवसीय शिक्षक उजळणी प्रशिक्षण ९ ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडले. सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित या प्रशिक्षणात शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रमाची उद्दिष्टे, अध्ययन निष्पत्ती आणि प्रभावी अंमलबजावणी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणाचे उद्घाटन कै. कोंडबा तात्या ढवळे विद्यालयाचे प्राचार्य अनंत देशमुख यांच्या हस्ते झाले.

यावेळी शिरपूर केंद्राचे केंद्रप्रमुख सूरेकर, ज्येष्ठ मुख्याध्यापक आरु आणि जोशी मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान सुलभक नंदकुमार खाडे यांनी 'मूल्यवर्धन उपक्रमातील मूल्य, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती' या विषयावर मार्गदर्शन केले.

# हिसई येथे शेतकऱ्यांच्या पीक कापणीचा प्रश्न ऐरणीवर!

## १४ हेक्टर जमिनीवरील सोयाबीन कापण्यास मज्जाव केल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील हिसई येथे १४ हेक्टर शेतजमिनीवरील सोयाबीन पीक कापण्यावरून वाद निर्माण झाला आहे. ७७ वर्षीय शेतकरी गणपत सखाराम जाधव यांच्यासह संदीप दामोदर जाधव आणि रामभाऊ परशराम भारती यांनी आपल्या शेतातील पीक कापण्यास मज्जाव केला जात असल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी वाशिम आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार करून न्याय देण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार, ५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आवक क्रमांक ४३००२०४ अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीची प्रत जिल्हा पोलीस अधीक्षकांनाही देण्यात आली आहे. ६० ते ७० वर्षांपासून शेती करीत असल्याचा दावा तक्रारीनुसार, हिसई येथील गट क्रमांक १६७, २३ आणि १३२ मधील जमीन मूळतः बिरबलनाथ महाराज संस्थानाची आहे. संबंधित शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे कुटुंब मागील ६० ते ७० वर्षांपासून या जमिनीवर कुळ हक्काने शेती करीत आहे. संस्थानानेही त्यांच्या कुळ हक्काला मान्यता दिली होती, असा दावा शेतकऱ्यांनी केला आहे.

### जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडे न्यायाची मागणी

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, जून २०२६ मध्ये संस्थानाने ही जमीन कुळ हक्कासह पुणे येथील मनोज सहदेव जाधव यांना विकली. त्यानंतर जमिनीवरून वाद सुरू झाला. मनोज सहदेव जाधव आणि विनोद सहदेव जाधव हे जमिनीवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असून, आपल्या पिकाचे नुकसान करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. प्रकरण न्यायालयात; तरीही वाद कायम जमिनीच्या वादासंदर्भात शेतकऱ्यांनी मंगरूळपीर येथील दिवाणी न्यायालयात तात्पुरत्या मनाई आदेशासाठी दावा दाखल केला आहे. या प्रकरणाचा

क्रमांक रे.दि.मु. क्र. ६१/२०२६, गणपत विरुद्ध मनोज १ असा आहे. या प्रकरणाची पुढील तारीख १२ ऑक्टोबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. पीक कापण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांसोबत काय घडले? शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, यंदा संबंधित शेतात सोयाबीन आणि तूर पिकाची पेरणी करण्यात आली असून, सध्या पीक कापणीसाठी तयार आहे. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी शेतकरी आपल्या मुलासह आणि मजुरांसोबत पीक कापण्यासाठी शेतात गेले असता, दुसऱ्या पक्षातील एका व्यक्तीने तेथे येऊन मारहाण केली आणि पोलिसांना बोलावले, असा आरोप त्यांनी केला आहे. यानंतर मंगरूळपीर पोलिसांनी आपल्यालाच पोलीस ठाण्यात बसवून ठेवले आणि शेतात जाऊन सोयाबीन कापण्यास मनाई केली, असा दावा शेतकऱ्यांनी तक्रारीत केला आहे. तसेच, पीक कापायचे नाही, उपाशी राहावे लागले तरी चालेल आणि

पुन्हा शेताकडे जाऊ नये, असे सांगण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पोलीस ठाण्यात आपल्याकडून एका कागदावर स्वाक्षरी करून घेण्यात आल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांबाबत संबंधित पोलीस अधिकारी आणि दुसऱ्या पक्षाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. पीक खराब होण्याची भीती; शेतकरी चिंतेत सोयाबीनचे पीक कापणीसाठी तयार असून, वेळेत कापणी झाली नाही तर मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे. यापूर्वीही मंगरूळपीर पोलीस ठाण्यात आपल्याविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१७ ■ बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## पाण्याची टंचाई येण्याआधीच बोअरवेलचा सपाटा; अखेर प्रशासनाला जाग

### जनमाध्यमच्या वृत्तानंतर जिल्हाधिकाऱ्यांचा दणका; जिल्ह्यात नवीन बोअरवेल, विहिरींच्या खोदकामावर बंदी

**शहरात भूजलाची लूट सुरू असताना निर्बंध कागदावरच राहणार की प्रत्यक्ष कारवाई होणार**



**वर्धा जनमाध्यम :** भूजलसाठा आटण्याची वेळ येण्याआधीच शहरात बोअरवेल खोदण्याचा सपाटा सुरू झाला होता. पाणीटंचाईचे संकट डोक्यावर घोंगावत असताना भूगर्भातील पाण्याचा अमर्याद उपसा करण्याची जणू स्पर्धाच सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले होते. यासंदर्भात जनमाध्यमच्या मंगळवारच्या अंकात वृत्त प्रकाशित होताच जिल्हा प्रशासनाने हालचाली करत नवीन बोअरवेल आणि विहिरींच्या खोदकामावर बंदी घालण्याचे आदेश काढले. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या या निर्णयामुळे अनियंत्रित खोदकामाला चाप बसण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. मात्र, प्रशासनाचा हा आदेश प्रत्यक्षात किती प्रभावी ठरतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पाण्याचे संकट निर्माण झाल्यानंतर उपाययोजनांची धावपळ करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच खबरदारी घेणे आवश्यक असते. मात्र, भूजलसाठ्याच्या बाबतीत या मूलभूत तत्त्वाकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर येत होते. शहरातील विविध भागांत बोअरवेल खोदण्याची कामे सुरू असताना भाविष्यातील पाणीटंचाईचा विचार कोण करणार, असा प्रश्न उपस्थित होत होता. भूगर्भातील पाणी हा अमर्याद साठा नसून त्याचा बेसुमार उपसा झाल्यास त्याचे परिणाम नागरिकांना भोगावे लागतात. उन्हाळ्यात पाणी विकत घेण्याची वेळ येते, सार्वजनिक पाणीपुरवठ्यावर ताण वाढतो आणि सामान्य नागरिकांच्या पाण्याच्या हक्कावरही गदा येते.

जनमाध्यमने या परिस्थितीकडे लक्ष वेधल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने १३ ऑक्टोबर रोजी महत्त्वपूर्ण आदेश निर्गमित केला. जिल्ह्यातील संपूर्ण शहरी आणि ग्रामीण क्षेत्रात नवीन बोअरवेल खोदणे, नवीन विहिरींचे खोदकाम करणे तसेच अस्तित्वातील बोअरवेल आणि विहिरींचे अधिक खोलीकरण करण्यावर पुढील आदेशापर्यंत तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे.

**खासगी व्यक्तींपासून बांधकाम व्यावसायिकांपर्यंत निर्बंध**

या आदेशाची व्याप्ती व्यापक असून खासगी व्यक्ती, शेतमालक, गृहबांधकाम संस्था, बांधकाम व्यावसायिक, उद्योग, व्यावसायिक आस्थापना तसेच बोअरवेल खोदकाम करणारे कंत्राटदार, रिगमालक आणि यंत्रचालक यांना हे निर्बंध लागू राहणार आहेत. यापूर्वीपासून सुरू असलेली प्रतिबंधित खोदकामेही तातडीने थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता परवानगीशिवाय बोअरवेल खोदणाऱ्यांना प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन करता येणार नाही.

मात्र, येथेच प्रशासनासमोर खरे आव्हान आहे. आदेश काढणे ही पहिली पायरी असली, तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्यक्ष यंत्रणा रस्त्यावर उतरली पाहिजे. शहरात किंवा ग्रामीण भागात कुठे खोदकाम सुरू आहे, कोणाकडे वैध परवानगी आहे आणि आदेशानंतरही कुणी नियम धाब्यावर बसवत आहे का, याची तपासणी झाली पाहिजे. अन्यथा कागदावरील बंदी आणि प्रत्यक्षातील खोदकाम यातील अंतर कायम राहण्याची भीती आहे.

**शासकीय कामांना सूट; पण मनमानीला नाही**

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय पाणीपुरवठा कामांना नियमानुसार अपवाद देण्यात आला आहे. मात्र, त्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वलिखित प्रशासकीय मंजुरी, आवश्यक तांत्रिक शिफारस आणि लागू भूजलविषयक परवानग्या घेणे बंधनकारक आहे. केवळ शासकीय यंत्रणेमार्फत काम सुरू असल्याचे कारण देऊन कोणालाही आपोआप सूट मिळणार नाही, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

अस्तित्वातील बोअरवेल आणि विहिरींच्या नियमित वापरावर बंदी नसली, तरी नवीन खोदकाम आणि अधिक खोलीकरणावर निर्बंध राहणार आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

**आता केवळ आदेश नको, प्रत्यक्ष कारवाई हवी**

जनमाध्यमने मंगळवारच्या अंकात उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने घेतलेला हा निर्णय महत्त्वाचा आहे. मात्र, भूजलसाठ्याचे संरक्षण केवळ एका आदेशाने होणार नाही. अनधिकृत बोअरवेल खोदणाऱ्यांवर कारवाई, सुरू असलेल्या कामांची तपासणी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे.

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकरची व्यवस्था करणे, नागरिकांच्या तक्रारी ऐकणे आणि पाणीपुरवठ्यासाठी धावपळ करणे यापेक्षा पाण्याचे स्रोत आजच जपणे अधिक गरजेचे आहे. आज भूगर्भातील पाणी वाचविले नाही, तर उद्या नागरिकांना थेंबथेंब पाण्यासाठी संघर्ष करावा लागू शकतो.

जनमाध्यमच्या वृत्तानंतर जिल्हा प्रशासनाने बंदीचा आदेश काढला. आता या आदेशाची अंमलबजावणी किती कठोरपणे होते आणि भूजलसाठ्याच्या संरक्षणासाठी प्रशासन प्रत्यक्ष मैदानात किती उतरते, यावरच या निर्णयाचे यश अवलंबून राहणार आहे.

## सोयाबीनची गंजी पेटविली; शेतकऱ्याचे तीन लाखांचे नुकसान

### देवळी पोलिसांत अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल




**विजयगोपाल जनमाध्यम :** कापणी करून शेतात गंजी लावून ठेवलेल्या सोयाबीनला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना उघडकीस आली आहे. या आगीत शेतकऱ्याचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलातपूर येथील शेतकरी विनोद देविदास चौधरी यांची मौजा बाबापूर येथे पाच एकर शेती आहे. त्यांनी यंदाच्या खरीप हंगामात शेतात सोयाबीनची लागवड केली होती. मेहनत घेऊन पिकाची योग्य निगा राखल्याने सोयाबीनचे पीक समाधानकारक आले होते. कापणी केल्यानंतर त्यांनी सोयाबीनच्या गंजी शेतात लावून ठेवल्या होत्या. मळणीनंतर सुमारे ४० क्विंटल सोयाबीनचे उत्पादन हाती येईल, अशी अपेक्षा त्यांना होती. मात्र, अज्ञात व्यक्तीने सोयाबीनच्या गंजीला आग लावल्याने शेतकऱ्याच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले. या घटनेत सोयाबीन जळून खाक झाल्याने चौधरी यांचे अंदाजे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. कष्टाने पिकविलेल्या पिकाची डोळ्यादेखत राख झाल्याने शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला आहे.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर याप्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोयाबीनच्या गंजीला आग नेमकी कोणी आणि कोणत्या कारणातून लावली, याचा तपास पोलिस करीत आहेत.

## मागून आलेल्या वाहनाची दुचाकीला जोरदार धडक; एक ठार

### एक युवक गंभीर, धडक देणारा वाहनचालक पसार

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा-यवतमाळ महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच असून, सेलसुरा येथील कृषी शाळेजवळ मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला, तर दुसरा युवक गंभीर जखमी झाला. वर्ध्याच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकीला मागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता एवढी होती की, दोन्ही युवक रस्त्यावर फेकले गेले आणि दुचाकी काही अंतरापर्यंत घासत गेली. अपघातानंतर धडक देणारा वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. निरंजन मून असे मृत युवकाचे नाव असून, दुर्वेश मैसकार याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, देवळी तालुक्यातील दुर्गुडा येथील दुर्वेश मैसकार आणि निरंजन मून हे दोघे एमएच ३२ डब्ल्यू ३५१८ क्रमांकाच्या दुचाकीने वर्ध्याच्या दिशेने जात होते. मंगळवारी, १३ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांची दुचाकी सेलसुरा परिसरातील कृषी शाळेजवळ पोहोचली. त्याचवेळी मागून आलेल्या अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली.

या धडकेमुळे दुचाकीवरील एक युवक रस्त्यावर फेकला गेला, तर दुसरा रस्त्याच्या कडेला पडला. धडक बसल्यानंतर दुचाकीही काही अंतरापर्यंत घासत गेली. या भीषण अपघातात दोघांनाही गंभीर दुखापत झाली.

अपघाताची माहिती मिळताच देवळी रेल्वे क्रॉसिंगवर तैनात असलेले वाहतूक कर्मचारी आणि सावंगी मेघे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोन्ही जखमींना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी निरंजन मून याला मृत घोषित केले. दुर्वेश मैसकार याच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघात घडवून आणल्यानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. महामार्गावर मागून येणाऱ्या वाहनांच्या धडकेत युवकाचा बळी गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## चाकू गळ्याला लावून लूटमार; तीन अल्पवयीन ताब्यात

### दोन मोबाईल, दोन वाहने आणि चाकू जप्त

**वर्धा जनमाध्यम :** पैशांची देवाणघेवाण करून खाद्यपदार्थ घेऊन परतणाऱ्या कामगाराला तिघांनी रस्त्यात अडविले. गळ्याला चाकू लावून दोन मोबाईल आणि दोन हजार रुपये हिसकावून घेतले. एवढ्यावरच न थांबता एका आरोपीने चाकूने वार करून कामगाराला जखमी केले. वायगाव निपाणी येथील कॅनलजवळ १२ ऑक्टोबरच्या रात्री घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा तपास करत देवळी पोलिसांनी तीन अल्पवयीन विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून दोन मोबाईल, गुन्ह्यात वापरलेली दोन वाहने आणि चाकू जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वायगाव येथील संस्कार ॲग्रो सूतगिरणीत काम करणारा ३६ वर्षीय कामगार १२ ऑक्टोबर रोजी रात्री मित्रासोबत आईच्या खात्यात पैसे जमा करण्यासाठी वायगाव येथे गेला होता. पैसे जमा केल्यानंतर त्याने खाण्यापिण्याचे साहित्य घेतले आणि मित्रासह सूतगिरणीकडे परत निघाला. दरम्यान, सूतगिरणीच्या अलीकडे असलेल्या कॅनलजवळ तिघांनी त्यांचा रस्ता अडविला.

**वायगाव निपाणीतील घटनेने खळबळ**

तिघांनी चाकूचा धाक दाखवत कामगाराकडील दोन मोबाईल आणि दोन हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. यावेळी कामगाराच्या डाव्या कानाखाली चाकूने वार करण्यात आला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे कामगार जखमी झाला. घटनेनंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक संदीप कापडे यांच्या मार्गदर्शनाखाली देवळी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली.

तपासादरम्यान या गुन्ह्यात तीन अल्पवयीन विधिसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून फिर्यादीचे दोन मोबाईल, गुन्ह्यात वापरलेली दोन वाहने आणि एक चाकू जप्त केला आहे.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे देवळी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७८०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४), ३०९(६), ३(५) आणि ११५(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक संदीप कापडे व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कल्पेश मगरे करीत आहेत.

## कॅनलच्या प्रवाहाने हिरावला दोन वर्षांच्या चिमुकल्याचा जीव

### खेळता खेळता चिमुकला पाण्यात पडल्याचा अंदाज

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** घराच्या अंगणात बागडण्याचे, आजी-आजोबांच्या कुशीत खेळण्याचे वय असलेल्या अवघ्या दोन वर्षांच्या चिमुकल्याचा कॅनलच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ग्रामपंचायतीजवळ खेळत असताना तो आष्टी तलावाच्या कॅनलमध्ये पडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पाण्याच्या प्रवाहासोबत वाहत गेलेल्या स्वामी धीरज झाडे या चिमुकल्याचा मृतदेह घटनास्थळापासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर शेताजवळील पाइपला अडकलेल्या अवस्थेत आढळला. या हृदयद्रावक घटनेने पेठ अहमदपूर परिसरात शोककळा पसरली आहे.

पेठ अहमदपूर येथील रहिवासी शरद झाडे हे आपला दोन वर्षीय नातू स्वामी धीरज याला घेऊन ग्रामपंचायत परिसरात फिरण्यासाठी आले होते. यावेळी चिमुकला खेळण्यात रमला असताना ग्रामपंचायतीलगत असलेल्या आष्टी तलावाच्या कॅनलमध्ये गेल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, स्वामी घरी गेला असावा, असा समज झाल्याने सुरुवातीला त्याच्याकडे लक्ष गेले नाही. मात्र, काही वेळानंतर तो घरी नसल्याचे लक्षात येताच त्याचा शोध सुरू करण्यात आला.

परिसरात शोधाशोध सुरू असतानाच कॅनलच्या पाण्याच्या प्रवाहात तो वाहून गेल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. शोध सुरू असताना शेतापासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर एका शेताजवळील पाइपला चिमुकल्याचा मृतदेह अडकलेल्या अवस्थेत आढळून आला.

ही बाब समोर येताच परिसरात एकच खळबळ उडाली. अवघ्या दोन वर्षांच्या बालकाचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने नागरिकांमधून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी पवन देशमुख आणि धावुलकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

खेळण्या-बागडण्याच्या कोवळ्या वयातच स्वामीचा मृत्यू झाल्याने झाडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, कॅनल परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

## ३१ वर्षांपासून फरार आरोपीला एलसीबीने ठोकल्या बेड्या

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट पोलीस ठाण्यात १९९५ मध्ये दाखल झालेल्या घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यात तब्बल ३१ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोधून काढत बेड्या ठोकल्या. दिलीप नथुजी ढोरे (वय ५४, रा. साखरा कोलगाव, ता. वणी, जि. यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगणघाट पोलीस ठाण्यात १९९५ मध्ये गुन्हा क्रमांक १९५/१९९५ अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ४५७ आणि ३८० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील दिलीप ढोरे हा तेव्हापासून पोलिसांना हवा होता. त्याचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक समांतर तपास करीत होते. आरोपीबाबत ठोस माहिती उपलब्ध नसतानाही पथकाने तपासाची चक्रे फिरवली. गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी वणी तालुक्यातील साखरा कोलगाव येथे राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने साखरा कोलगाव येथे धाव घेतली. शोधमोहीम राबविल्यानंतर दिलीप ढोरे याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीला ताब्यात घेतल्याची माहिती त्याच्या नातेवाइकांना देण्यात आली असून, पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला हिंगणघाट पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. तब्बल तीन दशकांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या या गुन्ह्यातील आरोपीचा शोध लागल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासाची चर्चा होत आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू, पोलीस अंमलदार मनोज धात्रक, महादेव सानप, हर्षल सोनटक्के, अभिषेक नाईक तसेच सायबर सेलचे अक्षय राऊत यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारा निर्णय रद्द करा

### बोर प्रकल्पाच्या पाणी नियोजनावर शेतकऱ्यांमध्ये तीव्र रोष

**रब्बी हंगाम नको, खरीप हंगामासाठी दोन पाणी द्या; कुमारअप्पा पाणी पुरवठा संस्थेची मागणी**

**सेलू जनमाध्यम :** एका बाजूला दुष्काळाचे संकट आणि दुसऱ्या बाजूला सिंचनाच्या पाण्यावर मर्यादा बोर प्रकल्पाच्या पाणी नियोजनामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. सोडलेले पाणी शेतापर्यंत पोहोचण्यास आठ दिवस लागणार असतील, तर ३१ ऑक्टोबरची मुदत शेतकऱ्यांच्या कितपत उपयोगी पडणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



१२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीनंतर बोर प्रकल्पातून सिंचनासाठी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंतच पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सिंचन बंद राहणार असल्याने रब्बी पिकांची लागवड न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**पाणी सोडले; पण शेतापर्यंत पोहोचणार कधी**

कुमारअप्पा पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष मुकिंदा खोडे यांच्या म्हणण्यानुसार, सध्या सोडलेले पाणी सेलडोहपर्यंत पोहोचण्यासाठी किमान आठ दिवस लागतील. मग शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाणी मिळणार कधी, हा प्रश्न अनुत्तरित आहे. पाणी सोडण्याचा निर्णय झाला; मात्र त्याचा लाभ वेळेत मिळेल का, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे.

**रब्बी नको, खरीप तरी वाचवा**

रब्बी हंगामासाठी पाणी मिळाले नाही तरी चालेल; मात्र खरीप पिके वाचविण्यासाठी किमान दोन पाणी द्यावीत, अशी मागणी संस्थेने केली आहे. एका बाजूला पिके वाचविण्याची धडपड सुरू असताना दुसरीकडे पाण्याची मुदत मर्यादित ठेवण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे नुकसान वाढण्याची भीती आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या निर्णयाचा फेरविचार करावा, तर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी हस्तक्षेप करून खरीप हंगामासाठी दोन पाणी सोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## १२ दिवसांत ११ मृत्यू : समृद्धी महामार्गावरील अपघातांचे सत्र सुरूच

### चालक जखमी, सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावरील अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, मृत्यूच्या घटनांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. गेल्या बारा दिवसांत या महामार्गावर ११ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब समोर आली असतानाच मंगळवारी सकाळी येळाकेळी इंटरचेंजवर आणखी एक अपघात घडला. नागपूरहून मुंबईकडे लोखंडी पाइप घेऊन जाणारा भरधाव ट्रक महामार्गावर चढताना वळणावर उलटला. या दुर्घटनेत ट्रकचालक विनोद यादव जखमी झाले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ४० बीजी ५५८० क्रमांकाचा ट्रक लोखंडी मोठे पाइप घेऊन मुंबईतील जेएसडब्ल्यू कंपनीकडे जात होता. वर्धा-आर्वी मार्गाने आलेला हा ट्रक मंगळवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास येळाकेळी इंटरचेंजवरून समृद्धी महामार्गावर चढत होता. याचवेळी वळणाच्या मार्गावर मागून आलेल्या कारने ट्रकला ओव्हरटेक केले. या घडामोडीत चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि काही क्षणांतच पाइप वाहून नेणारा अवजड ट्रक रस्त्यावर उलटला.

अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. ट्रकचालक विनोद यादव जखमी झाले असून, त्यांना उपचारांची गरज भासली. महामार्गावर चढताना वळणावर घडलेल्या या दुर्घटनेमुळे पुन्हा एकदा अवजड वाहनांच्या सुरक्षित वाहतुकीचा आणि ओव्हरटेकिंगचा प्रश्न समोर आला आहे.

## बँकेत जाण्यासाठी घराबाहेर पडले, तीन दिवसांनी नाल्याजवळ मृतदेह

**वर्धा जनमाध्यम :** बँकेत जाण्यासाठी दुचाकीने घराबाहेर पडलेला ६२ वर्षीय शेतकरी तीन दिवसांपासून बेपत्ता होता. कुटुंबीयांकडून शोध सुरू असतानाच सोनेगाव (आबाजी) मार्गावरील वीटभट्टीपासून काही अंतरावर नाल्याजवळ त्याचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला. घटनास्थळी दुचाकीही क्षतिग्रस्त अवस्थेत मिळाली असून, मृताच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे समोर आले आहे. मधुकर विष्णू बाडे (वय ६२, रा. सोनेगाव आबाजी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मृत्यूमागील नेमके कारण काय, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मधुकर बाडे हे १० ऑक्टोबर रोजी देवळी येथे बँकेत जाणार असल्याचे सांगून एमएच ३२ झेड ४९४२ क्रमांकाच्या दुचाकीने घराबाहेर पडले. मात्र, बराच वेळ उलटूनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यांचा ठावठिकाणा लागत नसल्याने मुलगा विलास मधुकर बाडे यांनी देवळी पोलिस ठाण्यात वडील बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली.

देवळी पोलिसांकडून बेपत्ता शेतकऱ्याचा शोध सुरू असतानाच १३ ऑक्टोबर रोजी सकाळी सोनेगाव मार्गावरील वीटभट्टीपासून काही अंतरावर नाल्याजवळ त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी त्यांची दुचाकीही क्षतिग्रस्त अवस्थेत मिळाली. मृताच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे.

बँकेत जाण्यासाठी घराबाहेर पडलेल्या शेतकऱ्याचा तीन दिवसांनंतर मृतदेह आढळणे, दुचाकीचे नुकसान आणि डोक्याला झालेली गंभीर दुखापत यामुळे मृत्यूच्या परिस्थितीबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. हा अपघात आहे की यामागे अन्य काही कारण आहे, याबाबत अधिकृत निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही.

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# गेल्या ४१ वर्षात काँग्रेसचा गुजरातमध्ये एकही विजय नाही!

## अमित शाह यांचे राहुल गांधींना सडेतोड उत्तर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** गेल्या काही दिवसांपासून राहुल गांधी आणि विरोधकांची इंडिया आघाडी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगातील कथित अनियमिततेविरोधात आंदोलन करत आहेत. निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्या, ज्ञानेश कुमारांनी राजीनामा द्यावा, एव्हिं रद्द करावे, अशा विविध मागण्यांसाठी इंडिया आघाडीकडून राहुल यांच्या नेतृत्वात मोर्चे काढले जात आहेत. राहुल गांधींच्या याच विविध आरोपांना आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले. 'गुजरातमध्ये नुकत्याच तीन नगरपालिका आणि महानगरपालिकांसाठी निवडणुका पार पडल्या. यात दोन नगरपालिका आणि एका महानगरपालिकेतील एकूण १०४ जागांपैकी ९० जागा जिंकून भाजपाने दणदणीत विजय मिळवला. जे लोक निकालांसाठी ईव्हिं ला दोष देतात त्यांना सांगतो की, या निवडणुका बॅलेट पेपरवर झाल्या, पण तेथेही काँग्रेस हरली. एव्हिं २०२४ नंतरच लागू झाला. पण राहुल गांधी जेव्हापासून काँग्रेसचे प्रमुख नेते, पक्षाध्यक्ष झाले तेव्हापासून काँग्रेस पक्ष सातत्याने निवडणुका हरतच आहे.'

**गेल्या ४१ वर्षात काँग्रेसचा गुजरातमध्ये एकही विजय नाही!**

'गांधीनगर महानगरपालिकेत भाजपने ४४ पैकी ३८ जागा जिंकल्या. आम आदमी पक्षाने सर्व ३२ जागांवर निवडणूक लढवली, परंतु प्रत्येक जागेवरील अनामत रक्कम गमावली. गुजरातमधील हा प्रचंड विजय राज्यातील मतदारांचा मूड दर्शवतो आणि हे सिद्ध करतो की गुजरातचे मतदार नरेंद्र मोदीजींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. मागील निवडणुकीच्या तुलनेत गांधीनगर महानगरपालिकेत भाजपने आपल्या मतांचा वाटा १० टक्क्यांनी वाढवला आहे. काँग्रेस पक्षाने ४१ वर्षांत एकही निवडणूक जिंकलेली नाही. त्यांनी जिंकलेली शेवटची निवडणूक १९८५ मध्ये होती; तेव्हापासून त्यानंतर त्यांना गुजरातमध्ये सतत पराभवांना सामोरे जावे लागले आहे. हा एव्हिंचा निकाल आहे का? काँग्रेसला मोदींची लोकप्रियता पचत नाही. ज्या राज्यात एकेकाळी तुमची सत्ता होती, तिथे तुम्ही ४१ वर्षांत एकही निवडणूक जिंकू शकलेले नाही. काँग्रेसला गंभीर आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे,' असे अमित शाह म्हणाले.



**या निवडणुका राहुल गांधींसाठी एक धडा**

अमित शाह म्हणाले, 'देशभरातील तीन राज्यांमध्ये पोटनिवडणुका झाल्या. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पुदुचेरी. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पुदुचेरीमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. नौगावमध्ये भारतीय जनता पक्षाचा उमेदवार १,४२,००० मतांच्या फरकाने जिंकला; भाजपने ही जागा काँग्रेस पक्षाकडून हिसकावून घेतली. नंदीग्राममध्ये भाजपच्या उमेदवाराने ७६% मते मिळवून १,२२,००० मतांची मोठी आघाडी घेतली. पश्चिम बंगालमधील रेजीनगरमध्ये भाजपने ७५,००० हून अधिक मतांनी विजय मिळवत तृणमूलकडून ही जागा हिसकावून घेतली, तर पुदुचेरीमध्ये मित्रपक्ष एआयएनआरसीच्या एनडीए उमेदवाराने ८,४८२ मतांनी विजय मिळवला; काँग्रेसला केवळ २२३ मते मिळाली. राजस्थानमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षानेही दणदणीत विजय मिळवला. भाजपने ९०% महानगरपालिका, ६६% नगरपालिका आणि ६५% नगरपालिकांवर कब्जा केला आहे. या निवडणुका राहुल गांधींसाठी एक धडा आहेत.'

**२०२९ला देखील हरायची तयारी ठेवा...**

विशेष म्हणजे, राजस्थानमधील ८५% पेक्षा जास्त प्रभागांमध्ये आम आदमी पक्षाला आपली अनामत रक्कम गमवावी लागली. मला राहुल गांधींना हेही कळवायचे आहे की, त्रिपुरामध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये एनडीएने ७७.५% मतांच्या एकूण टक्केवारीसह सुमारे ४,००० जागा जिंकण्यात यश मिळवले.ज्यात ३,२४८ जागा आणि आणखी ९०० जागांचा समावेश आहे.तर काँग्रेस पक्षाला ४,६०० पैकी केवळ १४ जागा जिंकता आल्या. ३३ वर्षांपासून त्रिपुरामध्ये काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री जिंकलेला नाही. बंगालमध्ये काँग्रेस पक्षाला ५४ वर्षांपासून विजय मिळवता आलेला नाही. बंगाल, त्रिपुरा आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाला तीन, चार किंवा अगदी पाच दशकांपासून पराभवाला सामोरे जावे लागत आहे. मला श्री राहुल गांधी यांना थेट विचारायचे आहे: हा एसआयआरचा (SIR) परिणाम आहे का? एसआयआर केवळ २०२४ नंतरच लागू झाला. तुम्ही काँग्रेसचे प्रमुख नेते म्हणून—आणि त्यानंतर पक्षाचे अध्यक्ष आणि विरोधी पक्षनेते म्हणून जेव्हापासून पुढे आलात, तेव्हापासून पक्ष सातत्याने निवडणुका हरत आहे. मी राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हेही सांगू इच्छितो की, त्यांनी २०२९ मध्ये होणाऱ्या दारुण पराभवासाठी तयार राहावे. २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये एनडीए प्रचंड बहुमत मिळवणार असून, काँग्रेसचा हा सलग चौथा पराभव असणार आहे.' अशी आकडेवारी सांगत अमित शाह यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसला आरसा दाखवला.

# हे सरकारचे षडयंत्र, बळी पडू नका, फूट पडू देऊ नका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** 'जेव्हा कॉक्रोच जनता पार्टीला आंदोलनाची परवानगी देण्यात आली, तेव्हा अनेकांनी लगेचच असे षड्यंत्री विधाने केली की, आम्ही भाजपाचे हस्तक आहोत. काल 'इंडिया' आघाडीने एक



अभिजीत दीपकेचा लोकांना "मेसेज'

मोठे आंदोलन केले, पण १० ऑक्टोबरला आपण ज्या प्रकारची दडपशाही पाहिली, तशी इंडिया आघाडीच्या आंदोलनात कोणतीही कारवाई झाली नाही', असे सांगत सीजेपीचा संस्थापक अभिजीत दीपके याने समर्थकांना आणि विरोधी पक्षांना एक आवाहन केले आहे. अभिजीत दीपकेने एक पोस्ट लिहिली आहे. तो म्हणाला की, 'सरकार नेमके याच पद्धतीने आपल्याला एकमेकांविरुद्ध उभे करत आहे. वेगवेगळ्या आंदोलनांतील आंदोलकांना वेगवेगळी वागणूक देऊन, ते एकाच उद्देशासाठी लढत असलेल्या लोकांमध्ये संशय आणि अविश्वास निर्माण करत आहेत.'

**उद्या सरकार हेच उलटे करेल–**दीपके म्हणाला की, 'माझी सर्वांना एकच विनंती आहे की सरकारच्या या षडयंत्री डावांना ओळखा. आज ते एका आंदोलनाला परवानगी देऊ शकतात आणि दुसऱ्याला चिरडून टाकू शकतात. उद्या ते हीच भूमिका एकदम उलटी घेऊ शकतात. याचा मुख्य उद्देश सत्तेत असलेल्यांना प्रश्न विचारण्याऐवजी आपल्यातच एकमेकांबद्दल शंका निर्माण करणे हा आहे', असे अभिजीत दीपके म्हणाला.

**सरकारच्या जाळ्यात अडकू नका-** 'या षड्यंत्री डावांमुळे आपल्यात फूट पडू देऊ नका. विभागणी होऊ देऊ नका. आपण एकत्र येऊन उभे राहण्याचा काळ असताना, सरकारच्या या जाळ्यात अडकू नका. आपली लढाई ज्ञानेश कुमार आणि त्यांचे रक्षण करणाऱ्यांविरुद्ध आहे. या लक्ष्यावरून आपले लक्ष विचलित होऊ देऊ नका', असे आवाहन दीपकेने केले आहे.

## थंडीची चाहूल दूरच

# वर्षभरात कमाल तापमानात ७ अंशांची, तर किमान तापमानात ५ अंशांची वाढ

**भंडारा :** पावसाळा संपताच ऑक्टोबरमध्ये गारवा जाणवण्याची अपेक्षा असताना भंडाऱ्यात मात्र उन्हाचा चटका वाढू लागला आहे. मागील वर्षी १३ ऑक्टोबरला २८ अंश सेल्सिअस असलेले कमाल तापमान यंदा थेट ३५ अंशांवर पोहोचले आहे. वर्षभराच्या तुलनेत कमाल तापमानात तब्बल सात अंशांची, तर किमान तापमानात पाच अंशांची वाढ नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे



ऑक्टोबरमध्येही उन्हाची तीव्रता कायम असल्याचे चित्र आहे.भारतीय हवामान खात्याने दिलेल्या आकडेवारीनुसार, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी भंडाऱ्यात कमाल तापमान २८ अंश, तर किमान तापमान १४ अंश सेल्सिअस होते. यंदा १३ ऑक्टोबर २०२६ रोजी कमाल तापमान ३५ अंशांवर, तर किमान तापमान १९ अंशांवर नोंदविण्यात आले. दोन्ही वर्षांतील एकाच तारखेच्या तापमानाची तुलना केली असता दिवसाबरोबरच रात्रीच्या तापमानातही लक्षणीय वाढ झाल्याचे स्पष्ट होते.सामान्यतः ऑक्टोबरमध्ये पावसाळ्याची माघार आणि वातावरणातील बदलांमुळे सकाळी व रात्री काहीसा गारवा जाणवू लागतो. मात्र, यंदा कमाल आणि किमान तापमान दोन्ही वाढल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता अधिक जाणवत असून, दैनंदिन कामांसाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अभिषेक नामदास यांनी लोकसत्ताशी बोलताना सांगितले की, मागील पाच वर्षांत ऑक्टोबर महिन्यातील तापमानाची तुलना करता यंदा कमाल आणि किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे.

# राजीनाम्यानंतर वर्षभर समोर न आलेले माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड संघाच्या विजयादशमी उत्सवाला येणार

**नागपूर/प्रतिनिधी-** जगदीप धनखड यांनी गेल्या वर्षी जुलैमध्ये संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अचानक उपराष्ट्रपदीपदाचा राजीनामा देऊन सर्वांना धक्का दिला होता. त्यांनी आरोग्याच्या कारणास्तव राजीनामा देत असल्याचं त्यावेळी सांगितलं होतं. त्यांच्या राजीनाम्यानंतर वेगवेगळी चर्चा झाली. तसेच, राजीनामा दिल्यानंतर त्यांनी या सगळ्या घडामोडींवर मौन बाळगलं होतं. अनेक महिने ते माध्यमांसमोर आले नाहीत. त्यानंतर ते आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या समारोपानिमित्त नागपूर महानगराच्या वतीने मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी रेशीमबाग मैदानावर होणाऱ्या विजयादशमी उत्सवाला उपस्थित राहणार आहेत.

**विदेशी पाहुण्यांची उपस्थिती**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षातील समारोपीय विजयादशमीचा उत्सव २० ऑक्टोबरला रेशीमबाग मैदानावर साजरा होणार आहे. अर्धशतकाहून अधिक कालखंडापासून संघात जाणाऱ्यांपासून आताच्या पिढीतील तरुणांपर्यंत काही हजार स्वयंसेवक शहरातील या वैशिष्ट्यपूर्ण उत्सवाचे साक्षीदार होणार आहेत. या



कार्यक्रमाला माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि मुंबईतील इस्त्रायलचे महावाणिज्यदूत यानिव रेवाच हे निमंत्रित पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दैनिक जागरणचे मुख्य संपादक संजय गुप्ता प्रमुख अतिथी असतील. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे यावेळी उद्बोधन होणार आहे.

**हिंदू परंपरेनुसार कार्यक्रम**

हिंदू परंपरेत विजयादशमी हा सामूहिक शक्तिजागरणाचा उत्सव मानला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूर महानगराचा विजयादशमी उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आला आहे. संघाच्या शताब्दी वर्षाच्या समारोपाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मंगळवारी सकाळी ७.४० वाजता रेशीमबाग मैदानावर उत्सवाला सुरुवात होईल.

**सरसंघचालक कोणत्या मुद्यांना स्पर्श करणार**

सरसंघचालकाचे या कार्यक्रमात होणारे भाषण हे संघाची पुढील दिशा ठरवणारे असते. तसेच यातून स्वयंसेवकांनाही संदेश दिला जातो. यंदाचा विजयादशमी उत्सव विशेष असल्याने सरसंघचालक डॉ. भागवत कोणत्या मुद्यांना स्पर्श करतात, याकडे लक्ष राहणार आहे. संघ आपले शताब्दी वर्ष साजरे करत असताना, 'सामाजिक समरसता' दर्शवत मोठ्या प्रमाणात तळागाळातील उपक्रमांची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार देशभरात एक लाखाहून अधिक 'हिंदू संमेलन' आणि 'घर घर संपर्क अभियान' आयोजित करण्याची योजना आखली आहे. त्यामुळे शताब्दी सोहळ्यात सरसंघचालक काय बोलणार हे महत्त्वाचे राहणार असून मोठ्या उपक्रमांच्या घोषणेची शक्यता आहे.

# श्रावणबाळ योजनेतील अर्ज प्रक्रिया सुलभ करणार

## विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ

**मुंबई, दि. १३ :** श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतील अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासह केवायसी प्रक्रिया अधिक सोयीस्कर करण्यावर भर देण्यात येणार आहे. विशेष सहाय्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत करण्यात येत असल्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.मंत्रालय दालनात विशेष सहाय्य विभागाचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत श्रावणबाळ योजनेसह विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, केवायसी प्रक्रिया, अर्ज करताना लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्या दूर करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विभागाशी संबंधित योजनानुरूप आवश्यक निधीसाठी पुरवणी मागण्यांबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. योजनांसाठी आवश्यक आर्थिक तरतुदी आणि पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने विविध बाबींचा आढावा घेण्यात आला.शासनाच्या योजनांचा लाभ मिळवताना पात्र लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागू नये, अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी आणि योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी, यासंदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, सहसचिव सोमनाथ बागुल उपस्थित होते.

# 'ईएसआयसी'च्या लाभ व सेवांच्या व्यापक प्रसारासाठी डिजिटल सुविधा

## कामगार मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई, दि. १३ :** कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (ईएसआयसी) लाभ व सेवांची माहिती विमाधारकांपर्यंत व्यापकपणे पोहोचविण्यासाठी डिजिटल सुविधा महत्वाच्या ठरणार आहेत, असे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले . विकसित क्यूआर कोड आणि माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करताना ते बोलत होते. क्यूआर कोडच्या माध्यमातून विमाधारकांना ईएसआयसीच्या विविध लाभांसह आरोग्य सुविधांची सर्वसमावेशक माहिती उपलब्ध होणार आहे. कामगार मंत्री फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली १२ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत क्यूआर कोड आणि एसएमएस सेवेद्वारे माहिती प्रसारित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार ईएसआयसीच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाने लाभ व सेवांची माहिती असलेल्या माहिती, शिक्षण व संवादविषयक पुस्तिका मुद्रित केल्या आहेत. या पुस्तिकांचे सर्व कर्मचारी राज्य विमा योजना रुग्णालयांमधून वितरण करण्यात येणार आहे. मुंबई प्रादेशिक कार्यालयाने विकसित केलेल्या क्यूआर कोडमध्ये ईएसआयसीचे लाभ, नियोक्ता व कर्मचारी मार्गदर्शिका, शाखा कार्यालये, डीसीबीओ, दवाखाने, कर्मचारी राज्य विमा रुग्णालये, आयएमपी तसेच संलग्न रुग्णालयांची माहिती समाविष्ट आहे. व्यापक प्रसिद्धीसाठी हा क्यूआर कोड सर्व क्षेत्रीय कार्यालये, महाराष्ट्र ईएसआय सोसायटी तसेच नियोक्ता व कर्मचारी प्रतिनिधींना उपलब्ध करून देण्यात आला आहे. विमाधारकांशी एसएमएसद्वारे संपर्क साधण्याची कार्यवाही मंजूर राष्ट्रीय धोरण आणि निर्धारित वापरानुसार ईएसआयसी मुख्यालयाकडून केंद्रीय स्तरावर केली जात आहे.

# राज्यात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविणार

**पुणे/प्रतिनिधी-** राज्यातील काही भागांमध्ये पर्जन्यमानातील तूट आणि खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम लक्षात घेता, आगामी काळात पशुधनासाठी हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभरात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविण्यात येणार आहे. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी यासंदर्भात प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांना मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. या अभियानांतर्गत चारा जतन, पीक अवशेषांचा योग्य वापर, चाऱ्यावर प्रक्रिया, मुरघास निर्मिती आणि पर्यायी चारा उत्पादन याबाबत पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.संभाव्य टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी, उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करून चाऱ्याची उपलब्धता वाढविणे आणि त्याची नासाडी रोखणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

**संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाची पूर्वतयारी**

पीक अवशेषांचे संकलन व संवर्धन ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर आणि हरभरा आदी पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणारा कडबा, भुसा, पेंढा व धाटे यासारख्या पीक अवशेषांचे योग्य संकलन आणि सुरक्षित साठवणूक करण्यावर अभियानात भर देण्यात येणार आहे. हे अवशेष जाळणे किंवा त्यांची नासाडी होणे टाळून, त्यांचे पोषणमूल्य वाढविण्यासाठी आवश्यक प्रक्रिया करण्याबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले जाईल. पावसापासून संरक्षण, योग्य आर्द्रता, बुरशी प्रतिबंध आणि कोरड्या जागेत साठवणूक या बाबींची प्रात्यक्षिकेही आयोजित करण्यात येणार आहेत.

निकृष्ट व वाळलेल्या चाऱ्याची उपयुक्तता वाढविण्यासाठी शिफारशीनुसार प्रक्रिया पद्धतींची माहिती देण्यात येईल. कडबा व पेंढ्यावर युरिया प्रक्रिया करण्याचे शास्त्रोक्त प्रशिक्षण, तसेच चाऱ्याची नासाडी कमी करण्यासाठी कडबाकुट्टी यंत्राच्या वापराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.हिरवा चारा उपलब्ध असलेल्या भागांमध्ये मुरघास निर्मितीची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये हायड्रोपोनिक युनिट विकसित करून कमी खर्चात हिरवा चारा तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात येईल. तसेच पशुवैद्यकीय संस्थांमार्फत अझोला बेड तयार करून त्याचा पशुआहारातील वापर आणि उपयुक्तता याबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले जाणार आहे.सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना कमी कालावधीत आणि कमी पाण्यात वाढणाऱ्या चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. धरणे व तलावांतील पाणी ओसरल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या गाळपेरा क्षेत्रात चारा पेरणी करण्याबाबतही नियोजन करण्यात येणार आहे.

# गणेशोत्सव संपला, पण बाप्पाची गोष्ट वर्षभर सुरू राहणार!-आशिष शेलार

**मुंबई, दि. १३ :** गणेशोत्सवाचे दहा दिवस संपले तरी बाप्पाशी असलेले भावनिक नाते आणि महाराष्ट्रातील गणेश परंपरेचा समृद्ध वारसा वर्षभर जतन करण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या 'Bappa.org' या डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून राज्यातील घराघरांतील गणेश परंपरा, कथा, आठवणी आणि ६४ कलांची नोंद केली जाणार आहे. नागरिकांना आपल्या कुटुंबातील परंपरा, गणेशोत्सवाच्या आठवणी, लोककला आणि सांस्कृतिक ठेवा या व्यासपीठावर नोंदवून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जगापर्यंत पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २९ सप्टेंबर २०२६ रोजी या व्यासपीठाचा जागतिक शुभारंभ करण्यात आला. शुभारंभानंतर १ ऑक्टोबरपर्यंत या व्यासपीठावर ३२ हजार २३९ नागरिकांनी नोंदणी केली असून १८ हजार २९ कथा नोंदविण्यात आल्या आहेत. या उपक्रमांतर्गत आपल्या घरातील गणेश परंपरा आणि आठवणींची नोंद करणाऱ्या सुमारे १८ हजार नागरिकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गणेशोत्सवापुरते मर्यादित न राहता वर्षातील ३६५ दिवस महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरांचे दस्तऐवजीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. 'बाप्पा फक्त दहा दिवसांचा नाही. वर्षाचे ३६५ दिवस, घरोघरी बाप्पा' हा या मोहिमेचा मुख्य संदेश आहे. प्रत्येक घर, कुटुंब, गणेश मंडळ, मंदिर आणि समाजसमूहाशी जोडलेल्या गणेश परंपरांची नोंद करून हा वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्यावर या उपक्रमाचा भर आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २९ सप्टेंबर रोजी झालेल्या जागतिक शुभारंभ सोहळ्यात हे व्यासपीठ काळाची गरज असल्याचे नमूद केले होते. राज्यातील सुमारे ४० हजार गावांपर्यंत 'बाप्पा रथ'च्या माध्यमातून या उपक्रमाचा संदेश पोहोचविण्याची संकल्पना त्यांनी मांडली.

# प्रशासनाने पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे–मंत्री अतुल सावे

**मुंबई, दि. १३:** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा प्रशासनाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे, असे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले. संभाव्य पाणी टंचाईच्या पार्शवभूमीवर गठित जिल्हास्तरिय सनियंत्रण समितीची पालकमंत्री सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात ऑनलाईन बैठक झाली. यावेळी नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महानगरपालिकेचे आयुक्त महेश डोईफोडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य साटम, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता इ. मा. चिश्ती आदी उपस्थित होते. नांदेड जिल्ह्यातील १०४ प्रकल्पात सध्या ६८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. मंजूर पाणीसाठ्याव्यतिरिक्त प्रत्येक प्रमुख जलाशयाच्या उपलब्ध जिवंत पाणीसाठ्यापैकी किमान १० टक्के साठा आपत्कालीन साठा म्हणून राखून ठेवण्यात यावा. बफर साठा हा अनपेक्षित पर्जन्यमानातील घट, दीर्घ कोरडा कालावधी वाढणे किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यासाठी राखीव राहील. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे. शहरातील उद्याने, स्टेडियम यांच्यासाठी पाण्याचा वापर टाळावा, औद्योगिक वसाहतींनी ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर करावा, असे निर्देश मंत्री सावे यांनी यावेळी दिले. जिल्हा प्रशासनाने अवैध पाणी जोडणीवर तत्काळ कारवाई करावी, महापालिका क्षेत्रात पाणी गळतीवर नियंत्रण आणावे, मार्च-एप्रिल महिन्यात ज्या ठिकाणी अधिक पाणी टंचाई निर्माण होईल, अशा गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नियोजन करावे, असे निर्देश मंत्री सावे यांनी दिले. जिल्हा प्रशासनाने प्रत्येक महिन्याला टंचाईचा आढावा घेऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. बैठकीत जिल्ह्यातील सर्व मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांमधील सद्यस्थितीतील उपलब्ध उपयुक्त जलसाठा व मृत साठ्याचा आढावा घेण्यात आला.

# कृषिपंपांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण प्रत्येक जिल्ह्यात 'मिशन मोड'वर

## नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदला- अध्यक्ष श्री. लोकेश चंद्र यांचे आदेश

**नागपूर/प्रतिनिधी-** दुष्काळी परिस्थितीत राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात १ हजार नवीन वितरण रोहित्र व 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' तसेच 'कॅपॅसिटर बँक' खरेदीसाठी जिल्हानिहाय २० कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. १२) सर्व जिल्ह्यांचा आढावा घेतला आणि ही सर्व कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करण्याचे आदेश दिले.

मुंबई येथील 'प्रकाशगड' मुख्यालयात आयोजित बैठकीमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रत्येक जिल्ह्यातील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके बुधवार (दि. १४) पर्यंत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश दिले. या निधीमधून होणाऱ्या वीजयंत्रणेच्या सक्षमीकरणाच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही तसेच नादुरुस्त किंवा बंद पडलेले रोहित्र तातडीने बदलण्यात यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह कार्यकारी संचालक तसेच सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने कृषिपंपांना आणि कृषी वीजवाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून आवश्यकतेनुसार विद्यमान ६३ केव्हीएऐवजी १०० केव्हीए क्षमतेचे तसेच अतिरिक्त सिंगल पोल रोहित्र उभारण्यात येणार आहे. यासोबतच कृषी वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना २४ तास वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी 'स्पेशल डिझाईन रोहित्रे' (एसडीटी) बसविण्यात येणार आहेत. तर योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्रांमध्ये आणि वीजवाहिन्यांवर आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँक्स बसविण्यात येणार आहेत.

विशेष निधीमधील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी दि. १४ ऑक्टोबरपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करावेत. दुष्काळी परिस्थितीत रोहित्र बिघाड व इतर तातडीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २४ तास सुरु असणारी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्याचे निर्देश यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिले. राज्य शासनाच्या विशेष निधीमधून केवळ कृषीपंपांचा आणि कृषी वाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा सक्षम करण्यासाठीच कामे प्रस्तावित करावीत. या निधीचा अन्यत्र वापर करू नये असे संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी स्पष्ट केले. चालू रब्बी हंगामातच शेतकऱ्यांना सुरळीत व दर्जेदार वीज मिळेल यासाठी ही कामे निर्धारित गुणवत्ता व तांत्रिक मानकांचे तंतोतंत पालन करून वेळेत पूर्ण करा असे निर्देश त्यांनी दिले. याबाबत मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक क्षेत्रीय कार्यालयांना यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्याचे संचालक श्री. धनंजय औंढेकर यांनी यावेळी सांगितले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विद्यार्थी आंदोलन आणि आयोग

सुशासन, पारदर्शकता आणि सामाजिक न्यायाचे हे धडे अभ्यासत सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणारा विद्यार्थी ज्या आयोगाच्या परीक्षेची तयारी करतो, त्याच आयोगाच्या पेपरफुटीची बातमी वाचतो तेव्हा ढासळणारा विश्वास राज्याच्या संपूर्ण भरतीव्यवस्थेवरचा असतो. पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर गेल्या अकरा दिवसांहून अधिक काळ जमलेले उमेदवार हाच प्रश्न विचारत होते. आता एमपीएससी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत राज्य सरकार आणि विद्यार्थ्यांचे एकमत झाल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे; पण या आंदोलनाची पार्श्वभूमी तपासली तर चित्र अधिक स्पष्ट होते. मार्च २०२६ मध्ये अन्न व औषध प्रशासन विभागातील ड्रग्ज इन्स्पेक्टर (गट-ब) पदांसाठी सहा केंद्रांवर झालेल्या प्राथमिक परीक्षेला सुमारे ४४ हजार उमेदवार बसले होते. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांनंतर मुंबई गुन्हे शाखेच्या तपासात आयोगाचे अवर सचिव, दोन सहाय्यक कक्ष अधिकारी, एका कोचिंग अकादमीचे संचालक आणि काही उमेदवार असे एकूण अकरा जण अटकेत आहेत. ऑगस्ट अखेरीस आयोगाने ती भरतीच रद्द करून नव्या परीक्षेची घोषणा केली. याशिवाय जून-जुलैमध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये संगणकीय परीक्षा पद्धतीला विरोध झाला, २०२५च्या मुख्य परीक्षेतील वर्णनात्मक उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाबाबत शंका उपस्थित झाल्या आणि सप्टेंबर अखेरीस तीन प्रमुख परीक्षा पुढे ढकलल्या गेल्या. पुढे ढकललेली परीक्षा म्हणजे पुन्हा वर्षभराची प्रतीक्षा, वाढता खर्च आणि वयोमर्यादेची चिंता. न्यायालयीन चौकशी, संशयित अधिकाऱ्यांच्या कारकिर्दीतील परीक्षांचे फॉरेन्सिक ऑडिट, निश्चित परीक्षा वेळापत्रक, हजारो रिक्त पदांची भरती, जानेवारीच्या गट-क परीक्षेतील जागावाढ, परीक्षा शुल्कातील त्रास कमी करणे, विषयतज्ज्ञांकडून मूल्यांकन आणि जबाबदारांवरील कारवाई, या विद्यार्थ्यांच्या मागण्या न्याय्य होत्या. मात्र, चूक घडली ती मांडण्याच्या पद्धतीत. पुण्यात विद्यार्थ्यांचे तीन गट वेगवेगळ्या मागण्या घेऊन बसले होते. एका गटाला अध्यक्षांचा राजीनामा, काहींना पूर्वीची बहुपर्यायी पद्धत परत हवी होती, तर काहींना २०२५ची पद्धत कायम ठेवायची होती. त्यामुळे सर्वांना मान्य असे भरती वेळापत्रकाचे मुद्दे मागे पडले. दुसरे म्हणजे संपूर्ण आयोगच दोषी असल्याची सरसकट भाषा वापरली गेली; पण आयोग ही घटनेने बांधलेली संस्था असल्याने 'नष्ट करा' ही भूमिका कायद्यात अंतर्भूत नाही. नागरिकांना शांततापूर्ण सभा-मोर्चा काढण्याचा मूलभूत अधिकार आहे; पण तो योग्य निर्बंधांच्या अधीन आहे. पुणे पोलिसांनी परवानगी रद्द केल्यानंतर आंदोलन बेकायदा ठरवले, १५ आंदोलकांविरुद्ध गुन्हे दाखल झाले. नंतर सरकारने ते मागे घेण्याचे आश्वासन दिले; पण यातून चळवळीची नैतिक शक्ती क्षीण झाली. तसेच अमरावतीत सरकारच्या सुधारणा समितीवर बहिष्कार टाकून हातात आलेला संवादाचा मार्ग बंद करण्यात आला. यातच आंदोलनातील राजकीय सहभागाचा मुद्दा येतो. जून ते ऑगस्टपर्यंत हा लढा विद्यार्थ्यांचा होता; सप्टेंबरनंतर विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे आमदार रोहित पवार पुण्यातील आंदोलनाचे म्होरके होते. काँग्रेसने पाठिंबा दिला, तर मनसेचे राज ठाकरे आंदोलनस्थळी गेल्याने मागण्यांना व्यासपीठ मिळाले; पण ७ ऑक्टोबरला मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या पाचही मागण्या आधीच मान्य केल्याचा दावा करत 'या आंदोलनाला आता राजकीय वळण आले आहे' असे जाहीरपणे स्पष्ट केले. कोणाला सोबत घ्यायचे हे विद्यार्थ्यांचे स्वातंत्र्य आहे; पण चेहरा विद्यार्थ्यांचाच राहावा, ही अपेक्षाही रास्त आहे. सरकारच्या निर्णयांचा घटनाक्रमही तपशिलात पाहायला हवा. सप्टेंबरमध्ये अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील सुधारणा समितीने राज्यभरात सुमारे १,१०० उमेदवारांचे म्हणणे ऐकले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करून कलम ३१७ अंतर्गत चौकशीची तयारी, आयोगाच्या सचिवांची तत्काळ बदली, परीक्षा ऑफलाइनच घेणे, विद्यार्थ्यांशी चर्चा केल्याशिवाय पद्धती न बदलणे व गट-क परीक्षेच्या जागा वाढविण्याचे आश्वासन दिल्यानेच २ ऑक्टोबरचे आंदोलन तात्पुरते मागे घेतले गेले आणि सचिवांची बदली झाली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांना कलम ३१७ची शिफारस केली; अध्यक्ष हे घटनात्मक पद असल्याने हटविण्याचा अधिकार राज्य सरकारकडे नाही, हेही सरकारने स्पष्ट केले. अध्यक्षांना सरकार सहजपणे हटवू शकत नाही का? घटनेचे उत्तर स्पष्ट आहे. अनुच्छेद ३१५ प्रत्येक राज्यात लोकसेवा आयोगाची स्थापना अनिवार्य करते. अनुच्छेद ३१६ नुसार अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक राज्यपाल करतात. अनुच्छेद ३१७ नुसार अध्यक्ष किंवा सदस्य हटवता येतात ते 'गैरवर्तन' या कारणावरून आणि तेही सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीनंतर राष्ट्रपतीच्या आदेशानेच. राष्ट्रपतींनी संदर्भ दिल्यावर न्यायालय चौकशी करून अहवाल देते. दिवाळखोरी, बाहेरची वेतनाची नोकरी किंवा कायमचे शारीरिक-मानसिक अपात्रत्व अशा बाबींमध्ये तर राष्ट्रपती थेट कारवाई करू शकतात. संदर्भप्रत्यक्ष गेल्यावरच राज्यपाल निलंबन करू शकतात. हे संरक्षण म्हणजे 'काहीच करता येणार नाही' असे नाही; २००६ ते २००९ या काळात छत्तीसगड लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांविरुद्ध नेमकी हीच प्रक्रिया चालली होती. पेपरफुटीचा कथित प्रकार घडला तेव्हा विद्यमान अध्यक्षांनी कार्यभार स्वीकारला नव्हता, असे सरकारचे म्हणणे असल्याने ही मागणी वैयक्तिक पातळीवर न नेता न्यायालयीन चौकशीच्या मार्गाने पुढे नेणे अधिक योग्य ठरते. म्हणजे, नाराजी असली, तरी आवडीनुसार हटवता येत नाही; पण गैरवर्तन सिद्ध झाल्यास कारवाई टाळता येत नाही.

# गौडबंगाल 'युपीआय' मीटरचे

**१५ ऑक्टोबर पासून दुकानदारांना २,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम यूपीआयने दिली, तर दुकानदाराचे ०.४ टक्के कापले जातील. बहुतांश यूपीआय व्यवहार २,००० रुपयांखालचे आहेत, म्हणून अनेकांना शुल्क लागणार नाही, असा दावा केला जात असला तरी वस्तुस्थिती भिन्न आहे.**

एक जानेवारी २०२० पासून, म्हणजे गेली सहा वर्षे, यूपीआयद्वारे मोबाईलवरून होणारे पेमेंट मोफत होते. ती सरकारची मेहेरबानी नव्हती, तो कायदा होता. पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स ॲक्ट, २००७ च्या कलम १०-ए द्वारे बँकांना यूपीआय आणि ''रुपे'' पेमेंटवर एमडीआर घेण्यास मनाई केली होती. एमडीआर म्हणजे प्रत्येक डिजिटल पेमेंटवर बँक दुकानदाराकडून कापून घेते तो हिस्सा. ६ ऑगस्ट २०२६ रोजी लोकसभेने कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ कोणतीही चर्चा न करता आवाजी मतदानाने मंजूर केले, आणि ही मनाई काढून टाकली. हे धन विधेयक असल्याने राज्यसभा फक्त शिफारस करू शकत होती, ते रोखू शकत नव्हती. याच विधेयकाने परदेशी इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांना २०४०-४१ पर्यंत करसवलत दिली, आणि भारतातील डेटा केंद्रांच्या सेवा घेणाऱ्या परदेशी कंपन्यांसाठी करविषयक अटी सैल केल्या. परदेशी कंपन्यांना सवलत, आणि देशी दुकानदारावर मीटर. राज्यसभेत अर्थमंत्र्यांनी स्पष्ट सांगितले की यूपीआयवर कोणताही कर नाही, ही तर 'केवळ सक्षम करणारी तरतूद' आहे. अवघ्या पाच आठवड्यांत त्या तरतुदीचे रूपांतर वसुलीत झाले.

१५ ऑक्टोबर २०२६ पासून दुकानदार/व्यावसायिक यांना २,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम यूपीआयने दिली, तर दुकानदाराचे ०.४ टक्के कापले जातील. १०,००० रुपयांवर ४० रुपये, आणि त्यावर ७ रुपये २० पैसे जीएसटी कर वेगळा. रेल्वे, मोबाईल सेवा, विमा, इंधन आणि शेती निविष्ठा, म्हणजे बियाणे, खते आणि कीडनाशके, यांच्या प्रत्येक पेमेंटमागे सरसकट ५ रुपये. म्हणजे जिथून पेरणी सुरू होते, त्या कृषी सेवा केंद्राला पहिल्याच फेरीत मीटर लागले आहे. याविरोधातील जनहित याचिकेवर २८ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नाही, पण या शुल्काचा कायदेशीर आधार काय, हे प्रतिज्ञापत्रावर स्पष्ट करायला सरकारला सांगितले. केंद्र, रिझर्व्ह बँक आणि एनपीसीआय यांना चार आठवड्यांत उत्तर द्यायचे आहे. म्हणजे सुनावणी चालू असतानाच १५ ऑक्टोबरला मीटर सुरू होणार. दुकानांवरील ९६ टक्क्यांहून अधिक यूपीआय व्यवहार २,००० रुपयांखालचे आहेत, म्हणून बहुतेकांना शुल्क नाही, असा सरकारचा दावा आहे. पण शेतकऱ्याची हंगामातील बियाणे, खते आणि औषधांची एकत्रित खरेदी बहुतेक वेळा २,००० रुपयांपेक्षा जास्तच असते. म्हणजे सूट मिळते छोट्या खरेदीला, आणि मीटर लागते शेतकऱ्याच्या खरेदीला. शिवाय, या शुल्कामुळे छोटे दुकानदार पुन्हा रोखीकडे वळतील, असा इशारा किरकोळ व्यापाऱ्यांच्या संघटनेनेच दिला आहे.

केंद्र सरकार म्हणते, यूपीआय मोफत चालवणे परवडत नाही. पण हेच केंद्र सरकार बँकांना आणि ॲप्सना अनुदान देऊन यूपीआय मोफत ठेवत होते. हे अनुदान २०२१-२२ मधील १,३८९ कोटी रुपयांवरून २०२३-२४ मध्ये ३,६३१ कोटी रुपयांवर गेले होते. नंतर ते कापून भार दुकानदारांवर ढकलला. ही आर्थिक मजबुरी नाही, सत्तेच्या दंडेलशाहीने घेतलेला हा राजकीय निर्णय आहे. आणि हे शुल्क जाणार कुठे? सप्टेंबर २०२६ मध्ये यूपीआयवर २,४०७ कोटी व्यवहार झाले आणि त्यांचे मूल्य २९.३७ लाख कोटी रुपये होते. हे व्यवहार गेल्या वर्षीपेक्षा २३ टक्क्यांनी वाढले आहेत. रोजचे व्यवहार पहिल्यांदाच ८० कोटींच्या पुढे गेले. ऑगस्टच्या आकडेवारीनुसार यातील सुमारे ४६ टक्के व्यवहार अमेरिकेतील




वॉलमार्टच्या मालकीचे फोन-पे हाताळते, आणि सुमारे ३२ टक्के गुगल-पे. पेटीएम धरले तर फक्त तीन ॲप्सकडे ८६ टक्के व्यवहार आहेत. नवे शुल्क बँका, पेमेंट कंपन्या आणि याच ॲप्समध्ये वाटले जाणार आहे. जनतेने बांधलेल्या रस्त्यावर टोलनाका उभा राहिला आहे, आणि टोलचा एक हिस्सा अमेरिकेत जाणार आहे. एकट्या फोन-पे ला या शुल्कातून वर्षाला सुमारे ७०० कोटी रुपये मिळतील, असा अंदाज आहे. म्हणजे दिवसाला जवळपास २ कोटी रुपये.

### निर्णय दिल्लीत, अटी वॉशिंग्टनच्या?

हा निर्णय नेमका कोणाच्या सांगण्यावरून झाला? घटनाक्रम पाहा. ६ फेब्रुवारी २०२६ च्या भारत-अमेरिका संयुक्त निवेदनात भारताने अमेरिकी वस्तू आणि सेवांच्या मार्गातील बिगर-शुल्क अडथळे दूर करण्याचे आणि डिजिटल व्यापाराचे नियम ठरवण्याचे मान्य केले. मार्च २०२६ मध्ये अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने (यूएसटीआर) परदेशी व्यापार अडथळ्यांवरील वार्षिक अहवालात भारताच्या डिजिटल पेमेंट धोरणांवर बोट ठेवले. अमेरिकी पेमेंट कंपन्यांना यूपीआयमध्ये बरोबरीची संधी मिळत नाही, अशी तक्रार त्यात होती. शून्य एमडीआरमुळे व्हिसा आणि मास्टरकार्डसारख्या अमेरिकी कार्ड कंपन्यांचे उत्पन्न घटले, हा मुद्दाही त्या अहवालात असल्याचे माध्यमांनी नोंदवले आहे. त्यानंतर ऑगस्टमध्ये कायदा बदलला आणि सप्टेंबरमध्ये शुल्क जाहीर झाले.

सरकारने १७ सप्टेंबरला हे आरोप 'पूर्णपणे खोटे आणि दिशाभूल करणारे' असल्याचे सांगितले. पण प्रश्न असा आहे... फायदा कोणाला? ८० टक्क्यांहून अधिक यूपीआय व्यवहार हाताळणाऱ्या फोन-पे आणि गुगल-पे या दोन्ही अमेरिकी मालकीच्या कंपन्या आहेत. शुल्काची अधिसूचना निघताच वॉलमार्टच्या फोन-पे ने शेअर बाजारात उतरण्याची (आयपीओ) तयारी पुन्हा सुरू केली. या शुल्कातून एकट्या फोन-पे ला वर्षाला सुमारे ७०० कोटी रुपये मिळू शकतात, असा अंदाज आहे. सरकार अंशतः अमेरिकी दबावाला बळी पडल्याचे दिसते, असे अर्थतज्ज्ञ संतोष मेहरोत्रा यांनीही म्हटले आहे. शेतकरी चळवळीला हा अनुभव नवा नाही. २०१८ मध्ये अमेरिकेने जागतिक व्यापार संघटनेत भारताच्या गहू आणि तांदळाच्या हमीभावावरच आक्षेप घेणारा प्रतिदावा दाखल केला होता. पेमेंट व्यवस्थेपासून पिकांच्या भावापर्यंत निर्णय दिल्लीत होतात, पण अटी वॉशिंग्टनमधून येतात. यालाच आम्ही साम्राज्यवादी दबाव म्हणतो.

### या मीटरचा भार किती?

देशभर सर्व मोठ्या व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क लागले, तर त्यावरच्या जीएसटीची वसुली वर्षाला सुमारे ५,१८४ कोटी रुपये होईल, असा कर तज्ज्ञांचा अंदाज आहे. १८ टक्के जीएसटीमागचे मूळ शुल्क मोजले, तर ते वर्षाला सुमारे २८,८०० कोटी रुपयांपर्यंत जाते. सवलतीच्या दरांमुळे प्रत्यक्ष आकडा थोडा कमी असेल, पण हजारो कोटींचा हा भार दुकानदारांच्या खिशातूनच जाणार! देशातील १० कोटी शेतकऱ्यांनी वर्षभरात फक्त चार वेळाच २,००० रुपयांवरील पेमेंट कृषी सेवा केंद्रावर केले, असे धरले, तरी ४० कोटी व्यवहार होतात. प्रत्येकी ५ रुपये ९० पैसे धरले, तर गावोगावच्या कृषी सेवा केंद्रांवर वर्षाला सुमारे २३६ कोटी रुपयांचा भार पडतो. तो शेवटी कोणाच्या खिशातून वसूल होणार, हे सांगायला नको. डिसेंबर २०२५ च्या आकड्यांनुसार राज्यात दर चार शेतकऱ्यांपैकी एक शेतकरी फार्मर आयडीविना होता (१.७१ कोटींपैकी ४४ लाख, म्हणजे सुमारे २६ टक्के). सक्ती अशीच राहिली, तर अनुदान, कर्जमाफी आणि पीएम-किसानच्या नव्या हप्त्यापासून वंचित राहण्याचा धोका याच चौथ्या हिश्शावर आहे. हा क्रम लक्षात ठेवा. आधी सेवा मोफत. मग सगळ्या देशाला तिची सवय. मग परदेशी अहवालात आक्षेप.

मग कायद्यातले वचन गुपचूप बदलणे. मग मीटर. म्हणूनच अर्थमंत्री जेव्हा ॲग्रिस्टॅकला शेतकऱ्यांसाठीचा 'पुढचा यूपीआय' म्हणतात, तेव्हा ते वचन नसते, ती आगाऊ नोटीस असते. आज जात्यात दुकानदार आहे आणि शेतकरी सुपात आहे. जात्यातले रडतात आणि सुपातले हसतात, असे म्हणतात. पण सुपातल्यांचा नंबर ठरलेला असतो. (पूर्वार्ध)

**राजन क्षीरसागर**

(लेखक अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष आहेत.)

## राजकीय आंदोलने आणि वास्तवाचे भान

अलीकडच्या काळात 'झेंजी' हा शब्द खूप प्रचलित झाला आहे. सध्या जगभरात या पिढीची मोठी चर्चा सुरू आहे. काही देशांत जनतेतील असंतोषाच्या लाटेवर स्वार होऊन तरुणांनी सरकारविरोधात सत्तांतर घडवून आणले. परंतु, ते परिवर्तन केवळ झेंजी पिढीमुळेच झाले असे म्हणणे अतिशयोक्ती ठरेल. मध्यंतरी नीट परीक्षेतील पेपरफुटीमुळे सामान्य विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आणि त्याविरोधात आंदोलने झाली. मात्र, या आंदोलनात विद्यार्थी, पालक आणि सर्वसामान्य नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्यामुळेच त्याला यश मिळाले. सध्याच्या झेंजी पिढीने हा महत्त्वाचा धडा लक्षात ठेवला पाहिजे की, भावनेच्या भरात किंवा कोणाच्याही चिथावणीला बळी पडू नका. राजकीय स्वार्थासाठी आपला वापर होऊ देऊ नका. तुम्हाला जर पूर्णवेळ राजकारणी व्हायचे नसेल, तर आंदोलनांच्या मागे धावण्यापेक्षा स्वतःचे शिक्षण, करिअर, कौशल्ये आणि देशउभारणीवर भर द्या. उन्हाच्या तापात रस्त्यावर उतरण्यापूर्वी घटनेचे सर्व पैलू, इतिहास आणि सत्य समजून घ्या. स्वतःच्या भविष्याचा आणि देशाच्या प्रगतीचा सुज्ञपणाने विचार करणे हीच आजच्या तरुणाईची खरी ताकद ठरेल.

**अविनाश देशपांडे**

## संवाद

## लोककलेच्या विश्वातील आई

मराठी चित्रपट, नाट्यसृष्टी आणि लोककलेच्या विश्वात आपल्या अभिनयाचा, नृत्याचा अढळ ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणीसम्राज्ञी मधू कांबीकर यांचे निधन झाले. लोककलेच्या व्यासपीठावरून सुरु झालेला हा प्रवास नाटक आणि चित्रपटांपर्यंत विस्तारला. त्यांनी आपल्या चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत ७५ हून अधिक चित्रपटांत आणि अनेक गाजलेल्या नाटकात काम केले. गाढवाचे लग्न, विच्छा माझी पूरी करा, वस्त्रहरण, काशी मी राहू तशीच, अजब न्याय, शापित, झपाटलेला, माझा छकुला, बिनकामाचा नवरा, एक होता विदूषक, मुक्ता, अशा अनेक सिनेमांत त्यांनी भूमिका साकारल्या. 'शापित' चित्रपटातील त्यांच्या उत्कृष्ट अभिनयासाठी त्यांना फिल्मफेअर मराठी पुरस्कार आणि महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्काराने गौरवण्यात आले होते. याशिवाय २०१८ मध्ये त्यांना मराठी सिनेसृष्टीतील अमूल्य योगदानाबद्दल 'झी चित्र गौरव जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. मधू कांबीकर यांनी केवळ मराठी चित्रपटांपुरते स्वतःला मर्यादित न ठेवता हिंदी चित्रपटसृष्टीतही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. मधू कांबीकर यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीत विविध प्रकारच्या व्यक्तिरेखा साकारत मराठी चित्रपटसृष्टीत स्वतंत्र स्थान निर्माण केले.

**राजू जाधव**

## नवरात्रीमधून शिकून आनंदी होऊया !

आदिशक्ती दुर्गादेवीने नऊ दिवस रात्रंदिवस महिषासुरशी युद्ध करून त्याच्यावरती विजय मिळवला आणि जीवसृष्टीचे रक्षण केले आणि कल्याण केले. आपणही आपल्यातील दोष, वाईट सवयी आणि आपल्या हातून होणाऱ्या चुका या अधिकाधिक दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. म्हणजे आपोआपच हे करत असताना आपले गुण वाढतील. उदाहरणार्थ; आपल्यातील राग येणे, आळशीपणा, अपेक्षा करणे, इतरांचे मन दुखावणे, इत्यादी दोष दूर करण्यासाठी आपण जर मनापासून प्रयत्न केले तर आपोआपच आपल्यामध्ये सहनशीलता, शांतपणा, इतरांना समजून घेणे, इतरांच्या परिस्थितीचा विचार करून प्रेमभवाने वागणे, असे दैवी गुण वाढतील. या नवरात्रीला आपण जर या नऊ दिवसांमध्ये आपल्यातील फक्त एक दोष निवडून तो घालवण्यासाठी रात्रंदिवस जर प्रयत्न केले तर खऱ्या अर्थाने आपण स्वतः प्रथम सुखी होऊ आणि आपण आपोआपच आपल्यासोबत असलेल्या व्यक्ती, आपले कुटुंबीयही आनंदी होतील. याच्या जोडीला देवीची कृपा भरभरून प्राप्त करून घेण्यासाठी '।। श्री दुर्गादेव्यै नमः ।।' असा नामजपही पुष्कळ लाभदायक आहे. या नामजपचा महिमा असा आहे की या नामजपाने अध्यात्मिक कष्टांचे निवारण होते आणि साहस, शक्ती आणि एकाग्रता यांची प्राप्ती होते. या नऊ दिवसात देवीची कोणत्याही प्रकारे उपासना केल्यास सहस्त्रपटीने तिचे तत्व आपल्याला ग्रहण करता येते.

**आदिती देखणे**

# कथा एका गुंडाळल्या गेलेल्या आंदोलनाची...

आंदोलन विद्यार्थ्यांचे आहे, तर त्याचे नेतृत्व विद्यार्थ्यांकडेच असायला हवे होते. आंदोलन सुरू ठेवायचे की, स्थगित ठेवायचे याचा निर्णयही विद्यार्थी नेत्यांनी घ्यायला हवा होता..

एमपीएससी विद्यार्थी आंदोलनात असे दिसले नाही.. आंदोलन विद्यार्थ्यांचे असले तरी त्याचे नेतृत्व, निर्णय सारे काही रोहित पवार यांच्याकडे होते. विद्यार्थ्यांना पाठिंबा देणे वेगळे आणि विद्यार्थ्यांवर निर्णय लादणे वेगळे. काल रात्री आंदोलन ठिकाणावर काय चाललंय ते मी दोन पर्यंत जागून तन पहात होतो.. स्पष्ट दिसत होतं, सगळे राजकारणी अगोदर निर्णय घेऊन आले होते, अन ते निर्णय विद्यार्थ्यावर लादले जात होते..

विद्यार्थ्यांची मूळ मागणी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भिवनवार यांना हटविण्याची .. अध्यक्षांना हटविण्याचे अधिकार राष्ट्रपतींना असतील तर दहा दिवसात राष्ट्रपतींकडे जाऊन भिमनवार यांना हटविण्याची विनंती राष्ट्रपतींना करता आली असती.. अपवादात्मक स्थितीत चौकशी न करता राष्ट्रपती अध्यक्षांना हटवू शकतात तशी तरतूद कायद्यात आहे.. त्याचा वापर का केला गेला नाही? ज्या व्यवस्थेत उपराष्ट्रपतींना अर्ध्या तासात हटविले जाते त्या व्यवस्थेला एमपीएससीच्या अध्यक्षांना म्हणजे एका आयएएस अधिकाऱ्यास हटविणे एवढे अवघडय?.. अवघड नाही पण त्यासाठी व्यवस्था संवेदनशील असायला हवी.. त्याची इथे वाणवा आहे..

### घोडे इथेच पेंड खाते..

भिमनवार यांना घरी पाठविण्याचा निर्णय झालेला नसताना, म्हणजे विद्यार्थ्यांच्या मूळ मागणीच दुर्लक्षित राहिलेली असताना , मुलांनी न केलेल्या मागण्या मंजूर झाल्या, हा आपला विजय असल्याचे रोहित पवार सांगत होते.. ते जे सांगत होते, त्याला मुलांकडून अजिबात प्रतिसाद मिळत नव्हता..कारण हाती फार काही लागले नाही हे त्यांना जाणवत होते.

चौकशी समितीत तुकाराम मुंडे असतील हे सांगितल्यावर मुलांनी टाळ्यांचा कडकडाट जरूर केला पण अशा समित्या केवळ वेळ मारून नेण्यासाठी असतात हे इतिहासात अनेकदा सिध्द झालेय याचीही जाणीव विद्यार्थ्यांना होती.. आहे.. .. दोन महिन्यात समिती अहवाल देणार, तो स्वीकारला जाणार का, की समितीला मुदतवाढ देत कालापव्यय केला जाणार? हे सगळे प्रश्न आहेत..तरीही मूळ मागणीला फाटा देत, आंदोलन मागे घेण्यासाठी राजकीय नेते उतावीळ झाल्याचे दिसत होते.. सुरूवातीला किमान दोन तास विवेकानंद पाटलांचे नावेही कोणी घेत नव्हते, आंदोलनाचा मुख्य चेहरा असलेला विवेकानंद कोपऱ्यात पडला होता.. मात्र भिमनवार यांना न हटविता आंदोलन



संपविण्याचा प्रयत्न रोहित पवार करीत आहेत असे जाणवल्यावर मुले नाराज दिसली.. ऊठून उभी राहू लागली..मग भिती दाखवायला सुरूवात झाली.. गुन्हे दाखल होतील , परीक्षेला मुकावे लागेल, नंतर गुन्हे मागे घेतले जाणार नाहीत वगैरे वगैरे..

आंदोलन सुरू करताना प्रसंगी गुन्हे दाखल होऊ शकतात हे काय मुलांना माहिती नव्हते का? होतेच की.. . तरीही मुले रस्त्यावर उतरली असतील तर विषय किती गंभीर होता हे लक्षात घेतले पाहिजे..

रोहित पवार एकटेच बोलत होते, एक मुलगी समोर आली तर तिलाही जेमतेम एक मिनिट बोलू दिले गेले. काय चाललेय हे मुलाच्या लक्षात आल्यानंतर मुलांनी गडबड सुरू केली. शिवेंद्रसिंहराजे यांचंही मुलं ऐकत नव्हती .तेव्हा नाईलाजाने माईक विवेकानंद पाटलांकडे दिला गेला.. विवेकानंद बोलला,'मराठे युध्दात जिंकतात, तहात हरतात'एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन यशस्वी झाले म्हणणाऱ्यांनी विवेकानंदचे हे वाक्य दुर्लक्षिता कामा नये.. म्हणजे काय घडलेय याची पुरेपूर जाणीव त्याला असली पाहिजे..

विवेकानंद असे बोलल्यानंतर 'सरकारला पंधरा मिनिटे द्या' असे सांगितले गेले. तिथले वातावरण सारी स्क्रीप्ट अगोदरच तयार होती याची जाणीव करून देणारे होते.'चौकशी सुरू असे पर्यत भिवनवार यांना रजेवर पाठवले तर चालेल ना? असा प्रश्न रोहित पवार वारंवार विचारत होते.. नंतरही मुलांचा थंडा प्रतिसाद मिळत गेला ..अखेर दोनच्या सुमारास भिमनवारचे ट्विट आले आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन गुंडाळले गेलं.. सगळं ठरल्याप्रमाणे झाले...

एक गोष्ट खरी की, आंदोलन ताणून धरून चालत नाही.. कुठे थांबायचे ते आंदोलक नेत्याला कळले पाहिजे.. पण हा निर्णय आंदोलन ज्या वर्गाचे आहे त्यांना घेऊ द्या, भिती दाखवून आंदोलन मागे घ्यायला लावले जात असेल तर ते योग्य नाही.

रोहित पवार दहा दिवस आंदोलक विद्यार्थ्यांबरोबर होते, त्याबद्दल त्यांचं कौतूक केलं पाहिजे.. त्यांची आणि विश्वजित कदम यांची उपस्थिती आंदोलनाला वलय निर्माण करून देणारी होती हे जरी खरं असलं तरी कालची रोहित पवार यांची भाषा आणि बॉडीलँग्वेज ते विद्यार्थ्यांचे नाही तर सरकारचे प्रतिनिधी असल्यासारखी होती.. काहीही करून त्यांना आंदोलन संपवायचे होते. त्यासाठी त्यांची चाललेली घालमेल स्पष्ट दिसत होती..

मुद्दा आंदोलनातून मुलांना काय मिळाले हा..फार काही मिळाले असे मला दिसत नाही..विवेकानंदलाही तसंच वाटत असावं कारण तहात मराठे हरतात हे त्यांना बोलून दाखवलंच की..एकमात्र चांगलं घडलं, विवेकानंद पाटलांसारखं एक अभ्यासू, निर्भीड, तरूण नेतृत्व महाराष्ट्रातील तरूणांना मिळालं..माझ्या दृष्टीनं या आंदोलनाची ती एक चांगली फलश्रुती आहे..अर्थात विवेकानंदचं आणि सर्वच मुलांचं अभिनंदन करावंच लागेल.. ते जिद्दीनं लढले, एकोपा कायम ठेवला, आणि सरकारला आपली दखल घ्यायला भाग पाडले..हे ही कमी नाही..

**एस.एम. देशमुख**

बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# बंद कारखान्याच्या गोदामात प्रतिबंधित दारूचा लाखोंचा साठा!

**बालाजी इंडस्ट्रीजवर उत्पादन शुल्क विभागाची धडक १२.६३ लाखांचा मुद्देमाल जप्त, एकाला अटक**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १३ : बंद कारखान्याच्या गोदामाचा वापर प्रतिबंधित विदेशी मद्य आणि बनावट देशी दारूच्या साठवणुकीसाठी होत असल्याचा प्रकार वणी येथे उघडकीस आला आहे.**



राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अमरावती विभागीय भरारी पथकाने मंगळवारी (१३ ऑक्टोबर) धडक कारवाई करत दारूच्या हजारो बाटल्यांसह चारचाकी वाहन असा एकूण १२ लाख ६३ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गुमानलाल बिहारीलाल साहू (वय ४२) याला ताब्यात घेण्यात आले. एमआयडीसी परिसरातील भालर रोडवरील श्री बालाजी इंडस्ट्रीजच्या गोदामात महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेली मध्यप्रदेश निर्मित विदेशी दारू तसेच बनावट देशी दारू विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. कारवाईत रुपेश संत्रा देशी दारूच्या ९० मिली क्षमतेच्या २,२०० बाटल्या (२२ बॉक्स), किंमत ८८ हजार रुपये, रॉकेट संत्रा देशी दारूच्या १३,१०० बाटल्या (१३१ बॉक्स), किंमत ५ लाख २४ हजार रुपये, तसेच रॉयल स्टॅग विदेशी दारूच्या १९२ बाटल्या (४ बॉक्स), किंमत ५१ हजार ८४० रुपये जप्त करण्यात आल्या. याशिवाय सहा लाख रुपये किमतीची बोलेरो गाडीही जप्त केली. आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या आदेशानुसार आणि विभागीय उपआयुक्त डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. प्रभारी निरीक्षक एम. पी. चिटमटवार यांच्या मार्गदर्शनात भरारी पथकाने ही मोहीम राबविली. पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस. ए. वानखडे करीत आहेत. औद्योगिक वसाहतीतील गोदामांचा वापर अशा अवैध साठवणुकीसाठी होत असेल, तर संबंधित यंत्रणांच्या देखरेखीवरही प्रश्न उपस्थित होतात. या प्रकरणाच्या तपासातून दारूचा पुरवठा आणि विक्रीचे जाळे उघड होते का, याकडे लक्ष लागले आहे.

## खरीप पिकांसाठी बेंबळा धरणातून १५ ऑक्टोबरला पाणी सोडण्याची शक्यता..!

**पिक पेरणीचे नियोजन करावे, पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवण्यास सर्वोच्च प्राधान्य**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १३ :** जलसंपदा विभागाच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेनुसार, अल-निनोच्या प्रभावामुळे दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जिल्ह्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

बेंबळा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून एका संरक्षाणात्मक आवर्तनाच्या मागणीनुसार खरिपाच्या पिकांसाठी बेंबळा धरणातून १५ ऑक्टोबर २०२६ ला पाणी सोडण्याची शक्यता आहे, अशी माहिती बेंबळा प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे. बेंबळा धरणात सध्या पिण्याचे पाणी व बाष्पीभवन वजा जाता सिंचनासाठी केवळ एक आवर्तन देता येईल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. लाभक्षेत्रातील खरीप हंगामातील कापूस व तूर या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांकडून एका संरक्षणात्मक आवर्तनाची अत्यंत तीव्र मागणी आहे. त्यानुसार हे पाणी सोडण्याची शक्यता आहे. त्यामुळे, बेंबळा प्रकल्प विभागाच्या वतीने रब्बी हंगामासाठी पाणी देणे शक्य होणार नाही, याची बेंबळा धरणाच्या लाभक्षेत्रातील पाणी आवर्तनावर अवलंबुन असणा-या सर्व शेतकरी बांधवानी नोंद घ्यावी व त्यानुसार पिक पेरणीचे नियोजन करावे. गंभीर दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्रशासनास सहकार्य करावे आणि उपलब्ध पाण्याचा केवळ पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी अत्यंत काटकसरीने वापर करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## पुसद-हिंगोली राज्य मार्गावर अज्ञान वाहणाने रस्त्यावर मुरूम टाकून पसार.!

**महसूल प्रशासन झोपेत,सकाळी साडेपाच वाजताची घटना!**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १३ :** दि.१३ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी अं. ५.३० वाजताच्या दरम्यान पुसद-हिंगोली रोड बाबासाहेब नाईक इंजिनिअरींग कॉलेजच्या समोर पुसद ते कारला मूख्य रस्त्यावर अज्ञात वाहनाने गौणखनिज दगडगोटे मिश्रीत मुरूम टाकुन फरार झाला आहे.

रोज सकाळी गौण खनिज माफिया चोरटे हे महसूल विभागाचे लक्ष वेधण्या अगोदर रोज वाहतूक करून चोरी करत असतात असे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे, यावरून महसूल प्रशासन किती सतर्क आहे हे लक्षात येते तसेच पुसद-हिंगोली राज्य मार्गावर सकाळी ५:३० वाजता पासून हा गौणखनिज मुरूमाचा ठिग पडलेला असल्यामुळे वाहनधारकांना मनस्ताप होत असुन नाहक त्रास सहन करावा लागत आहे,परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुद्धा लक्षात घेऊन हा रस्त्यातील टाकलेला मुरूम उचलून प्रवाशी व नागरिकांसाठी रस्ता खुला करून देणे हे त्यांचे जबाबदारी असतांना सां.बां. विभाग अनभिज्ञ कसे अद्याप पर्यंत झोपेत आहे का? असा प्रश्न नागरिकाकडून उपस्थित जात आहे, याठिकाणी पडलेल्या ठिगार्यामुळे एखादा अपघात होऊन जिवीतहाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## एकता दुर्गा उत्सव मंडळ तहसील चौक दिग्रस या मंडळाची अखंड ३५ वर्षाची परंपरा कायम



**एकता दुर्गस्त मंडळाचे यावर्षी ३५ व्या वर्षात पदार्पण करीत विविध प्रकाराचे दिखावे मंदिर. सतत ३५ वर्ष आकर्षित मंदिरे उभारले गेले. त्यामुळे दिग्रस भक्तांचे व दिग्रस करांचे दरवर्षी एकता दुर्गस्त मंडळाकडे आकर्षित केल्या जाते......**

## थोडक्यात

### जैताई मंदिरात नृत्याविष्कारातून देवीभक्तीचा जागर!

**महाकाली नृत्य, देवीचा गोंधळ अन् शिवपूजेच्या प्रसंगाने रसिक मंत्रमुग्ध,६० कलावंतांचा सहभाग**

**वणी :** शारदीय नवरात्रोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात श्री जैताई



मंदिरात आयोजित 'नृत्योत्सव' कार्यक्रमाने नृत्यकलेतून देवीभक्तीचा जागर घडविला. १२ ऑक्टोबर रोजी सागर झेप बहुउद्देशीय संस्था, वणी यांच्या संकल्पनेतून झालेल्या या कार्यक्रमात ६० कलावंतांनी विविध नृत्याविष्कार सादर करून रसिकांची मने जिंकली. नृत्य प्रशिक्षक विकास घाटोळे, चेतन जोशी आणि मंगेश चटारे यांच्या मार्गदर्शनाखाली कलावंतांनी भक्तिगीते आणि शास्त्रीय नृत्यप्रकार सादर केले. आकाश बोथले यांच्या पारंपरिक गोंधळाने वातावरण भक्तिमय झाले, तर कल्याणी जुनघरीच्या प्रभावी महाकाली नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधले. विकास घाटोळे यांनी कथ्थक, निखिल वागळे यांनी भरतनाट्यम, तर सुमित भालेराव यांनी 'नटरंग उभा' या गीतावर नृत्य सादर केले. सचिन कळसकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेतून देवीपूजेचा प्रसंग साकारला. महिलांच्या पारंपरिक गोंधळानेही कार्यक्रमात रंगत आणली. समारोपप्रसंगी सहभागी कलावंत व प्रशिक्षकांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सुनील ठाकरे यांनी केले, तर सागर मुने यांनी आभार मानले.

### बॅडमिंटनच्या सामन्यात अनिया व हलीमा ने वेधले सर्वांचे लक्ष

**उमरखेड :** तालुकास्तरीय शालेय क्रीडा कार्यक्रम उमरखेड येथील



स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल नगर परिषद उमरखेड येथे आयोजित करण्यात आले होते , या सामन्यात १४ वर्षाच्या आत वयोगटातील विद्यार्थी सहभागी झाले होते या मध्ये नगरपरिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळा डॉक्टर इकबाल नगरपरिषद उच्च प्राथमिक शाळा येथील विद्यार्थिनी अनिया अफरीन मो इर्शाद व हलीमा बी अकबर खान या दोन्ही मुलींनी तालुकास्तरावर बॅडमिंटनमध्ये जिंकून आपले व शाळेचे नाव मोठे केले, याचा श्रेय त्यांचे क्रीडा शिक्षक तथा मार्गदर्शक जुबेर खान, वर्गशिक्षक इकराम उल्ला खान, मुख्याध्यापक रहात अंसारी व पालक वर्ग यांना देण्यात आले यावेळेस उमरखेड महागाव विधानसभा चे आमदार किसनरावजी वानखेडे साहेब यांनी मुलींना पुढील वाटचाली करिता शुभेच्छा देऊन त्यांचे सत्कार केले. या विद्यार्थिनींना सामना जिंकण्याकरिता अहोरात्र मेहनत घेण्याचे काम शिक्षक जुबेर खान यांनी केले तसेच पालक वर्गणीही शिक्षकांचे

### पाणी व चारा टंचाई, अवैध पाणी उपशाबाबत हेल्पलाईन जारी

**पाण्याचा अपव्यय टाळा तक्रारींसाठी क्रमांकांवर संपर्क साधा**

**यवतमाळ :** जिल्ह्यात पाणीटंचाई, चारा टंचाई, अवैध पाणी उपसा तसेच पाण्याचा गैरवापर यासंदर्भातील तक्रारी नोंदविण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ०७२३२-२४०७२० / २५४३०५ जारी करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करून पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे. जिल्ह्यात उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे आणि पाणीटंचाईच्या परिस्थितीत पाण्याचा गैरवापर रोखणे आवश्यक आहे. नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा. तसेच पाणीटंचाई, चारा टंचाई, अवैध पाणी उपसा किंवा पाण्याचा गैरवापर आढळून आल्यास संबंधित हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## महागाव बाजार समितीचा आर्थिक बळकटी कडे वाटचाल..!

**११२ दुकानांचे तीन मजली व्यापारी संकुल,सेस वसुलीसाठी आठ टोलनाक्यांचे नियोजन**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १३ :** आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वयंपूर्ण होण्याच्या उद्देशाने महागाव कृषी उत्पन्न बाजार समितीने उत्पन्नवाढीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. बाजार समितीच्या जागेवर ११२ दुकानांचे तीन मजली व्यापारी संकुल उभारण्यात येणार असून, सेस वसुली वाढविण्यासाठी तालुक्यातील प्रमुख मार्गांवर आठ टोलनाके उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. व्यापारी संकुलासाठी सहकार विभागाची मंजुरी मिळाल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

प्रस्तावित व्यापारी संकुलातील दुकानांची लिलाव पद्धतीने बुकिंग प्रक्रिया ११ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. संकुलात लिफ्ट, पाणी, स्वच्छतागृह आणि प्रशस्त पार्किंग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पातून



बाजार समितीला दीर्घकालीन उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. दुसरीकडे, सेस वसुलीचा आवाका वाढविण्यासाठी आठ ठिकाणी टोलनाके उभारण्याची तयारी सुरू आहे. यासाठी आवश्यक परवानग्या मिळाल्याची माहिती बाजार समिती प्रशासनाने दिली आहे. मात्र, या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, अपेक्षित उत्पन्न आणि आर्थिक शिस्त यावरच बाजार समितीच्या स्वयंपूर्णतेचे यश अवलंबून राहणार आहे. नवीन उत्पन्नाचे स्रोत निर्माण करण्यासोबतच उपलब्ध उत्पन्नाची प्रभावी वसुली करण्यावर भर दिला जात आहे. संचालक मंडळाच्या सहकार्याने बाजार समितीला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न सुरू असल्याचे सभापती रवींद्र पवार यांनी सांगितले. या योजनांमुळे शेतकरी आणि व्यापाऱ्यांना कितपत लाभ होतो, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**खर्च ६५ लाख, उत्पन्न ७३ लाख,सेस मधून ४३ लाखांची प्राप्ती**

**सभापती रवींद्र पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षी बाजार समितीला सेस वसुलीतून ४३ लाख रुपये, तर सीसीआयच्या कापूस खरेदीतून ३० लाख रुपये सेस मिळाला. बाजार समितीचा वार्षिक खर्च सुमारे ६५ लाख रुपये, तर उत्पन्न सुमारे ७३ लाख रुपये आहे. उत्पन्न आणि खर्चातील मर्यादित तफावत लक्षात घेता, प्रस्तावित व्यापारी संकुल आणि आठ टोलनाक्यांमधून प्रत्यक्षात किती अतिरिक्त उत्पन्न मिळते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.**

**— रवींद्र पवार, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, महागाव**

## बोरवेल बंदीने रोजगारावर गदा,शेतकऱ्यांचीही कोंडी!

**बंदी उठविण्याची पुसद बोरवेल संघटनेचे निवेदन**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १३ :** भूजल पातळी टिकवून ठेवण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यात १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू करण्यात आलेल्या बोरवेल (कूपनलिका) खोदकाम बंदीमुळे व्यावसायिक आणि शेतकरी अडचणीत सापडल्याचा दावा करत ही बंदी तातडीने उठविण्याची मागणी पुसद विभागातील बोरवेल संघटनेने केली आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

भूजल संवर्धनाच्या उद्देशाने प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचा आदर असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. मात्र, बंदीमुळे बोरवेल व्यवसाय ठप्प झाला असून गाडीमालक, चालक, मजूर आणि एजंट यांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. बोरवेल गाड्यांचे बँक कर्जाचे हप्ते, कामगारांचे वेतन आणि कुटुंबांचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न व्यावसायिकांनी उपस्थित केला आहे.



दुसरीकडे, पिकांना पाणी देण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी बोरवेल खोदण्याची आवश्यकता असलेल्या शेतकऱ्यांनाही या बंदीचा फटका बसत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे भूजल संवर्धन आणि नागरिकांच्या पाण्याच्या गरजा यांचा समतोल साधून प्रशासनाने पर्यायी मार्ग काढावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. संघटनेने नियमांचे पालन करण्याची तयारी दर्शविली आहे. प्रस्तावित बोरवेलची खोली ६० मीटर (सुमारे २०० फूट) पेक्षा अधिक न ठेवणे, तसेच प्रस्तावित जागेच्या ५०० मीटर परिसरातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत आणि पंपाद्वारे पाणी उपसा होणाऱ्या कूपनलिकांचा विचार करून खोदकाम करणे, अशा अटींचे पालन करण्याची हमी निवेदनातून देण्यात आली. बंदी कायम ठेवायची की नियंत्रित परवानगीचा मार्ग स्वीकारायचा, याबाबत प्रशासनाच्या निर्णयाकडे आता बोरवेल व्यावसायिक आणि शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. यावेळी यवतमाळ जिल्हा बोरवेल संघटनेचे अध्यक्ष अभिजीत चिद्दरवार यांच्यासह विनोद जोशी, आकाश साखरे, विष्णू चंदू पेन्शनवार, विठ्ठल डाखोरे, बाळू आगरमोरे, अरुण पाटील, एकनाथ सुरोशे, गजेंद्र ताळीकोते, महेबूब पठाण, संतोष पवार आदी व्यावसायिक उपस्थित होते.

## दारव्हा-आर्णी मार्गावर एसटी बस आणि दुचाकीची भीषण धडक

**दोन सख्ख्या भावांसह तिघांचा मृत्यू**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. १३ :** दारव्हा-आर्णी मार्गावरील सायखेडा नजीक एसटी बस आणि दुचाकीची भीषण धडक होऊन दोन सख्ख्या भावांसह तिघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात रामगाव (हरू) येथील किशोर रामराव चव्हाण (वय ३३), दीपक रामराव चव्हाण (वय २८) आणि पवन लक्ष्मण पवार (वय १५) यांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे रामगाव सह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अपघातातील तिन्ही व्यक्तींना दारव्हा येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तिघांनाही मृत घोषित केले. मृत किशोर चव्हाण आणि दीपक चव्हाण हे दोघे सख्खे भाऊ होते. या घटनेमुळे एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



अपघातात सहभागी एसटी बसचा क्रमांक एमएच ४० एन ९९८३, तर दुचाकीचा क्रमांक एमएच १४ जे ९२३८ असा आहे. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाल्याचे छायाचित्रांवरून दिसून येते. दरम्यान, हा अपघात नेमका कसा घडला, याची कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. अपघातासंदर्भातील अधिकृत माहिती आणि पुढील तपासाचा तपशील समोर आल्यानंतर घटनेचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे. दोन सख्ख्या भावांसह एका अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाल्याने रामगाव (हरू) परिसरात शोककळा पसरली आहे.

## मुकुटबन परिसरातील पथदिवसांच्या समस्येबाबत ग्रामस्थांची प्रशासनाकडे मागणी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १३ :** मुकुटबन ग्रामपंचायत क्षेत्रातील विविध ठिकाणी विद्युत खांबांवरील पथदिवे दिवसा सुरू राहत असल्याने विजेचा अनावश्यक वापर होत आहे. त्यामुळे वीज बचतीसाठी पथदिव्यांच्या संचालन व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. गावातील अनेक ठिकाणी पथदिवे दिवसा सुरू राहत असल्यामुळे विजेचा अपव्यय होत असून, ग्रामपंचायतीच्या वीज खर्चातही वाढ होण्याची शक्यता आहे.

या समस्येकडे लक्ष देऊन संबंधित विद्युत खांबांवरील पथदिव्यांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच, ज्या ठिकाणी पथदिवे दिवसा सुरू राहतात, त्या ठिकाणी स्वतंत्र स्विच किंवा योग्य स्वयंचलित नियंत्रण यंत्रणा बसविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. पथदिवे केवळ आवश्यक वेळेतच सुरू राहतील, अशी व्यवस्था केल्यास विजेची बचत होण्यास मदत होईल. सदर समस्येची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, व आरो फिल्टर व सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करण्यात यावे ,अशी विनंती ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे

## पोलिसानी दिला साडेपाच लाखांचा मुद्देमाल मूळ मालकांच्या स्वाधीन!

**सोने, दोन दुचाकी आणि १५ मोबाईल परत**



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १३ :** चोरी आणि हरवलेल्या वस्तूंमुळे हतबल झालेल्या नागरिकांना पुसद शहर पोलिसांनी दिलासा दिला आहे. तब्बल ५ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मूळ मालकांना परत करण्यात आला. १३ ऑक्टोबर रोजी पोलीस स्टेशन पुसद शहर येथे ही कार्यवाही करण्यात आली. नवरात्र आणि दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यवाहीत चोरीच्या गुन्ह्यांतील ३.५ ग्रॅम वजनाचे सोने, दोन दुचाकी वाहने (होंडा शाईन) आणि हरवलेले १५ मोबाईल संबंधित मालकांना परत करण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या हस्ते हा मुद्देमाल सुपूर्द करण्यात आला. चोरी किंवा हरवलेल्या वस्तूंचा शोध लागल्यानंतर त्या संबंधित मालकांपर्यंत पोहोचविणे ही पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे. या कार्यवाहीमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. पोलीस निरीक्षक गजेंद्र क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार किशोर राठोड, महिला पोलीस हवालदार मंदाकिनी भगत आणि दिपाली चव्हाण यांनी ही कार्यवाही पार पाडली.

## धम्म ही जीवनाला दिशा देणारी कला आचरणातून कुशल मंगल साध्य!

**पूज्य भदंत बुद्धघोष महाथेरो यांचे प्रतिपादन**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. १३ :** श्रद्धेने दान देणे, चित्ताची एकाग्रता साधणे आणि विपश्यना व समाधी मार्गाचा अभ्यास करणे, हीच कल्याणकारी जीवनाची दिशा आहे. धम्म माणसाला जीवन-मरणाच्या फेऱ्यातून मुक्तीचा मार्ग दाखवतो. त्यामुळे केवळ श्रद्धा व्यक्त न करता प्रत्येकाने धम्माचे आचरण करावे, असे प्रतिपादन पूज्य भदंत बुद्धघोष महाथेरो यांनी केले.

गाडगेबाबा नगर, खापरी येथील त्रिरत्न बौद्ध विहारात अखिल भारतीय भिक्खू संघ आणि फुले-आंबेडकरी साहित्य संसद, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय महावंदना व धम्मदेसना कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन



पूज्य भदंत ग्यानबोधी महाथेरो यांच्या हस्ते झाले. यावेळी साहित्य संसदेचे अध्यक्ष किशोर भगत उपस्थित होते. पुढे बोलताना भदंत बुद्धघोष महाथेरो यांनी चांडाळ, मलीन आणि आर्य उपासक या तीन प्रकारांची माहिती देत उपासकांच्या आचरणाचे महत्त्व स्पष्ट केले. किशोर भगत यांनी गेल्या १८ वर्षांपासून महावंदना संघाच्या माध्यमातून धम्मकार्याची परंपरा जिवंत ठेवली आहे. धम्म सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या या कार्याला समाजानेही खांद्याला खांदा लावून साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात थायलंड, जपान आणि श्रीलंकेतील भन्तेजींनी धम्मदेसना केली. पारमिता, आर्य अष्टांगिक मार्ग आणि पंचशीलांचे पालन यांचे महत्त्व विशद करण्यात आले. थायलंडमधील विविध भन्तेजींसह श्रीलंकेतील आर्या उत्पलवन्ना, आर्या धम्मदीपा, आर्या सुजाता व अन्य भिक्खू-भिक्खुणींची उपस्थिती लाभली. नेपाळ, तेलंगणा, महाराष्ट्र तसेच यवतमाळ जिल्ह्यातील उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी फुले-आंबेडकरी साहित्य संसद आणि त्रिरत्न बुद्ध विहार समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन किसन काळे यांनी केले, तर महेंद्र वानखेडे यांनी आभार मानले.

## पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे काळाची गरज!

**मोरझडी लाल येथे जलसेवा संकल्प अभियान,महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १३ :** मोरझडी लाल यंदा पावसाने ओढ दिल्याने पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता असताना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचा संदेश ग्रामपंचायत मोरझडी लाल येथे देण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत यवतमाळ सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता योगी सोनवणे यांच्या संकल्पनेतून १२ ऑक्टोबर रोजी जलसेवा संकल्प अभियान २०२६ राबविण्यात आले. या अभियानांतर्गत ग्रामस्थांना पाण्याचे महत्त्व, जलसंवर्धन आणि पाण्याच्या वापरासंबंधी कायद्यांची माहिती देण्यात आली. कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध जलसाठा जपण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांना जलप्रतिज्ञा देण्यात आली. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत जलसंवर्धन, पाणी जतन आणि काटकसरीने वापर करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे आयोजन विजय तायडे, सचिन तेलगोटे आणि नारायण सिंगरुपकार यांनी केले.गजानन वानखेडे व संच यांनी पाणी वाचविणे ही केवळ जबाबदारी नसून भविष्यातील पिढ्यांच्या सुरक्षिततेची गरज आहे.हे आपल्या गायनातून व्यक्त केले हा संदेश अभियानातून देण्यात आला.

## दुर्गा उत्सवानिमित्त वाहतूक बदल, जड वाहनांना प्रवेशबंदी

**यवतमाळ, दि. १३ :** नवरात्रोत्सवातील भाविकांची गर्दी लक्षात घेऊन शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. ११ ते २३ ऑक्टोबर दरम्यान ठरावीक वेळेत जड वाहनांना प्रवेशबंदी लागू राहणार असून, बसेस व ट्रॅव्हल्स साठी पर्यायी मार्ग निश्चित केले आहेत.

टांगा चौक ते अप्सरा टॉकीज आणि पूनम चौक ते हनुमान आखाडा हे रस्ते १२ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजल्यापासून २३ ऑक्टोबरच्या मध्यरात्री २ वाजेपर्यंत दररोज दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांसाठी बंद राहतील. पांढरकवडा, नागपूर, अमरावती, घाटंजी व आर्णी मार्गावरील बसेसना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे. भाविकांच्या वाहनांसाठी हिवताप कार्यालयाचे मैदान, कॉटन मार्केट परिसरासह विविध ठिकाणी पार्किंगची व्यवस्था केली आहे. गर्दीच्या काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. मात्र, बदललेल्या मार्गांची माहिती नसल्यास भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी चौकाचौकांत दिशादर्शक फलक आणि वाहतूक पोलिसांची पुरेशी व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे.

# धनेगाव येथील आयुष्मान आरोग्य मंदिर बंद

## तीन हजार जनतेचे आरोग्य धोक्यात

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

कापूसतळणी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या धनेगाव येथील आयुष्मान आरोग्य मंदिर (उपकेंद्र) गेल्या काही दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.




धनेगावची अंदाजे तीन हजार तर लगतच्या बोराळा गावची दोन हजार अशी एकूण पाच हजार लोकसंख्या या एकाच आरोग्य मंदिराच्या भरवशावर उपचार घेत असताना दवाखाना बंद असल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.सध्या परिसरात तापाच्या रुग्णांची संख्या वाढली असताना ऐन गरजेच्या वेळी दवाखान्याला कुलूप असल्याने रुग्णांना खासगी दवाखान्यात किंवा दूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जावे लागत आहे.यामुळे गरीब व सर्वसामान्य रुग्णांचे आर्थिक कंबरडे मोडत आहे.लाखो रुपये खर्चून उभारलेली आयुष्मान आरोग्य मंदिराची इमारत सध्या धूळ खात पडली आहे.अधूनमधून केवळ साफसफाईसाठी सरकारी कर्मचारी येतात, तपासणी व औषध वाटप पूर्णपणे ठप्प असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

गावातील नागरिकांनी बंद अवस्थेतील आयुष्मान आरोग्य मंदिराचे जिओ टॅगिंगसह फोटो काढले असून,याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्याकडे चौकशीची मागणी करणार असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.धनेगाव व बोराळा येथील नागरिकांनी आयुष्मान आरोग्य मंदिर तात्काळ सुरू करून नियमित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी केली आहे. याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

**कर्मचारी रचना कागदावरच?**

केंद्राच्या प्रकारानुसार कर्मचारी संख्या बदलते, पण साधारण रचनेत वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) OPD तपासणी, निदान, उपचार व रेफरल; कम्युनिटी हेल्थ ऑफिसर (CHO) प्राथमिक तपासणी, NCD स्क्रीनिंग, आरोग्य शिक्षण; स्टाफ नर्स / उपचार लसीकरण, ड्रेसिंग, माता बाल सेवा; ANM गरोदर माता नोंदणी, गृहभेटी, लसीकरण; फार्मासिस्ट मोफत औषध वाटप; लॅब टेक्निशियन रक्त, लघवी व इतर मूलभूत तपासण्या अशी जबाबदारी असते. प्रत्यक्षात मात्र धनेगाव केंद्रात कर्मचारीच उपलब्ध नसल्याने या सेवा ठप्प आहेत.या व्यवस्थापनासाठी तालुका पातळीवर तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (कापूसतळणी) तर जिल्हा पातळीवर जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद), जिल्हा शल्य चिकित्सक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे जबाबदार असतात.

# पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी मध्ये किर्लोस्कर कंपनीच्या ओपन कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**



पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी किर्लोस्कर कंपनीतर्फे १५ व १६ ऑक्टोबर रोजी ओपन कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

या ओपन कॅम्पस ड्राइव्हमुळे मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांना आपल्या तांत्रिक ज्ञानाचे व कौशल्याचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरला नवी दिशा मिळण्यास मदत होणार आहे.महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने व प्राचार्यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला असून, संबंधित विद्यार्थ्यांनी कॅम्पस ड्राइव्हमध्ये सहभागी होण्यासाठी प्लेसमेंट विभागाशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# धरणांतील पाणीसाठ्यात ५५ दशलक्ष घनमीटरने घट

**अमरावती/का.प्र.**

परतीच्या पावसाने दडी मारल्यामुळे पश्चिम विदर्भातील अमरावती प्रशासकीय विभागातील धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा झपाट्याने खालावत असल्याचे समोर आले आहे. ३ ते १२ ऑक्टोबर २०२६ या अवघ्या नऊ दिवसांच्या कालावधीत विभागातील २८७ प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठ्यात तब्बल ५५.८० दशलक्ष घनमीटरने (दलघमी) घट नोंदवली गेली आहे. जलसंपदा विभागाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, विभागातील एकूण पाणीसाठा ६२.०७टक्क्यांवरून थेट ६०.२७ टक्क्यांवर घसरला आहे.

आगामी उन्हाळ्यात विभागाला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची चिन्हे आहे. विभागातील ९ प्रमुख



मोठ्या प्रकल्पांमध्ये ३ ऑक्टोबर रोजी ८३३.२१ दलघमी (५९.५२ टक्के) पाणी शिल्लक होते. १२ ऑक्टोबरपर्यंत हा साठा ७९७.५२ दलघमीवर (५६.९७ टक्के) खाली आला आहे. नऊ दिवसांत केवळ मोठ्या प्रकल्पांमधूनच ३५.६९ दलघमी पाणी कमी झाले आहे. अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा धरणात ३ ऑक्टोबर रोजी ३२९.४९ दलघमी (५८.४२ टक्के) साठा होता, तो आता ३१०.०५ दलघमीवर (५४.९७ टक्के) आला असून तब्बल १९.४४ दलघमी पाणी घटले आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील पूस धरणात ७२.६० वरून ७१.३३ दलघमी, अरुणावतीमध्ये १०३.९८ वरून १०१.८७ दलघमी तर बेंबळा प्रकल्पात १२६.०८ वरून १२३.०३ दलघमीपर्यंत पाणीसाठा कमी झाला आहे. अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्पातील साठा १६.०४ दलघमीवरून (१८.५८ टक्के) १४.८३ दलघमीवर (१७.१७टक्के) घसरल्याने अकोलेकरांची चिंता वाढली आहे. बुलढाण्यातील पेनटाकळी (४८.०५ वरून ४६.०१ दलघमी) आणि नळगंगा प्रकल्पातही (५५.३० वरून ५३.९० दलघमी) अशीच घसरण झाली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्पाची स्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. धरणातील उपयुक्त साठा थेट शून्य टक्क्यांवर पोहोचला आहे. ऑक्टोबर महिन्यातच धरण कोरडे पडल्याने संबंधित परिसरातील सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# 'सेवा संकल्प प्रतिष्ठान' ला कुलगुरूंची भेट

## रुग्णांशी साधला संवाद

**अमरावती/का.प्र.**



संत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंती निमित्य सेवा संकल्प अभियानाचे औचित्य साधून बुलढाणा जिल्ह्यातील पळसखेड येथील 'सेवा संकल्प प्रतिष्ठान' या अनाथ व मनोरुग्णांच्या प्रकल्पाला कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली.यावेळी प्र - कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू, जिल्हा समन्वयक डॉ. हनुमंत भोसले, डॉ. अशोक वाघ, डॉ. विशाल गजभिये, अनुराधा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण नन्हई, सेवा संकल्प प्रतिष्ठानचे डॉ. नंदू पालवे, डॉ. आरती पालवे तसेच रा.से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नागेश मापारी, डॉ. अरविंद तट्टे, डॉ. राहुल सावरकर, डॉ. अमित इंगोले, डॉ. सुनिल राठोड, डॉ. स्वप्निल गोरे, डॉ. रोहीत सालकुटे, डॉ. भरत पवार, विद्यापीठ सोशल मीडिया समन्वयक अनिकेत ठाकरे आदी उपस्थित होते.

पळसखेड येथील 'सेवा संकल्प प्रतिष्ठान ही संस्था अनाथ तसेच विविध आजारांनी ग्रस्त रुग्णांची मागील अनेक वर्षांपासून काळजी घेत असून त्यांचे संगोपन आणि मनोभावे सेवा करण्याचे कार्य करीत आहे. कुलगुरू यांनी नुकतीच या सेवा संकल्प प्रतिष्ठानला भेट देत तेथील रुग्णांची आस्थेने विचारपूस केली.सेवेतच सामाजिक संवेदनशीलतेचे खरे सामर्थ्य दडलेले आहे, याचा प्रत्यय या प्रत्यक्ष भेटीतून दिसुन आला.कुलगुरूंनी यावेळी या प्रकल्पातील रुग्णांशी आपुलकीने संवाद साधला, समाजाने नाकारले असले तरी, पालवे दाम्पत्याने त्यांना आपुलकीचा आधार दिला आहे. या भेटी दरम्यान कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते सेवा संकल्प प्रतिष्ठानच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध जिल्हा समन्वयकांसह अनुराधा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते.

# नवरात्रोत्सवातही विजेचा लपंडाव

## महावितरणच्या कारभारावर आम आदमी पार्टी आक्रमक

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



शहरात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवार वीजखंडित होण्याच्या प्रकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कोणतेही वादळ, वारा किंवा पाऊस नसतांनाही वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनासह व्यापारी आणि व्यावसायिकांच्या कामकाजावरही परिणाम होत आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात तरी अखंडित वीजपुरवठा मिळावा आणि या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, या मागणीसाठी आम आदमी पार्टीच्या वतीने माजी न.प. उपाध्यक्ष तथा आप नेते नितीन गवळी यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांना निवेदन देण्यात आले.

शहरात रात्री-अपरात्री वीज गायब होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.सण-उत्सवाच्या काळात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महावितरणने विशेष दक्षता घेऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी करण्यात आली. वारंवार होणाऱ्या वीजखंडित प्रकारामुळे व्यापारी, दुकानदार, व्यावसायिक आणि लघुउद्योजकांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम होत असून, घरगुती कामे आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही अडथळे निर्माण होत आहेत. यापूर्वी मे महिन्यातही अशाच प्रकारची समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होण्यामागील नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित करत महावितरणच्या स्थानिक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे आपच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर किंवा अन्य विद्युत यंत्रणेतील तांत्रिक बिघाडामुळे हा प्रकार घडत आहे का, याची सखोल तपासणी करून दोष तातडीने दूर करावेत. रात्री-अपरात्री होणारे अनावश्यक वीजखंडित होण्याचे प्रकार थांबवून शहरातील वीजपुरवठा सुरळीत करावा. तसेच या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करून केलेल्या कार्यवाहीची माहिती निवेदनकर्त्यांना द्यावी, अशी मागणी करण्यात आली.प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास शहरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आम आदमी पार्टीने दिला आहे.निवेदन देतांना आप नेते नितीन गवळी, मेहमूद हुसेन, मंगेश डाफ, सागर गावंडे, प्रशांत गावंडे, बादर खान, विनोद लहाने, सागर पटले, पायल पांडव, बालू गुडदे व इतर शहरवासी उपस्थित होते.

# बालाजी मंदिराचा नवरात्रोत्सव वैशिष्ट्यपूर्ण

## दसऱ्याला हत्तीच्या प्रतीकात्मक वाहनावरून बालाजीची मिरवणूक

**कुऱ्हा/वार्ताहर**

येथील श्री बालाजी मंदिरातील नवरात्रोत्सवाची परंपरा सुमारे चारशे वर्षांपासून जपली जात आहे. तेलंगणा येथून आणलेल्या श्री बालाजीच्या पंचधातूच्या मूर्तीची स्थापना झाल्यापासून या मंदिरात दरवर्षी नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. नवरात्राच्या दहा दिवसांत बालाजीच्या विविध वाहनांवरून मिरवणूक काढली जाते. दसऱ्याला सीमोल्लंघन, सोने अर्पण करण्याची परंपरा आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी हत्तीच्या प्रतीकात्मक वाहनावरून निघणारी मिरवणूक हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरते.



**तेलंगणातून मूर्ती आणल्याची परंपरा**

निजामशाहीच्या काळात सुमारे चारशे वर्षांपूर्वी तेलंगण येथील तेलंगी ब्राह्मणांनी तिरुपती येथून श्री बालाजीच्या पंचधातूच्या मूर्ती कुऱ्हा येथे आणल्याची माहिती आहे. सुरुवातीला गावातील गोविंद सोनार यांच्या घरी या मूर्तींची स्थापना करण्यात आली. पुढे निजामशाहीचा अस्त झाल्यानंतर मंदिरांचा कारभार भोसले घराण्याचे पंच सचिव आप्पाजी देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आला. तेव्हापासून देशमुख घराण्याचे वंशज मंदिराचे कामकाज पाहत आहेत.श्री बालाजी देवस्थानचे अध्यक्ष विजय देशमुख यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, मंदिरातील नवरात्रोत्सवाची परंपरा आजही श्रद्धेने आणि उत्साहाने सुरू आहे. या उत्सवामुळे गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन होत आहे.

**दहा दिवस विविध वाहनांवरून मिरवणूक**

नवरात्रोत्सवाच्या दहा दिवसांत श्री बालाजीच्या विविध वाहनांची मिरवणूक काढली जाते. पहिल्या दिवशी नागाच्या वाहनावरून मिरवणूक निघते. त्यानंतर चक्र, मोर, वाघ, गरुड, हनुमान आणि पाळणा अशा विविध वाहनांचा समावेश असतो. दररोज रात्री नऊ वाजता मिरवणुकीला सुरुवात होते. या वेळी ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात. मिरवणुकीदरम्यान गावातील वातावरण भक्तिमय होते. पारंपरिक पद्धतीने साजरा होणारा हा उत्सव कुऱ्हा गावाच्या धार्मिक परंपरेचे वैशिष्ट्य मानला जातो.

**दसऱ्याला सीमोल्लंघनाची परंपरा**

दसऱ्याच्या दिवशी श्री बालाजीची पालखी गावाबाहेर सीमोल्लंघनासाठी नेली जाते. मंदिरात परतल्यानंतर बालाजीला सोने अर्पण केले जाते. त्यानंतर ग्रामस्थ दसरा सण साजरा करतात. या परंपरेला धार्मिक महत्त्व असून, गावातील भाविक या सोहळ्यात सहभागी होतात.दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी श्री बालाजीची हत्तीच्या प्रतीकात्मक वाहनावरून मिरवणूक काढली जाते. या वेळी हत्तीच्या वाहनावर गुलाल उधळला जातो. तसेच नारळ, पोहे, लाडू आणि अनारसे यांसारख्या प्रसादाचे ग्रामस्थांना वितरण केले जाते. या सोहळ्यामुळे उत्सवातील आनंद द्विगुणित होतो.

> चारशे वर्षांची ऐतिहासिक परंपरा, विविध वाहनांवरील मिरवणुका आणि दसऱ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक विधींमुळे कुऱ्हा येथील श्री बालाजी मंदिराचा नवरात्रोत्सव परिसरातील भाविकांसाठी श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र ठरतो.
>
> **विजय देशमुख,**
> अध्यक्ष, श्री बालाजी देवस्थान, कुऱ्हा

# संक्षिप्त

## घरगुती गणपती सजावट स्पर्धेत बक्षिस वितरण



**मोर्शी-** घरगुती गणपती सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक समीक्षा आनंद बारबुध्दे यांनी पटकावला. त्यांना सिद्धनाथ सराफ यांच्याकडून तीन हजार रुपये रोख व लायन्स क्लबचे गव्हर्नर विलास साखरे यांच्याकडून शिल्ड प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांक कुणाल मेंढे यांना मिळाला. त्यांना प्रीतम बुरंगे यांच्याकडून दोन हजार रुपये रोख व प्रशांत देशमुख यांच्याकडून शिल्ड देण्यात आले. तृतीय क्रमांक वेदांत ढोले यांना मिळाला. त्यांना प्रीतम बुरंगे यांच्याकडून एक हजार रुपये रोख व लेडी गव्हर्नर किरण साखरे यांच्याकडून शिल्ड देण्यात आले. उत्कृष्ट गणपती सजावटीचा पुरस्कार महिमा भोरे यांना मिळाला. त्यांना प्रवीण राऊत यांच्याकडून एक हजार रुपये व किरण साखरे यांच्याकडून शिल्ड प्रदान करण्यात आले.प्रोत्साहनपर बक्षिसे शामल श्रीवास आणि आकाश चौधरी यांना देण्यात आली. डॉ. पंकज मुळे यांच्याकडून दोघांनाही प्रत्येकी ५०० रुपये रोख व शिल्ड देऊन गौरविण्यात आले. संचालन शरद कनेर प्रास्ताविक शिवाजी बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष संजय उल्हे यांनी तर आभार प्रदर्शन अजित जोशी यांनी केले. यावेळी विजय तापडिया, राजीव डहाणे, राजू राठी यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार साडी अर्पण सोहळा होणार

**अमरावती-** श्री क्षेत्र कौंडण्यपूरच्या वैभवात भर घालणारा हा महोत्सव यंदा अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी समितीच्या वतीने नियोजन सुरू आहे. श्री अंबा-रुक्मिणी सांस्कृतिक महोत्सव २०२६ च्या नियोजनासंदर्भात समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक ११ऑक्टोबर रोजी श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर सभागृह येथे संपन्न झाली. यावेळी येत्या २१, २२ आणि २३ नोव्हेंबर २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या तीन दिवसीय महोत्सवाच्या विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि क्रीडाविषयक कार्यक्रमांच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.मागील वर्षी देशभरात चर्चेचा विषय ठरलेला २११ मीटर साडी अर्पण सोहळा यंदा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष रविराज देशमुख यांनी बैठकीत दिली. मुख्यमंत्री महोदयांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले असून, त्यांच्या दौऱ्यादरम्यान क्षेत्र कौंडण्यपूर तीर्थक्षेत्राच्या पर्यटन विकासाचाही आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.तीन दिवसांच्या महोत्सवात उद्घाटन सोहळा, विश्वमांगल्य सभा, वरदायिनी नदी साडी अर्पण सोहळा, एक लाख दिव्यांचा दीपोत्सव, वरदायिनी आरती, विदर्भस्तरीय मॅरेथॉन, ग्रामस्वच्छता व नदीकाठ स्वच्छता मोहीम, नौकाविहार स्पर्धा, पारंपरिक व शास्त्रीय नृत्य-गायन, बैलबंडी सजावट स्पर्धा, बँड पथक स्पर्धा, रासगरबा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांचे नियोजन, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि महोत्सव यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

## स्वयंचलित वाहन चाचणी केंद्र सुरू

**अमरावती-** अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालया अंतर्गत येणारे अंजनगाव बारी (बडनेरा) येथील स्वयंचलित वाहन चालन चाचणी पथ (एटीएस सेंटर) सोमवार १२ ऑक्टोबर पासून वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी सुरू झाल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.वाहन धारकांना नूतनीकरणासाठी services.parivahan.gov.in/AFMS/#/atscenter या संकेतस्थळावर ऑनलाईन तारीख आणि वेळ राखीव करावी लागेल. वाहनाला हाय-सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवलेली असल्याशिवाय ऑनलाईन स्लॉट बुक करता येणार नाही, असेही कळविण्यात आले आहे.

## आंतर विद्यापीठ मल्लखांब (पुरुष) स्पर्धेकरिता संघ घोषित

**अमरावती -** कोटा युनिर्व्हसिटी, कोटा येथे २८ ते ३० ऑक्टोबर, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मल्लखांब (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.चमूंमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय,अमरावतीचा वृषभ धोटे व यश हिरेखन, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचा सुजल धोटे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन,अमरावतीचा हिमांशू राठोड, जवाहरलाल दर्डा इन्स्टिटुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळचा पार्थ नित,श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वेचा प्रथमेश मुळीक व बाबासाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगांवचा सोहम पेंडसे याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरूंनी अभिनंदन केले आहे.चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे १६ ते २५ ऑक्टोबर, दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## बाबासाहेबांच्या स्मारक सौंदर्यीकरणासाठी जनप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा

**शिराळा -** नजिकच्या सावंगा (आसरा) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या सौंदर्यीकरणासाठी गेल्या अनेक वर्षांपासून आमदार, खासदार यांच्याकडे निवेदने देऊन, प्रत्यक्ष भेटी घेऊन तसेच तोंडी चर्चा करून सातत्याने मागणी करण्यात येत आहे. मात्र, अद्याप या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झालेली नसल्याने आता समस्त खेडकर परिवार व भिमशक्ती युवा क्रीडा मंडळाने लोकसहभागातून हे काम पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार केला आहे.स्मारकाचे सौंदर्यीकरण करणे ही सामाजिक आणि सार्वजनिक हिताची बाब आहे. या कामासाठी स्थानिक आमदार आणि खासदार यांनी पुढाकार घेऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा व स्मारकाच्या विकासासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या सौंदर्यीकरणासाठी आमदार आणि खासदार यांनी सकारात्मक भूमिका घेऊन निधी व आवश्यक प्रशासकीय सहकार्य द्यावे, अशी मागणी समस्त खेडकर परिवार व भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ सावंगा आसरा यांनी केले आहे.

# जेन झी ! तुमच्या मागण्या रास्त आहेत...पण,




**जे**न झी, जेन अल्फाने भारतासकट आपापल्या देशांच्या शासनाला खडसावून विचारले पाहिजे. 'तुम्ही एवढी लाखो कोटी/ डॉलर्स कर्जे आमच्या नावाने काढता तर ते पैसे जातात कोठे?' जेन झी पाठोपाठ आपल्या देशातील जेन अल्फा म्हणजे सध्या शाळेत असणाऱ्या मुलांनी महाराष्ट्रासह अनेक राज्यात, आपापल्या शाळांमधील पिण्याचे पाणी, टॉयलेट आदी बेसिक सुविधा नसल्याबद्दल, अपुऱ्या शिक्षकांच्या संख्येबद्दल आंदोलने केली त्याच्या बातम्या, व्हिडिओ क्लिप्स आपण वाचल्या/पाहिल्या आहेत. याबाबतीत भारत काही एकटा देश नाही.

अगदी तशाच मागण्या करीत फ्रान्समधील पॅरिस सहित काही शहरांमधील शाळांमधील विद्यार्थी तुफान आंदोलने करीत आहेत. ता देशात किमान ५० शाळांमध्ये बरीच मोडतोड झाली आहे, काही हजार विद्यार्थ्यांना तेथील पोलिसांनी पकडले आहे. या विद्यार्थ्यांना पाठिंबा म्हणून किंवा स्वतःहून फ्रान्समधील शिक्षक, अग्निशमन कर्मचारी अपुऱ्या वेतनाविरूद्ध वगैरे आंदोलने करत आहेत.

दुसरा भडका उडाला आहे स्पेनमध्ये. जेथे न परवडणाऱ्या घरांचा प्रश्न गंभीर बनला आहे. भाडी परवडत नाहीत, गृहकर्ज काढले तर ईएमआय परवडत नाहीत. म्हणून देशातील अनेक शहरांमध्ये आंदोलने झाली. त्याला कारण झाली एक दुर्दैवी घटना. ज्यात भाडे भरले नाही म्हणून एका ८३ वर्षे वयाच्या, एकट्या राहणाऱ्या आजीना रिअल इस्टेट कंपनीने बाहेर काढले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. साचलेल्या असंतोषवर ठिणगी पडली आणि सर्वत्र आग पसरली. एवढी की स्पेनचे पंतप्रधान सांचेझ यांना नोव्हेंबर मध्ये मध्यावधी निवडणुका जाहीर कराव्या लागल्या आहेत.

गरीब विकसनशील देशात सामान्य नागरिकांच्या राहणीमानाच्या ज्वलन्त प्रश्नांवर जनता रस्त्यावर उतरली तर एकवेळ समजू शकते. पण विकसित देशात देखील? अमेरिकेत न्यूयॉर्कमधील ममदानी अपवाद नाही. अमेरिकेतील अनेक राज्यात सोशल डेमोक्रॅट्स महापौर आणि प्रतिनिधींना ममदानी सारख्या जनकेंद्री आर्थिक अजेंड्यावर भरघोस मते मिळत आहेत.

जगात सर्वच देशात सामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याशी निगडित प्रश्न, घरे, शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वाहतूक, वेतन, पेन्शन इत्यादी जीवघेणे झाले असतील तर या सर्व देशांमध्ये काहीतरी सामायिक/कॉमन असले पाहिजे. ती कॉमन गोष्ट आहे नवउदारमतवादी तत्वज्ञानावर आधारित आर्थिक धोरणे; ज्यात कल्याणकारी धोरणे गुंडाळून ठेवणे, अर्थसंकल्पीय तुटीचे गुन्हेगारीकरण करणे, जे जे खाजगी असेल त्यावर फारसे कर न बसवता प्रचंड सवलती देणे, सर्व काही मार्केट शक्तींच्या अधीन करणे अभिप्रेत होते आणि आहे. कल्याणकारी राज्य संकल्पना का गुंडाळली? पैसे कमी होते म्हणून नाही. पैसे तर बाजारातून कर्जरूपाने/पब्लिक डेट मोप उभे केले. सर्व देशांचे मिळून पब्लिक डेट १११ ट्रिलियन्स डॉलर्स अशा ऐतिहासिक उंचीवर आहे.

भारत विश्वगुरू बनण्याच्या शर्यतीत १२ वर्षांपूर्वी आता उतरला. विश्वगुरुंचा विश्वगुरु अमेरिका. १९८१ साली निक्सन / थॅचर काळात अमेरिकेचे पब्लिक डेट फक्त १ ट्रिलियन डॉलर्स होते, २०१७ मध्ये २० ट्रिलियन्स आणि २०२६ मध्ये ४० ट्रिलियन्स ! तुम्ही कल्पना करू शकता. अमेरिका भारतासकट अनेक देशांचे रोल मॉडेल आहे.

पब्लिक डेट म्हणजे सामान्य नागरिकांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा. त्यांना नैतिक, घटनात्मक अधिकार, स्वार्थ म्हणून राजकीय नेतृत्वाला जाब विचारण्याचा अधिकार आहे ष्ठका आमच्या नावाने जे कर्ज उचलता ते जाते कोठे? कनेक्ट डॉट्स.

१. कर्जरूपाने उचललेले हे पैसे सामान्य नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी खर्ची पडले असते तर त्यातून अर्थव्यवस्थांना देखील चलाना मिळाल्या असत्या.

२. जगातील संरक्षण सामुग्रीवर दरवर्षी होणारा खर्च, जो फक्त सार्वजनिक तिजोरीतून होत असतो, सतत वाढत आला आहे. सम्पूर्ण जगात २०२५ या वर्षात साडेतीन ट्रिलियन डॉलर्स (म्हणजे भारताची जीडीपी). युद्धखोरी वाढली, युद्धे वाढली, म्हणून मग पुन्हा संरक्षण खर्च वाढले. आधी काय येते ते तुम्ही ठरवा. युद्ध की युद्धसामग्री?

३. याच काळात जगातील / भारतातील वरच्या एक टक्का नागरिकांकडे जमा होणारी संपत्ती वाढली; सध्या जगातील एक टक्का लोकांकडे जगातील अर्धी संपत्ती, आणि पहिल्या दहा टक्के लोकांकडे दोन तृतीयांश संपत्ती साठलेली आहे

४. डायरेक्ट टॅक्सेस न वाढवता सर्वच शासनाचा भर कर्ज काढण्यावर. त्यामुळे अर्थसंकल्पातून व्याजावर होणारा खर्च वाढतो. भारतात एकूण अर्थसंकल्पाच्या २५ टक्के रक्कम फक्त व्याजावर खर्ची पडते. कल्याणकारी कार्यक्रम काय खाक राबवणार? जगातील विकसनशील देश शिक्षण आणि आरोग्यावर जेवढा (दोन्ही मिळून) खर्च करतात त्यापेक्षा खूप जास्त खर्च व्याजावर खर्च होतो

जेन झी ! तुमच्या मागण्या रास्त आहेत. पण तुमच्या भौतिक प्रश्नांची मुळे देशाच्या विशिष्ट राजकीय आर्थिक धोरणांमध्ये आहेत हे लक्षात ठेवा. तुम्ही भले सरकार बदलाल, जे बदलण्याची वेळ नक्कीच आली आहे. पण गाभ्यातील आर्थिक धोरणे तीच राहिली तर तुमचे प्रश्न आहे तिथेच राहणार. मग तुम्ही काय कराल? मला मान्य आहे की तुमचे लोकशाही हक्क हे आर्थिक हक्कांआधी येतात.. म्हणून या (अ) ज्ञानेशकुमारला हटवल्यानंतर त्या 'अज्ञानी' आर्थिक तत्वज्ञानाला तुम्हाला आव्हान द्यावे लागेल.

**संजीव चांदोरकर**

# नवरात्रीच्या नऊ रंगांतून स्त्रीशक्तीचा हुंकार



**न**वरात्रीचे नऊ दिवस नऊ रंगांची उधळण सर्वत्र आनंद, उत्साह, चैतन्य आणि भक्तिमय वातावरण, कुठे आईच्या पूजेची लगबग, कुठे आरतीचे सूर, तर कुठे गरबा-दांडियाच्या तालावर थिरकणारी तरुणाई! प्रत्येक घरात, प्रत्येक मनात आदिशक्तीच्या आगमनाचा आनंद ओसंडून वाहत असतो. नऊ दिवस आपण मोठ्या श्रद्धेने, भक्तिभावाने आणि मनोभावे आईची पूजा करतो. तिच्या चरणी नतमस्तक होतो. तिच्या शक्तीची महती गातो. पण मनाला एक प्रश्न सतत अस्वस्थ करतो ज्या आईला आपण नऊ दिवस एवढ्या भक्तिभावाने पूजतो, तिच्याच रूपातील एखाद्या मुलीवर, स्त्रीवर अत्याचार झाल्याची बातमी कानावर पडली, तर आपली ही भक्ती कुठे जाते?

आईच्या आगमनाने घराघरांत मंगलमय वातावरण निर्माण होत असतानाच, वर्तमानपत्रातील एखादी बातमी मनाचा थरकाप उडवते. एखाद्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराची बातमी वाचली की काळजाचा ठोका चुकतो. तिचं निष्पाप बालपण, तिच्या डोळ्यांतील निरागस स्वप्नं आणि तिचे कोवळे आयुष्य क्षणभरात सगळे डोळ्यांसमोर उभे राहते. मन सुन्न होतं, डोळे पाणावतात आणि मनात एकच प्रश्न निर्माण होतो नेमकं कोणत्या दिशेने चाललो आहोत आपण?

आई, तू नऊ दिवसांसाठी येतेस तुला फुलांनी सजवतो, सोन्या-चांदीचे दागिने अर्पण करतो, तुझ्यासमोर दिवे लावतो, तुझा जयघोष करतो; पण तुझ्याच लेकरांच्या वाट्याला भीती, अपमान आणि असुरक्षितता का येते गं? तुझ्या हातातील त्रिशूळाला शक्तीचे प्रतीक मानणारा समाज स्त्रीच्या हातात मात्र आजही असहायतेची बेडी का पाहतो? तुझ्या महिषासुरमर्दिनी रूपाचा जयघोष करणारे आपण, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्या विकृत मानसिकतेविरुद्ध ठामपणे उभे राहायला कधी शिकणार?

अत्याचाराची घटना घडली की काही दिवस संताप व्यक्त होतो. कँडल मार्च निघतात, निषेध मोर्चे काढले जातात, सोशल मीडियावर पोस्टचा पाऊस पडतो. आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जाते. हे सगळे महत्त्वाचे आहे; पण त्यानंतर काय? काही दिवसांनी पुन्हा शांतताष्ठ आणि पुन्हा एखादी काळीज पिळवटून टाकणारी बातमी! फक्त मेणबत्त्या पेटवून चालणार नाही; अन्यायाविरुद्ध आपल्या मनातील ज्वालाही तेवती ठेवावी लागेल. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. गुन्हेगारांना कायद्याची भीती वाटली पाहिजे आणि पीडितेला समाजाचा आधार मिळाला पाहिजे. तक्रार करणाऱ्या मुलीला दोष देण्याऐवजी तिच्या पाठीशी उभे राहण्याची हिंमत प्रत्येकाने दाखवली पाहिजे.

मुलींना संस्कार शिकवणे जितके आवश्यक आहे, तितकेच मुलांना स्त्रीचा आदर करायला शिकवणेही आवश्यक आहे. घरातूनच संमती, समानता, संवेदनशीलता आणि स्त्री-सन्मानाचे संस्कार रुजले, तर उद्याचा समाज नक्कीच अधिक सुरक्षित होऊ शकतो.

आज नवरात्रीच्या निमित्ताने आणखी एक गोष्ट मनापासून सांगावीशी वाटते. मुलींना गरबा-दांडियाचे वर्ग लावूया, त्यांना नटू देऊया, सजू देऊया, आनंदाने जगू देऊया; पण त्याचबरोबर त्यांना स्वसंरक्षणाचे धडेही देऊया. संकटाच्या वेळी मदत कशी मागायची, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी कोणती पावले उचलायची, अन्यायाविरुद्ध आवाज कसा उठवायचा, कायदेशीर मदत कुठे मिळवायची, हेही शिकवूया.

ज्या आदिशक्तीने असुरांचा संहार करून जगाला भयमुक्त करण्याचा संदेश दिला, त्या आदिशक्तीचे रूप प्रत्येक स्त्रीमध्ये आहे. गरज आहे ती तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देण्याची, तिच्या आत्मविश्वासाला बळ देण्याची आणि तिच्या स्वातंत्र्याचा सन्मान करण्याची. देवीची आरती करताना तिच्या रूपातील प्रत्येक स्त्रीच्या सुरक्षिततेसाठीही संकल्प करा. कारण देवीची पूजा आणि स्त्रीचा अपमान या दोन गोष्टी एकाच वेळी खऱ्या भक्तीचे प्रतीक होऊ शकत नाहीत. चला, या नवरात्रीत नऊ रंगांसोबत नऊ संकल्प करूया...स्त्री-सन्मानाचा, सुरक्षिततेचा, समानतेचा, स्वसंरक्षणाचा, संवेदनशीलतेचा, न्यायाचा, निर्भयतेचा, एकजुटीचा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा!

आई, तुझ्या नऊ दिवसांच्या उत्सवातून आम्हाला केवळ भक्तीच नव्हे, तर अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्तीही दे. आमच्या मुलींच्या आयुष्यात भीतीचे अंधार दूर होऊ दे आणि स्वाभिमानाचा, सुरक्षिततेचा व समानतेचा नवा सूर्योदय होऊ दे!



**श्रद्धा मंगेश कोल्हटकर**
**डगवार,** अमरावती
मो.८७६६५४०५१३

# ८५० वर्षांच्या इतिहासाची साक्ष देणारे आशा मनिषा मंदिर

**ख**ल्लार-दर्यापूर येथे चंद्रभागेच्या तिरावर असलेल्या आशा-मनिषा माता मंदिर हे वऱ्हाडात प्रसिद्ध आहे. सुमारे ८५० वर्षांच्या इतिहासाची साक्ष देणारे हे देवस्थान आजही भक्तांसाठी श्रद्धास्थान आहे, या मातेला पूर्वज हंसापुरी -मनसापुरी मातेच्या नावानेही ओळखायचे. कालांतराने हे मंदिर आता आशा- मनिषा नावानेच ओळखले जाते वयोवृद्ध मंडळी मात्र आजही हंसापुरी-मनसापुरी माता असाच या देवस्थानाचा उल्लेख करतात. या देवी मूळच्या राजपुतान्यातील असून पेंढारी जमातीच्या एका भक्तांबरोबर त्या दर्यापुरात आल्या व मूर्ती रूपाने चंद्रभागेच्या तीरावर स्थिरावल्या अशी आख्यायिका आहे. त्या काळातील देवी भक्तांनीच मंदिराची उभारणी केली सुमारे ८५० वर्षांपूर्वी बांधलेले हे मंदिर अद्यापही सुस्थितीत आहे. माता मंदिराच्या सभोवती असलेल्या कोट व बुरुज यांची दुरुस्ती करण्यात आली आहे. चंद्रभागा नदीच्या काठावर असलेल्या या मंदिराला ७ जुलै २००७ ला चंद्रभागेला आलेल्या महापुराचा फटका मंदिराला सुद्धा बसला होता मात्र आता मंदिराची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करण्यात आली आहे. चंद्रभागेने आशा- मनिषा मातेचे दर्शन घेतल्यानंतर तेव्हा पूर ओसरला होता. अशी श्रद्धा आहे.

वऱ्हाडचा तिसरा स्वतंत्र राजा दर्या इमाद शहा याने १५२९ मध्ये हे शहर वसविले असल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो. १५२९ ते १५६० पर्यंत या राजाने राज्य केले. त्यांच्या नावानेच या शहराचे नामकरण दर्यापूर असे झाले. दर्यापूर च्या जुन्या वस्तीतील खोलापुरी वेश आणि देशमुखांची जुने वाडे आजही त्यांची साक्ष देतात वतनदारी पद्धत बंद झाल्यानंतर येथील जटाळे या गुरव परिवाराकडे मंदिराचा व्यवस्थेचे अधिकार आले. कै. बाबासाहेब देशमुख यांच्या वाड्यातून देवी मंदिरापर्यंत



आजही भुयारी मार्ग असल्याचे अनेक जाणकारांचे मत आहे. त्या काळात देशमुख घराण्यातील महिला देवीच्या दर्शनास या भुयारी मार्गाचा वापर करीत असत.

१८७० तेव्हाच्या हैदराबाद संस्थांकडून कै. रामा जटाळे यांना देवी मंदिराची पूजाअर्चा करण्याचे व व्यवस्थापनाचे इमानपत्र मिळाले ती वंशपरंपरा आजही सुरू आहे. नवरात्र उत्सव उत्साहात साजरा केला जातो. सकाळी पाच वाजता व सायंकाळी सात वाजता येथे नेहमी आरती असते. यावेळी भक्तांची मोठी गर्दी असते, वर्षभर भाविकांचे इथे येणे असते. सद्य स्थितीत या मंदिराचा ट्रस्ट निर्माण झाला असून त्यात संजय भारसाकळे, उमेश तायडे, निलेश जटाले, प्रविण धनसकर ॲड. रमण जयस्वाल, हेमंत सत्यदेव गडकरी यांनी परिश्रमाने या मंदिराची पुनरनिर्मिती करत सोई सुविधा निर्माण केल्या आहेत आजही येथील निर्माण कार्य सुरु आहे.

नवरात्र उत्सवात भावी भक्तांकडून १००८ दिव्यांचा अखंड दिप महायज्ञ सुरू करण्यात आला आहे हा दिप महायज्ञ नवरात्र उत्सवात अखंडपणे २४ तास सुरू राहणार असून मंदिर प्रशासनाने यासाठी मोठी तयारी केली आहे.

दसऱ्याला देवीला सोनं (आपट्याची पाने) वाहल्यानंतर खऱ्या अर्थाने येथील दसऱ्याला सुरुवात होत असल्याची माहिती आहे. भक्तांची संकटे दूर करणारी देवी म्हणून परिसरात श्रद्धा आहे. दसऱ्याला मोठ्या प्रमाणावर भक्त देवीला सोन वाहतात त्यानंतर एकमेकांना देतात अशी प्रथा आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वारा जवळ असणाऱ्या रस्त्यासाठी मंदिर ट्रस्टने अनेक वेळा प्रशासनाला विनंती केल्यानंतरही प्रशासनाने हा रस्ता दुरुस्त केला नाही. अखेर मंदिराच्या ट्रस्टने लोकांच्या सोयी सुविधेसाठी मंदिर खर्चातील रकमेतून मुख्य प्रवेश द्वारा जवळचा सिमेंट रस्ता तयार केला. या मंदिराजवळून पेठ ईदबारपूर या गावात जाणारा रस्ता असल्याने सुमारे ३५ वर्षांपूर्वी शासकीय निधीतून या ठिकाणी चंद्रभागेवर पूल निर्माण झाला होता. मात्र आता राहदारी मोठ्या प्रमाणे वाढल्याने हा पूल हळूहळू क्षतिग्रस्त होत गेला आहे.

या पुलाची डागडुजी व दुरुस्ती व्हावी यासाठी सुद्धा मंदिर प्रशासनाने अनेक वेळा शासनाला विनंती केल्या.




## समाजकार्याला जोडलेली सरिता मदने



**चौथी माळ**

**र**सिकांनो, एखादी व्यक्ती बघितल्यानंतर लगेच, त्या व्यक्तीतील उत्साह, मदत करण्याची धडपड आणि शारीरिक आवाक्याच्या पलीकडील काम करण्याची मानसिक तयारी आपल्याला लक्षात येते. त्यापैकीच एक म्हणजे सरीता मदने, अमरावती.

सरिताकडे प्रचंड उत्साह आहे. ती आनंदी आहे. हसरी आहे आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तिची धडपड कायम सुरूच असते. दरवर्षी महिला दिनाला वेगवेगळ्या महिलांचा सत्कार ती करीत असते. दोन-तिन वर्षांपासून मी पण तिच्यासोबत असते. घरातील काम करणाऱ्या महिलांचा किंवा पोलीस डिपार्टमेंटला असलेल्या महिलांचा गौरव करण्याची



कल्पना सौ. सरीताने राबवली आहे. समाजकार्याबरोबरच तिने शिक्षणाची ओढ कायम ठेवली आहे. दुहेरी पदव्युत्तर शिक्षणानंतर पीएचडी पर्यंत तिचा शैक्षणिक प्रवास तिच्या जिद्दीची आणि शिकण्याची आवड असल्याची साक्ष देतो.

दुसऱ्याच्या कामाचे कौतुक करणे यासाठी जो मनाचा मोठेपणा लागतो ना तो सरितामध्ये निश्चित आहे. सरिताने तिच्या समाजासाठी संस्था उभी केलेली आहे त्याची ती अध्यक्ष आहे व त्या संस्थेचे नाव आहे..आरसा ग्रुप.. महिला सामाजिक संस्था..त्या मार्फत अनेक समाजसेवी कार्यक्रम ती राबवत असते. सामाजिक राजकीय व साहित्य क्षेत्रात राज्यस्तरीय आणि एक राष्ट्रीय पुरस्कारही तिला मिळालेला आहे..

समाजकार्याच्या जोडीला तिने गृहिणी पदाची जबाबदारी ही चांगली सांभाळलेली आहे आणि त्यामुळे तिच्या वाट्याला तिची मुलगी अधिकारी म्हणून निवडल्या गेल्याने, कौटुंबिक जबाबदारीच्या यशाची पावतीही मिळाली आहे. अशा ह्या सरिताला अंबाबाई अशीच आनंदी ठेवो..तिच्या वाट्याला निरामय आयुष्य येवो अशी सदिच्छा व्यक्त करून अंबाबाईच्या या समाजसेवी रूपाला माझी ही मला अर्पण करते.

**ॲड. सुलभा गोगरकर**
अमरावती

# मंगरूळची मंगलामाता: माहूरचे उपशक्तीपिठ

**धामणगाव रेल्वे/ वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव तहसिलमध्ये मंगरूळ दत्त हे बारा मुंडाचे गाव असून या गावात सुंदर व भव्य अनेक मंदिरे आहे. संत महात्म्यांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या या गावाच्या पश्चिमेकडे एक कि.मी. अंतरावर पूर्वाभिमुख भगवती मंगलामातेचे प्राचिन व जागृत स्थान आहे. इसवी सन २००० मध्ये या मंदिराच्या बांधकामाचे जुने झाले असता कौंडण्यपूर येथील शंकराचार्य भागवत महाराज यांनी उद्बोधन करताना 'बाळ, परत ये, मी वाट पाहते' असे उच्चारले आणि हेच ब्रिदवाक्य पुढे प्रचलित आणि प्रख्यात झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवळकर गुरुजी या ठिकाणी आले होते. हे येथे उल्लेखनीय या गावाला संतांची भुमी आणि मंदीरांचे गाव असेही म्हणतात. संत लहानुजी महाराज व संत गणपती महाराज यांचा जन्म येथेच झाला होता.

श्री. मंगला मातेच्या येथील वास्तव्याबद्दल असे सांगतात की, साधारण २०० वर्षापुर्वी येथील कोणी भक्त नवरात्रात माहूरला रेणुका मातेच्या दर्शनास जात होता. पुढे तो वृध्दावस्थेमुळे



माहूरला जाऊ शकत नसल्यामुळे तो फार दुःखी झाला. रेणुका माता म्हणाली 'तू चिंता करु नकोस मीच तुझ्या गावाला येते.' पुढे कोणी सदपुरुष या मार्गे जात असता त्याच्या नित्य पूजेतील श्री रेणुकाईचा तांदळा येथे मंगलधाम परिसरात राहिला. पुढच्या मुक्कामी तांदळा (मुखवटा) नसल्याचे लक्षात आल्यावर तो परत मंगलधाम परिसरात आला असता रेणुकाई ने 'मी आता येथेच राहणार असे सांगितले.' तो प्रगट दिन चैत्र शु. चतुर्दशीचा होता, तेव्हापासुन आजही चैत्र शु. १४ ला येथे दरवर्षी कुळाचाराचा उत्सव होतो. या मंगलामातेला भवानी माता सुद्धा म्हणतात. हे स्थान माहूर क्षेत्राचे 'उपशक्तीपीठ' असल्यामुळे माहूरच्या रेणुकाईला केलेला नवस येथे सुद्धा फेडतात.

ही मंगला माता अनेक घराण्यांची कुलदेवता आहे. मध्यंतरी काही काळ हे स्थान दुर्लक्षित होते. इ.स. १९४२ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय

## द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींनी घेतले होते दर्शन

सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी मंगरूळची संघ शाखा पाहण्याकरिता आले असता भगवतीचे दर्शनास गेले. तेथे त्यांना भगवतीचा साक्षात्कार झाला. प.पू.श्री. गुरूजींनी हे स्थान जागृत असल्याचे सांगितले. प.पू. स्वामी शिलानंद सरस्वती हे संन्यास घेतल्यानंतर साधना करण्याकरिता माहूर वरून स्थान शोधत मंगरूळला आले.

देवी भागवतातील नवम स्कंधात 'मंगलचंडी' नावाने श्री मंगलामातेचा उल्लेख आहे. भक्तांचे मंगल करण्याकरिता जी तत्पर आहे ती 'मंगलचंडी' फार पूर्वी मंगल नावाच्या राजाने प्रकृती अंश सावित्रीदेवीची उपासना केली. राजाच्या विनंतीने देवी सावित्रीच त्याचे घरी कन्या रूपाने प्रकट झाली म्हणुन तिचे नाव मंगलादेवी असे ठेवले. 'मंगलांधयति इति मंगला' जन्म मृत्यरुप दुःखातून जी भक्तांना तारते ती मंगला. ही मंगला देवी मंगळ ग्रहाची अधिष्ठात्री आहे. हिच्या उपासनेने मंगळ ग्रहाचे दोष नाहीसे होतात. मंगला देवीच्या उपासनेने विवाह आदी कार्ये लवकर होत असल्याचा अनेक भक्तांचा अनुभव आहे. मंगळागौरी चे व्रत हिच्याच नावाने करतात. मंगलादेवी चे स्थान भारतात दोनच ठिकाणी आहे. एक काशी क्षेत्री मंगलागौरी व दुसरे मंगरूळ दत्तला. मंगरूळच्या मंगलामाता देवस्थानचे व्यवस्थापन व सेवा अध्यक्ष प्रभाकर खानजोडे, उपाध्यक्ष दिवाकर देशपांडे, सचिव रवींद्र देशपांडे, सह सचिव प्रशांत शेटे कोषाध्यक्ष राजेश सोनी, विश्वस्त जुगल किशोर मुंदडा, प्रदीप फडणवीस, शरदचंद्र देशपांडे सह मुख्य पुजारी मोहन देव, व्यवस्थापक विवेक देव, भूषण पिंपळे, सुदाम जांभुरे व देवीचे परमभक्त वैभव पोतदार मंदिराचे प्रसिद्धी प्रमुख हे प्रचार व प्रसाराचे चे कार्य प्रामुख्याने पाहतात.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला जिल्हा विशेष

# काटेपूर्णा प्रकल्पात जेमतेम १७ दलघमी साठा; पाणीटंचाईचे संकट गडद!

## खांबोरा येथील उन्नी बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सुरुवात; पर्यायी उपाययोजनांसाठी रणधीर सावरकर यांचा पाठपुरावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेता उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून पर्यायी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. काटेपूर्णा प्रकल्पात सध्या जेमतेम १७ दलघमी पाणीसाठा उपलब्ध असून, दरमहा ३.७५ दलघमी पाणी उचलले जात आहे. त्यामुळे आगामी काळातील पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पर्जन्यमानावर परिणाम झाल्याने जलस्त्रोतांमध्ये अपेक्षित पाणीसाठा निर्माण झालेला नाही. काटेपूर्णा प्रकल्पावर अकोला महानगरासह खारपाणपट्ट्यातील ६४ गावे आणि मूर्तिजापूर शहराच्या पाणीपुरवठ्याची जबाबदारी आहे. उपलब्ध साठा आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, डिसेंबरअखेरपर्यंत जलसाठा





संपुष्टात येण्याची शक्यता असून, त्यानंतर पाणीटंचाई अधिक गंभीर होण्याचा धोका आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार सावरकर यांनी शासनाकडे पाच पर्यायी उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यांचा सविस्तर आराखडा तयार करून मान्यतेसाठी तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. जलसंधारणाची कामे, प्रकल्पांतील गाळ काढणे, नदी-नाले आणि तलावांचे खोलीकरण, शेततळ्यांमधील जलसाठा वाढविणे तसेच पाण्याचा अपव्यय रोखणे, अशा उपाययोजनांवर त्यांनी भर दिला.

### खांबोरा बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सुरुवात

काटेपूर्णा नदीवरील खांबोरा येथील उन्नी बंधाऱ्याची जलसाठवण क्षमता वाढविण्यासाठी गाळ काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यासंदर्भात आमदार सावरकर यांनी यापूर्वीच पाटबंधारे विभागाला सूचना केल्या होत्या. आज सकाळी मुंबईहून अकोल्यात परतल्यानंतर त्यांनी खांबोरा पाणीपुरवठा योजनेच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.

सन २०१६-१७ मधील पाणीटंचाईच्या काळात मूर्तिजापूर शहर आणि खारपाणपट्ट्यातील ६४ गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी काटेपूर्णा प्रकल्पापासून खांबोरा उन्नी बंधाऱ्यापर्यंत बंद पाइपलाइन टाकण्याच्या २३ कोटी ७७ लाख ९५ हजार रुपये खर्चाच्या प्रस्तावाला १६ मे २०१७रोजी शासनाची मंजुरी मिळवून देण्यात आली होती. आता प्रकल्पातून पाणी नदीपात्रात सोडण्याऐवजी तयार करण्यात आलेल्या बंद पाइपलाइनद्वारे सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे.

### शासनस्तरावर पाठपुरावा

अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघासह अकोला शहरात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी मागील तीन महिन्यांपासून आराखडा तयार करून प्रशासन आणि शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे सावरकर यांनी सांगितले. जलसंपदामंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडेही यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, जलसंपदा मंत्रालय, पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका यांच्या समन्वयातून उपाययोजना राबविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यावेळी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता चिन्मय वाकोडे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता राठोड, जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, अजय मालोकर, पाणीपुरवठा उपअभियंता कांचन उमाळे यांच्यासह ग्रामस्थ पंकज वाडिवाले, जय ठोकळ, परमेश्वर साखरे, ज्ञानेश्वर पोटे, बंटी मांगे, सुबोध गवई, पप्पू असलमोमल आणि रवी राऊत उपस्थित होते.

# अकोल्यात १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान 'एज्यु एक्स्पो २०२६'

## शिक्षण, करिअर आणि कौशल्य विकासाचा भव्य उत्सव

■ प्रतिनिधी | अकोला ■

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण, करिअर, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या विविध संधी एकाच छताखाली उपलब्ध करून देणाऱ्या 'एज्यु एक्स्पो २०२६' या भव्य शैक्षणिक महोत्सवाचे आयोजन युवा सक्षम फाऊंडेशन, अकोला यांच्यातर्फे १४, १५ व १६ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय मैदान, मूर्तिजापूर रोड, अकोला येथे होणारा हा महोत्सव दररोज सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुला राहील.

दहावी-बारावीनंतर नेमके कोणते शिक्षण घ्यावे, करिअरची योग्य दिशा कशी निवडावी, पारंपरिक अभ्यासक्रमांव्यतिरिक्त कोणते पर्याय उपलब्ध आहेत आणि बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात कोणती कौशल्ये आत्मसात करावीत, अशा विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या महत्त्वपूर्ण प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी हा एक्स्पो उपयुक्त ठरणार आहे. या महोत्सवात १२० हून अधिक स्टॉल्स असतील. केजी ते पीजी शिक्षण, परदेशी शिक्षण, करिअर मार्गदर्शन, सायकोमेट्रिक मूल्यांकन, स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक कर्ज, डिजिटल लर्निंग, कौशल्य विकास, स्टार्टअप्स आणि उदयोन्मुख करिअर क्षेत्रांबाबत माहिती व मार्गदर्शन उपलब्ध होईल. नामांकित शैक्षणिक संस्था, करिअर तज्ज्ञ आणि प्रशिक्षण संस्थांशी थेट संवाद साधण्याची संधीही विद्यार्थ्यांना मिळणार आहे. नासा कडून फिरती प्रयोगशाळा आणि विविध शास्त्रज्ञांची उपस्थिती हे या एक्स्पोचे आकर्षण राहणार आहेत.क्रिएटर कॉन्क्लेव्ह, 'करिअर अनकट' लाईव्ह पॉडकास्ट स्टुडिओ, फ्युचर स्किल्स अरेना, विद्यार्थी स्पर्धा, कार्यशाळा तसेच फूड व गेम झोन ही या महोत्सवाची प्रमुख आकर्षणे असतील.

अकोला, अमरावती, बुलढाणा, हिंगोली, जळगाव, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या आठ जिल्ह्यांतील विद्यार्थी, पालक व शिक्षकांना मोठ्या शहरांकडे न जाता आपल्या परिसरातच विविध शैक्षणिक आणि करिअरच्या संधींची माहिती मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. 'तीन दिवस, एक व्यासपीठ, अमर्याद संधी' या संकल्पनेतून आयोजित करण्यात येणाऱ्या या महोत्सवाला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग द्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अकोल्यात १३ ते १६ ऑक्टोबर दरम्यान अतिक्रमण हटाव मोहीम

## चार प्रमुख मार्गांवरील अतिक्रमणे स्वतःहून हटविण्याचे मनपा प्रशासनाचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील प्रतिबंधित मार्गांवरील अतिक्रमणांना हटविण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. १३ ते १६ ऑक्टोबरदरम्यान शहरातील चार प्रमुख मार्गांवर अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मार्गांवरील व्यावसायिकांनी दुकानांसमोरील शोकेज, साहित्य, टीनपत्र्यांचे शेड आणि अन्य अतिक्रमणे स्वतःहून हटवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मनपाने केले आहे.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. पूर्व झोनमधील सिव्हिल लाईन्स चौक ते जवाहर नगर चौक, दक्षिण झोनमधील हुतात्मा स्मारक चौक ते संत तुकाराम हॉस्पिटल चौक, उत्तर झोनमधील सिटी कोतवाली चौक ते शिवाजी पार्क तसेच दुर्गा चौक ते जठारपेठ चौक ते सातव चौक या मार्गांवर कारवाई केली जाणार आहे.

या मार्गांवरील किरकोळ व्यावसायिकांसह दुकानांसमोर अतिक्रमण करून ठेवलेले साहित्य आणि अनधिकृत शेड हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मोहिमेदरम्यान अतिक्रमणे आढळल्यास ती निष्कासित करून संबंधित साहित्य जप्त करण्यात येणार आहे. तसेच नियमानुसार दंडात्मक कारवाईही केली जाणार असल्याचा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांनी कारवाईची वाट न पाहता अतिक्रमणे स्वतःहून हटवावीत, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

# अकोटमध्ये कत्तलीसाठी बांधून ठेवलेले तीन गोवंश ताब्यात

## शहर पोलिसांची कारवाई; ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोट ■

कत्तलीच्या उद्देशाने घरामागे निर्दयतेने बांधून ठेवलेल्या तीन गोवंशांची अकोट शहर पोलिसांनी सुटका केली. या कारवाईत दोन गायी आणि एका गोऱ्ह्यासह सुमारे ९० हजार रुपये किमतीचे गोवंश ताब्यात घेण्यात आले असून, याप्रकरणी एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



११ ऑक्टोबर रोजी अकोट शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकातील हेडकॉन्स्टेबल गणेश सोळंके यांना खतीबपुरा परिसरात गोवंश कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची गुप्त माहिती मिळाली. शे. नजाकत अली शे. अहेमद अली याच्या घरामागे गोवंश बांधून ठेवल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या आदेशाने पथकाने तत्काळ धाड टाकली.

यावेळी घराच्या पाठीमागे दोन गायी आणि एक गोऱ्हा निर्दयतेने बांधून ठेवल्याचे आढळले. पोलिसांनी पंचांसमक्ष तिन्ही गोवंश ताब्यात घेतले, तसेच संबंधित संशयितालाही ताब्यात घेतले. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील आणि पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, हेडकॉन्स्टेबल गणेश सोळंके, नापोकॉन्स्टेबल विपुल सोळंके, पोलीस कॉन्स्टेबल मोहन दुर्गे, अश्विन चौव्हाण आणि अनिल बैराळे यांनी केली.

### नवदुर्गा महोत्सवासाठी रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्याची मागणी

**अकोला :** हिंदू धर्मीयांचा महत्त्वाचा आणि पारंपरिक सण असलेल्या नवदुर्गा महोत्सवाच्या काळात गरबा रास खेळण्यासाठी दररोज रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्यात यावी, तसेच उत्सवातील सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात यावी अशी मागणी शिंदे शिवसेनेचे विदर्भ प्रवक्ते प्रा. प्रकाश उवले यांनी केली. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदनाद्वारे उपरोक्त मागणी केली आहे.

### जाहीर नोटीस

**वि.०२रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६५६/२०२६ — प्रोसेस नं.१२६८९/२०२६

चौ.ता. २३/११/२०२६ — दिनांक : ०६/१०/२०२६

**अर्जदार :** १. फरजाना बी. मो. अय्युब २. मो. वसीम मो. अय्युब ३. मो. समीर मो. अय्युब रा. मोमीनपुरा, पातूर, ता. पातूर, जि. अकोला. ४. शाहिन परवीन शेख मोहसीन रा. शाहनवाजपुरा नायगाव, शाहनवाज मस्जिद जवळ, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९५५२३१५४४२, ९०११३३५२७९

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत :मोहम्मद अय्युब अब्दुल बशीर

**पत्ता :-** रा. शाहनवाजपुरा नायगाव, शाहनवाज मस्जिद जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहम्मद अय्युब अब्दुल बशीर यांचे दि. १२/०५/२०२६ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**

I Have Change My Name In My Passport Passport No.N9994882 From **SAYIAM SIDDHARTH SETHI** -TO- **SAIYAM SIDDHARTH SETHI**
My Residential Address - 203 second flor, sethi hights, opp. Collector office, Akola, Maharashtra-444001.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३०२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पातूर न.प.तर्फे 'सेवा संकल्प अभियान' अहवाल सादर



## स्वच्छता, आरोग्य शिबिर आणि लोककल्याणकारी उपक्रमांवर दिला भर

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर नगर परिषद क्षेत्रात 'सेवा संकल्प अभियान' अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत असून, गत पंधरवड्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आणि विशेष मोहिमा घेण्यात आल्या.

पातूर शहरात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात अभियानाचे औचित्य साधून संपूर्ण शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये पातूर शहरातील सर्व मुख्य रस्ते आणि नाल्यांची सफाई प्राधान्य क्रमाने करून संपूर्ण परिसर चकाचक करण्यात आला. २५ सप्टेंबर रोजी शहरात 'स्वच्छता ही सेवा' या सूत्राखाली नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली. याच दिवशी पात्र लाभार्थ्यांना 'आयुष्मान भारत कार्ड'चे वाटप करण्यात आले, तसेच शहरातील कचरा वेचकांसाठी 'नमस्ते योजना' अंतर्गत विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती नगरपरिषदेतर्फे श्रीकांत घुगे यांनी दिली. नगर परिषदेच्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांसाठी १ ऑक्टोबरला मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच शहरातील ऐतिहासिक व महत्त्वाचे केंद्र असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि पुतळा परिसराची सखोल साफसफाई करण्यात आली. तसेच विविध शासकीय योजनांच्या यशोगाथांची प्रसिद्धी आणि सार्वजनिक ठिकाणी रांगोळीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. शहरातील महिला बचत गटांसाठी ९ ऑक्टोबरला विशेष मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांना घरातील ओला व सुका कचरा वेगवेगळ्या स्वरूपात गोळा करणे आणि त्याचे वर्गीकरण कसे करावे, याबाबत सविस्तर तांत्रिक माहिती व मार्गदर्शन देण्यात आले.

# मध्यस्थीचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा १८ ऑक्टोबरला

## राज्यभरातील विवाहेच्छुक युवक-युवतींसह पालकांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोट ■

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोट अंतर्गत गठित मध्यस्थी वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन रविवार, १८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता श्री क्षेत्र श्रद्धासागर, अकोट येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात राज्यभरातील विवाहेच्छुक युवक-युवतींसह त्यांचे पालक सहभागी होणार आहेत. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेवराव महल्ले राहणार असून, ज्येष्ठ नेते नानासाहेब हिंगणकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. सकाळी १० वाजता नोंदणी, ११ वाजता उद्घाटन, तर सकाळी ११.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत वधू-वर परिचयाचे पहिले सत्र होईल. दुपारी २ ते ३ या वेळेत सहभोजन, त्यानंतर ३ ते ४ वाजेपर्यंत दुसरे परिचय सत्र आयोजित करण्यात आले आहे. यानंतर पालकांशी संवाद साधून मेळाव्याचा समारोप होणार आहे.

### बाळकृष्ण आमले यांना सोयरीक सेवा सन्मान

समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींचे विवाह जुळवून आणण्यासाठी निःस्वार्थ भावनेने आणि सामाजिक बांधिलकीतून सातत्याने कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा मध्यस्थी मंडळाच्या वतीने दरवर्षी 'श्री संत वासुदेव महाराज सोयरीक सेवा सन्मान पुरस्कार' देऊन गौरव केला जातो. यंदाचा हा पुरस्कार अमरावती येथील सेवाव्रती बाळकृष्ण आमले यांना सपत्नीक प्रदान करण्यात येणार आहे.

### नागपूर, अमरावतीसह पुणे व कारंजा येथेही मेळावे

राज्यस्तरीय मेळाव्यानंतर मध्यस्थी मंडळाच्या वतीने विभागीय वधू-वर परिचय मेळाव्यांचेही आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २४ ऑक्टोबर रोजी नागपूर, २५ ऑक्टोबर रोजी अमरावती, तर १ नोव्हेंबर रोजी पुणे आणि कारंजा लाड येथे मेळावे होणार आहेत.

विवाहेच्छुक युवक-युवती आणि त्यांच्या पालकांनी या परिचय मेळाव्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मध्यस्थी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### शक्तीधाम नवरात्र उत्सवाला भक्तांचा मोठा प्रतिसाद

**अकोला :** गीता नगर येथे शक्तीधाम सेवा समितीतर्फे स्थापन केलेल्या माता महालक्ष्मी, जीणमाता आणि शाकंभरी माता यांच्या शक्तीधाममध्ये सुरू असलेल्या नवरात्र उत्सवाला महिला-पुरुष भक्तांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या नवरात्र उत्सवात धामात सजावट केलेल्या महालक्ष्मी माता, जीणमाता आणि शाकंभरी माता यांच्या प्रतिमांजवळ आराधना, पूजा, मंगलपाठ, भजन आणि रास-गरबा सुरू आहे. यात भाविक महिला सहभागी होऊन मातेची पूजा-अर्चना करत आहेत. सर्वसेवाधिकारी आ वसंत खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनात आयोजित या नवरात्र उत्सवात घटस्थापनेनंतर दुसऱ्या दिवशी नवचंडी पाठ संपन्न झाला.

# खारपानपट्ट्यातील शेतकरी, शेतमजुरांना मदतीचा हात द्या!

## कपाशीचे पीक उद्ध्वस्त; एकरी एक लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची जीवन खवले यांची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील चोहट्टा बाजार परिसरातील खारपानपट्ट्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि शेतमजूर आर्थिक संकटात सापडले आहेत. सिंचनाची सुविधा नसल्याने कपाशीच्या एकमेव पिकावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे पीक पूर्णपणे सुकून नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आणि शेतमजुरांना शासनाने तातडीने भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख जीवन खवले यांनी केली आहे.



खारपानपट्ट्यात शेतीशिवाय रोजगाराची अन्य साधने उपलब्ध नसल्याने शेतकरी आणि शेतमजुरांसमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, विवाह आणि आरोग्यावरील खर्च भागविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या गंभीर परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विदर्भातील नेते बच्चू कडू यांनी विशेष लक्ष घालून बाधित शेतकरी व शेतमजुरांना दिलासा द्यावा, असे आवाहन खवले यांनी केले.

### एकरी एक लाखांची मदत द्या

खारपानपट्ट्यातील शेतकऱ्यांना बँकांकडून केवळ २० हजार रुपयांपर्यंत कर्ज मिळत असल्याचे नमूद करत, ही कर्जमर्यादा वाढविण्याची मागणी खवले यांनी केली. तसेच पीक नुकसानीची पाहणी करून बाधित शेतकऱ्यांना किमान एकरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी आणि शेतमजुरांच्या कुटुंबांसाठीही तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली आहे. संकटाच्या काळात शासनाने खारपानपट्ट्यातील गावांना प्रत्यक्ष भेट देऊन शेतकरी व शेतमजुरांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्यांना आर्थिक मदतीसोबतच मानसिक आधार द्यावा, असेही जीवन खवले यांनी म्हटले आहे.

# भक्तीच्या नावाखाली वसुलीचा बाजार

## ■ लाखोंचा उत्सव साजरा करण्यासाठी सामान्यांच्या खिशावर भार कशासाठी?

## ■ वर्धा येथील दुर्गादर्शनासाठी साधारण १० व्हीआयपी ५० रुपयांचे तिकीट

**वर्धा/जनमाध्यम**

नवरात्रोत्सव म्हणजे भक्ती, श्रद्धा, शक्तीची उपासना आणि सामाजिक एकात्मतेचा जागर! मात्र, वर्धा शहरातील काही दुर्गोत्सव मंडळांमध्ये देवीच्या दर्शनालाच पैशांचे कुंपण घातले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. कुठे १० रुपयांचे तिकीट आकारणी, तर कुठे व्हीआयपी दर्शनासाठी ५० रुपये स्वतंत्र तिकिटांची व्यवस्था असल्याची चर्चा आहे. कृष्णनगरातील एका दुर्गा मंडळात दहा रुपयांचे तिकीट घेतल्याशिवाय प्रवेश दिला जात नसल्याचा आरोप भाविकांनी केला आहे. पैसे देण्याची ऐपत नसलेल्या भाविकांना देवीचे दर्शन न घेताच परतावे लागल्याच्या तक्रारींमुळे सार्वजनिक दुर्गोत्सवाच्या पावित्र्यालाच धक्का बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे. देवीच्या दारातही आता खिशाची ताकद दाखवायची का? हा प्रश्न नागरिकांना अस्वस्थ करीत आहे.

लाखोंचा खर्च केला, आता भाविकांच्या खिशावर डल्ला काही मंडळांचे म्हणणे आहे की, आकर्षक सजावट, भव्य देखावे आणि उत्सवाच्या आयोजनासाठी लाखो रुपये खर्च होतात. त्यामुळे खर्च भागविण्यासाठी तिकीट आकारावे लागते. मात्र, मंडळांच्या या समर्थनावर नागरिकांनी रोखठोक प्रश्न उपस्थित केले आहेत. तुमच्या आर्थिक क्षमतेच्या बाहेर जाऊन लाखोंचा खर्च करता तरी कशासाठी खर्च झेपत नसेल तर अवाढव्य देखावे उभारण्याचा अट्टहास कशाला उत्सवासाठी किती खर्च करायचा, याचे नियोजन मंडळांनीच करायचे असते. केवळ दिखाव्यासाठी लाखोंची उधळपट्टी करायची आणि नंतर त्या खर्चाची भरपाई देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून करायची, हा कोणता न्याय? सार्वजनिक दुर्गोत्सव हा एखाद्या व्यक्तीचा खासगी कार्यक्रम नाही. तो समाजाच्या सहभागातून उभा राहणारा श्रद्धेचा उत्सव आहे. अशा उत्सवात सहयोग राशी स्वेच्छेने स्वीकारणे आणि पैसे दिल्याशिवाय प्रवेश नाकारणे, यातील फरक मंडळांनी समजून घ्यायला नको का दहा रुपये देणे एखाद्यासाठी किरकोळ बाब असेल; पण गरीब कुटुंबासाठी तेही महत्त्वाचे असू शकतात. लेकराबाळांसह श्रद्धेने आलेल्या भाविकाला तिकिटाअभावी परतावे लागणे, ही उत्सवाच्या उद्देशालाच हरताळ फासणारी बाब नाही का?

मंडपांच्या परिसरात पोलिसांचा बंदोबस्त असताना अशा तक्रारी पुढे येत असतील, तर संबंधित यंत्रणांनी त्यांची दखल घेणे आवश्यक आहे. तिकीट आकारणी स्वेच्छेची आहे की प्रवेशासाठी सक्ती केली जात आहे, याची प्रत्यक्ष पडताळणी व्हायला हवी. नवरात्रोत्सवाचा चौथा दिवस सुरू असून पुढील दिवसांत गर्दी वाढणार आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच लक्ष घालून भाविकांची गैरसोय टाळावी.देवीच्या नावावर लाखोंची सजावट आणि दर्शनासाठी पैशांची अट, हा भक्तीचा विरोधाभास थांबणार कधी देवी सर्वांची असेल, तर तिच्या दर्शनावर आर्थिक बंधने कशासाठी सार्वजनिक उत्सवाचे व्यापारीकरण रोखून श्रद्धेचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी मंडळांसह प्रशासनानेही पार पाडावी. देवीचे दर्शन हा श्रद्धेचा विषय आहे, विक्रीचा व्यवहार नव्हे, हा संदेश आता तरी संबंधितांनी लक्षात घ्यावा,

**उत्सवस्थळी पोलीस तैनात, तरीही गैरप्रकारांकडे दुर्लक्ष**

शहरातील सर्व दुर्गा उत्सव मंडळांच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची ड्युटी लावण्यात आली आहे. मात्र, देवीच्या उत्सवाच्या नावाखाली भक्तीचे बाजारीकरण होत असेल, तसेच वर्गणी गोळा करताना नागरिकांवर आर्थिक दबाव टाकला जात असेल, तर तेथे तैनात असलेले पोलीस नेमकी कोणती भूमिका घेतात, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

उत्सवाच्या नावाखाली लाखोंचा खर्च केला जात असेल आणि त्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत असेल, तर अशा प्रकारांना आळा घालण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही काय? जिल्हाधिकारी वनमाथी सी. यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश द्यावेत. सक्तीने वर्गणी वसुली किंवा अन्य नियमबाह्य प्रकार आढळल्यास संबंधित दुर्गा उत्सव मंडळांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भक्ती, ऊर्जा, आनंद अन् एकात्मतेचा त्रिवेणी संगम म्हणजे गरबा-न्यायमूर्ती अरुण चौधरी



**वर्धा/जनमाध्यम**

भक्तीच्या तालावर थिरकणारी पावले, मनात दाटलेला उत्साह आणि एकमेकांशी जोडली जाणारी मने, असा गरब्याचा उत्सव म्हणजे भक्ती, ऊर्जा, आनंद आणि एकात्मतेचा त्रिवेणी संगम आहे, असे प्रतिपादन पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अरुण चौधरी यांनी केले.

आयटी पार्क येथे धूम संस्थेच्या वतीने आयोजित १५ दिवसीय गरबा नृत्य महोत्सवाच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या महोत्सवात तब्बल ७०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

गरबा हा गुजरातच्या पारंपरिक लोकसंस्कृतीतून विकसित झालेला नृत्यप्रकार असला, तरी आज त्याने देशाच्या सीमा ओलांडून जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. गरबा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असल्याचे चौधरी यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ होते. गरब्यामध्ये जात, धर्म, वय आणि आर्थिक स्थितीचे भेद विसरून सर्वजण एकत्र येतात. अशा उत्सवांमुळे समाजात बंधुभाव आणि एकात्मतेची भावना दृढ होते, असे पांगुळ यांनी नमूद केले. प्रमुख अतिथी इमरान राही यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ. अभ्युदय मेघे, उल्हास वाघ, अश्विन साहू, प्रशांत चौधरी, प्रा. दिशा चौधरी, नैना गजबे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक दिशा चौधरी यांनी केले. संचालन अर्चना धानोरकर यांनी केले, तर आभार नैना गजबे यांनी मानले.



# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पॉक्सो कायद्याची जनजागृती

## नेहरू विद्यालयात पोलिस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

**विरूळ आकाजी/जनमाध्यम**

बालकांचे संरक्षण, त्यांचे हक्क आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण होणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकारांची जाणीव व्हावी, अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे धैर्य मिळावे आणि कोणत्याही अनुचित प्रसंगात योग्य मदत घेता यावी, या उद्देशाने विरूळ आकाजी येथील नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात पॉक्सो कायद्याबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात पुलगाव पोलिस ठाण्यातील चंद्रशेखर चुटे आणि महिला पोलिस अधिकारी दुर्गा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी असलेला पॉक्सो कायदा, त्यातील महत्त्वाच्या तरतुदी, बालकांचे अधिकार आणि सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

बालकांच्या सुरक्षिततेसाठी केवळ कायदे असणे पुरेसे नाही, तर त्या कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव निर्माण करणे, बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाजाची संवेदनशीलता वाढविणे आणि कायद्याविषयी योग्य माहिती उपलब्ध करून देणे, या दृष्टीने शाळांमधील असे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात.कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य नितीन गवारकर, पृथ्वीसिंहजी धंधोरिया, पोलिस पाटील निरज तुरके, सविता डंभारे यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणाऱ्या या उपक्रमातून बालसंरक्षणाचा संदेश देण्यात आला.

# माँ राणी कला महोत्सवात आरोग्यसेवेचा माणुसकीचा हात

## आधार फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम; २०० हून अधिक नागरिकांची आरोग्य तपासणी



**हिंगणघाट/जनमाध्यम**

उत्सव म्हणजे केवळ मनोरंजन आणि सांस्कृतिक कार्यक्रम नव्हे, तर समाजातील गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याची संधीही असते. याच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत आधार फाउंडेशन, हिंगणघाटच्या वतीने आयोजित माँ राणी कला महोत्सव २०२६ अंतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री साई मंदिर, नंदोरी रोड येथे पार पडलेल्या या शिबिरात २०० हून अधिक नागरिकांची विविध आजारांसंदर्भात तपासणी करण्यात आली. या उपक्रमातून आरोग्यसेवेचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेशही देण्यात आला.

आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकदा आर्थिक अडचणी, वेळेचा अभाव आणि आरोग्याविषयीची अनास्था यामुळे नागरिकांकडून नियमित तपासणीकडे दुर्लक्ष केले जाते.शिबिरात चर्मरोग, मेडिसिन, बालरोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, कान-नाक-घसा तसेच शस्त्रक्रियेशी संबंधित वैद्यकीय विभागांच्या माध्यमातून तपासण्या करण्यात आल्या. विविध वयोगटांतील नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला. आरोग्याच्या समस्यांकडे वेळीच लक्ष देणे, आजारांची लक्षणे ओळखणे आणि योग्य वैद्यकीय सल्ला घेणे याबाबतही नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या आरोग्य शिबिरासाठी आरोग्य समितीचे प्रमुख राजेश कासवा, डॉ. नरेंद्र मनवर, डॉ. शरद मदलवार, डॉ. संजय हिवरकर आणि डॉ. अनिता मनवर यांनी मोलाचे सहकार्य केले.आधार फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून सांस्कृतिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देण्यात आली आहे. माँ राणी कला महोत्सवाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच नागरिकांचे आरोग्य, सामाजिक जाणीव आणि लोकहिताच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचावा, या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रमांची परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न असल्याचे आधार फाउंडेशनच्या कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहीरकर यांनी सांगितले.यावेळी आधार फाउंडेशनचे संस्थापक अतुल वांदिले, कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहीरकर,ज्योती धार्मिक,वीरश्री मुडे,अनिता गुंडे, सुमन डांगरे, पराग मुडे, डॉ. प्रा. शरद विहीरकर, गौतम कोठारी, सुभाष शेंडे, सुनील डांगरे, सुरेश गुंडे, जगदीश वांदिले, विजय हटवार, अशोक झाडे आणि राजू मुडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# वर्धा बाजार समितीत गांजा सेवन करणाऱ्यावर कारवाई

**वर्धा-**कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात गांजा सेवन केल्याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविला. गजानन गंगाधर माने (वय ३६, व्यवसाय हमाली, रा. सालोड हिरापूर, ता. हिंगणघाट) असे संबंधित व्यक्तीचे नाव नोंदीत नमूद आहे.पोलीस कर्मचारी विवेक बन्सोड यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. घटनास्थळावरून गांजा सेवनासाठी वापरण्यात आलेली चिलम, जळालेली राख, कापडाचा तुकडा, माचिसच्या काड्या आणि पेटलेली सिगारेट असा मुद्देमाल आढळल्याची नोंद आहे. या प्रकरणी १२ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

## भक्तांच्या हाकेला धावणारी भवानी माता! विरूळमध्ये दोनशे वर्षांच्या श्रद्धापर्वाला प्रारंभ

# भवानी माता, अंबादेवी अन् कुरझाई मातेच्या चरणी भाविक नतमस्तक

**विरूळ आकाजी/रवींद्र लाखे**

कुणाच्या ओठांवर देवीचे नाव, कुणाच्या डोळ्यांत दर्शनाची आस, तर कुणाच्या मनात मनोकामना पूर्ण होण्याची श्रद्धा... अशा भक्तिमय वातावरणात विरूळ आकाजी येथे शारदीय नवरात्रोत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. गावाचे आराध्य दैवत असलेल्या भवानी मातेच्या मंदिरासह अंबादेवी आणि कुरझाई मातेच्या मंदिरात घटस्थापना करून नवरात्रोत्सवाचा मंगलारंभ करण्यात आला. सुमारे दोनशे वर्षांची धार्मिक परंपरा लाभलेल्या विरूळ गावात नवरात्रोत्सव म्हणजे केवळ सण नव्हे, तर गावकऱ्यांच्या श्रद्धेचा, भावविश्वाचा आणि पिढ्यानपिढ्या जपलेल्या भक्तिपरंपरेचा जिवंत सोहळा आहे.



नवरात्र चौथा दिवस
आजचा रंग निळा (रॉयल ब्ल्यू)

विरूळ गावात भवानी माता, अंबादेवी आणि कुरझाई माता अशी तीन प्रमुख श्रद्धास्थाने आहेत. या तिन्ही मंदिरांना पुरातन परंपरेची पार्श्वभूमी लाभली आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात या मंदिरांमध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढते. विशेषतः भवानी मातेच्या दर्शनासाठी वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील विविध भागांतून भक्त विरूळ येथे येतात. आपल्या मनातील इच्छा देवीसमोर व्यक्त करणे, कुटुंबाच्या सुखसमृद्धीसाठी प्रार्थना करणे, संकटातून मुक्ती मिळावी म्हणून मातेच्या चरणी नतमस्तक होणे आणि मनोकामना पूर्ण झाल्यानंतर नवस फेडणे, अशा श्रद्धेच्या भावनांनी मंदिर परिसर भारावून जातो.

**नवसाला पावणारी भवानी माता; भक्तांच्या श्रद्धेचे अढळ स्थान**

विरूळ गावाच्या टोकावर वसलेले भवानी मातेचे मंदिर हे परिसरातील भाविकांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. संकटाच्या काळात मातेचे स्मरण करणारे, सुखाच्या क्षणी तिच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करणारे आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी तिच्याकडे प्रार्थना करणारे अनेक भाविक या मंदिराशी भावनिक नाते जोडून आहेत. नवरात्रोत्सवात भवानी मातेच्या दर्शनाला विशेष महत्त्व असते.

मनात एखादी इच्छा घेऊन मातेच्या दरबारात येणारे भाविक भक्तिभावाने दर्शन घेतात. मनोकामना पूर्ण झाल्यानंतर पुन्हा मंदिरात येऊन नवस फेडणाऱ्या भाविकांचीही या काळात गर्दी पाहायला मिळते. देवीवरील श्रद्धा, परंपरेने जपलेली भक्ती आणि पिढ्यानपिढ्या सांगितल्या जाणाऱ्या आठवणी यांमुळे भवानी मातेच्या मंदिराचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

**दोनशे वर्षांचा इतिहास; भवानी मातेच्या मूर्तीचे आगमन आजही गूढ**

भवानी मातेच्या मंदिराला सुमारे दोनशे वर्षांची परंपरा असल्याचे सांगितले जाते. मंदिरातील देवीची मूर्ती नेमकी कुठून आणि कशी आली, याबाबतची निश्चित ऐतिहासिक माहिती उपलब्ध नसल्याने या मंदिराच्या प्राचीन इतिहासाबाबत आजही कुतूहल कायम आहे. मात्र, माहितीच्या अभावामुळे देवीवरील ग्रामस्थांची श्रद्धा कमी झालेली नाही. उलट, या पुरातन श्रद्धास्थानाशी गावकऱ्यांचे भावनिक नाते अधिक दृढ झाले आहे.

आज भवानी मातेचे मंदिर हे केवळ पूजाअर्चेचे ठिकाण राहिलेले नाही, तर गावाच्या धार्मिक इतिहासाची आठवण करून देणारे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. मंदिराशी निगडित जुन्या आठवणी, देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची परंपरा आणि नवरात्रोत्सवातील सामूहिक सहभाग यांमधून विरूळच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडते.

विरूळ गावाच्या मध्यभागी असलेले अंबादेवीचे मंदिरही ग्रामस्थांच्या श्रद्धेचे महत्त्वाचे केंद्र आहे. सुमारे दोनशे वर्षांपूर्वीचे असल्याचे सांगितले जाणारे हे मंदिर गावाच्या धार्मिक इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.नवरात्रोत्सवाच्या काळात अंबादेवीच्या मंदिरात विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. देवीच्या दर्शनासाठी येणारे भाविक पूजा-अर्चा करून मनोभावे प्रार्थना करतात. मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रमांमुळे भक्तिमय वातावरण निर्माण होते. भागवत सप्ताह, कीर्तन आणि महाप्रसाद यांसारख्या उपक्रमांतून अध्यात्माचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो.

**कुरझडीच्या टेकडीवरील कुरझाई माता**

विरूळपासून काही अंतरावर असलेल्या कुरझडीच्या टेकडीवर कुरझाई मातेचे मंदिर उभारण्यात आले आहे. लोकवर्गणीतून निर्माण झालेल्या या मंदिराला परिसरातील भाविकांच्या श्रद्धेत महत्त्वाचे स्थान आहे. निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या या मंदिरात दर्शनासाठी जाणे हा अनेक भक्तांसाठी श्रद्धेचा अनुभव असतो. कुरझाई मातेच्या दर्शनासाठी येणारे भाविक मनोभावे पूजा-अर्चा करून मातेचे आशीर्वाद घेतात. नवरात्रोत्सवाच्या काळात या मंदिरातही भक्तांची वर्दळ वाढते. टेकडीवरील मंदिरामुळे विरूळच्या धार्मिक परंपरेला एक वेगळी ओळख प्राप्त झाली आहे.

या उत्सवात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण आपापल्या परीने सहभागी होतात. मंदिरांमध्ये दर्शनासाठी जाणे, धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहणे आणि महाप्रसादाचा लाभ घेणे, या माध्यमातून गावकरी उत्सवाचा आनंद अनुभवतात. बाहेरगावी राहणारे ग्रामस्थही या काळात गावातील धार्मिक परंपरेशी जोडले जातात.नवरात्रोत्सवामुळे गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनालाही चालना मिळते. मंदिरांच्या माध्यमातून एकत्र येणारे ग्रामस्थ परस्परांशी संवाद साधतात. श्रद्धेच्या या पर्वात गावातील एकजूट आणि सामूहिक सहभाग प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळे विरूळचा नवरात्रोत्सव धार्मिकतेसोबतच सामाजिक एकात्मतेचेही दर्शन घडवतो.

**कालाकीर्तन आणि महाप्रसादाने होणार उत्सवाचा समारोप**

नवरात्रोत्सवाच्या शेवटच्या दिवशी कालाकीर्तन आणि भव्य महाप्रसादाचे आयोजन करून उत्सवाची सांगता करण्यात येते. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भक्तांना अध्यात्मिक विचार ऐकण्याची संधी मिळते. महाप्रसादाच्या निमित्ताने भाविक आणि ग्रामस्थ एकत्र येतात. देवीच्या चरणी नतमस्तक होऊन नऊ दिवसांच्या उत्सवाची सांगता केली जाते.

महाप्रसाद हा केवळ भोजनाचा कार्यक्रम नसून सामूहिक श्रद्धा आणि आपुलकीचा अनुभव असतो. एकाच ठिकाणी एकत्र येऊन प्रसाद ग्रहण करताना सामाजिक भेद बाजूला ठेवून सर्वजण भक्तिभावाने सहभागी होतात. अशा उपक्रमांमुळे धार्मिक परंपरेसोबतच बंधुभाव आणि सामाजिक एकतेची भावना दृढ होते.

**श्रद्धेचा वारसा पुढील पिढीकडे**

विरूळमधील नवरात्रोत्सवाची सुमारे दोनशे वर्षांची परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने जपली जात आहे. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र देवीवरील श्रद्धा आणि नवरात्रोत्सवाविषयीचे आकर्षण कायम आहे. भवानी माता, अंबादेवी आणि कुरझाई मातेच्या मंदिरांमधून गावाच्या इतिहासाचा, धार्मिक परंपरेचा आणि सामूहिक योगदानाचा वारसा पुढे जात आहे.

गावातील या पुरातन मंदिरांमुळे विरूळच्या धार्मिक जीवनाला वेगळी ओळख मिळाली आहे. देवीच्या दर्शनासाठी दूरवरून येणारे भाविक, मनोकामना पूर्ण झाल्यानंतर नवस फेडण्यासाठी येणारे भक्त आणि उत्सव यशस्वी करण्यासाठी योगदान देणारे ग्रामस्थ यांच्यामुळे या परंपरेला सातत्य लाभले आहे.

देवीच्या चरणी श्रद्धेचा माथा, मनात सुखसमृद्धीची आस आणि ओठांवर मातेचा जयघोष अशा भक्तिमय वातावरणात विरूळचा नवरात्रोत्सव साजरा होत आहे. दोनशे वर्षांच्या परंपरेतून जपली गेलेली ही देवीभक्ती म्हणजे विरूळच्या सांस्कृतिक वैभवाचा आणि ग्रामस्थांच्या अढळ श्रद्धेचा अनमोल ठेवा आहे.

# मानसिक आरोग्य दिन व सप्ताहाचे उद्घाटन

**वर्धा/जनमाध्यम**

जगभरात १० ऑक्टोंबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. अनुभवलेले प्रसंग ऐकले; खरे आवाज, खरे बदल या वर्षीच्या घोषवाक्यावर आधारीत दि. १० ते १६ ऑक्टोंबर या कालावधीत मानसिक आरोग्य सप्ताहाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय येथे आयोजित जागतिक मानसिक आरोग्य दिन व सप्ताहाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजसिंह पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय गाठे, न्यायविज्ञान तज्ञ डॉ. राजेश कुडे, मनोविकार तज्ञ डॉ. सुदर्शन हरले आदी उपस्थित होते.यावेळी डॉ. राजसिंह पवार यांनी रुग्ण व रुग्णाचे अधिकार, मनोरुग्णांना देण्यात येणारे दिव्यांग प्रमाणपत्र, मानसिक आरोग्य सांभाळण्याकरीता शासनाकडून चालविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. संजय गाठे यांनी मानसिक आजार तसेच विविध आपत्तीमुळे उद्भवणारी नैराश्याची स्थिती आणि आत्महत्येचे प्रयत्न यावर प्रकाश टाकला.

कार्यक्राचे प्रास्ताविक डॉ. सुदर्शन हरले यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन समाजसेवा अधीक्षक केवल शेंडे यांनी तर आभार किरण दिघडे यांनी मानले. यावेळी मानसिक आरोग्य माहिती पत्रकाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मानसिक आरोग्य विभागाच्या वैशाली झाडे, सच्छिद्र सोनोने, मोनाली मोहोर्ले, किरण वानखेडे, रीता थुल, मीनल वाहणे, दिपाली इंगळे, श्वेता गावंडे, राहुल कठाणे आदींनी परिश्रम घेतले, असे सामान्य रुग्णालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# व्यक्तीचा मृत्यू

**आवी-**दारू पिऊन घरी आलेल्या व्यक्तीला झोपेतून उठवण्याचा प्रयत्न केला असता ते प्रतिसाद देत नसल्याने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी मृत घोषित केले. प्रशांत अंबादास खरपे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ११ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे १० वाजता ते दारू पिऊन घरी आले. जेवण केल्यानंतर ते आपल्या पलंगावर झोपले. काही वेळाने कुटुंबीयांनी त्यांना आवाज देऊन उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र ते उठले नाहीत.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३१७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२६६२/२०२५
जवाहरलाल व इतर विरुध्द चंद्रभान
पुढील ता.२८.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**
1. **Jawaharlal Jagatram Savalani,** Age 50 yrs. Occ.- Business R/o. Bapu Colony, Kanwar Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-**
1. **Chandrabhan Jagatram Savalani,** Age 54 yrs. Occ.- Business
2. **Ramchandra Jagatram Savalani,** Age 49 yrs. Occ.- Business
3. **Padama Jagatram Savalani,** Age 68 yrs. Occ.- Household All R/o.Near Dewari Saheb Mandir Baba Hardasram Society Near Kanwar Nagar, Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत जगतराम गोकुलराम सावलानी** हे दिनांक **१५.०६.२०२३** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **जवाहरलाल व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **जवाहरलाल व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२५.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# जाहीर सूचना

मी **अब्दुल नदीम अब्दुल सलीम, रा.पाकिजा कॉलनी, गल्ली नं.१, अमरावती, ता.जि.अमरावती,** मो.नं.८९९९२७२३८३, सर्व लोकांना सुचित करण्यात येते की,

माझे वडिल मय्यत **अब्दुल सलीम अब्दुल करीम** यांनी त्यांच्या जीवंतपणी त्यांच्या नावाने नोंदणीकृत **खरेदीखत दस्त क्र.२१२०/१९९४, दिनांक २१/११/१९९४** रोजी मिळकत खरेदी केली होती, सदर दस्तऐवजाची मला अत्यंत आवश्यकता असल्याने मी घरात तसेच माझ्या वडिलांनी ठेवलेल्या ठिकाणी मुळ खरेदीखत दस्ताचा शोध घेतला असता तो मला सापडले नाही, सदर मुळ दस्त कुठेतरी गहाळ (हरपला) झाला आहे.

तरी कोणत्याही व्यक्तीस नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.२१२०/१९९४ दिनांक २१/११/१९९४ रोजीची मुळ प्रत मिळाल्यास माझ्या सोबत वरील नमुद पत्त्यावर व मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. सदर दस्त माझ्याकरिता अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**सही/-**
**अब्दुल नदीम अब्दुल सलीम**
रा.पाकीजा कॉलनी, गल्ली नं.१, अमरावती
**मो.नं.- ८९९९२७२३८३**

## जाहिर नोटीस
## विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी

मि.कि.के.नं. ३१७/२०२६ ने.ता.१७/११/२०२६

**अर्जदार- गौरीशंकर पुंडलिकराव बारापात्रे,** वय-६९ वर्ष, धंदा-सेवानिवृत्त रा. खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती. ह. मु. सोनल कॉलणी अमरावती, ता.जि. अमरावती.

**गैरअर्जदार- निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते की, **अर्जदार नामे गौरीशंकर पुंडलिकराव बारापात्रे याचा जन्म दिनांक २८/०३/१९५७** रोजी त्याचे राहते घरी खानापूर येथे झालेला आहे. अर्जदाराचे आईवडीलांनी किंवा त्याचे ईतर कोणत्याही नातेवाईकांनी त्याच्या जन्माची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय खानापूर** किंवा ईतर कोणत्याही शासकिय कार्यालयांत केलेली नाही. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरीता जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी सुधारीत अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) नुसार त्यांच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना देण्याबाबत सदरचे प्रकरण विद्यमान न्यायालयांत दाखल केले असुन या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यांस त्यांनी प्रसिध्दी तारखेपासुन एक महिण्याच्या आंत विद्यमान न्यायालयांत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप किंवा हरकत नाही असे गृहीत धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदार नामे **गौरीशंकर पुंडलिकराव बारापात्रे** याचा जन्म दिनांक **२८/०३/१९५७** रोजी झाल्याबाबतची जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना दिल्या जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक ०/२०२६

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी**

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
## वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज कमांकः २१६७/२०२६ **लता + तिन- वि-भारती + दोन** पुढील तारीख १७.११.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**Lata Laxman Thavkar** Aged about 50 Years, Occu: Labour R/o Khadakpura, Chandur Railway Tq. Chandur Railway, Distt. Amravati **2-Jyoti Ramdas Thavkar** Aged about 47 Years, Occu: Household R/o Sai Nagar, Chandur Railway Tq. Chadur Railway, Distt. Amravati

**अर्जदार१-Meena Sanjay Landge** Aged 45 Years, Occu: Household R/o Asara Magar, Anjangaon Bari, Tq. Distt. Amravati **Vinod Bhaurao Dhande** Aged 42 Years, Occu: Labour R/o Asara Nagar, Anjangaon Bari, Tq. Distt. Amravati

**विरुध्द-गैरअर्जदार**

**1-Smt. Bharti Nilesh Dhande** Age-35 yrs, Occ- Household
**2-Harsh Nilesh Dhande** Age-8 yrs, Occ- Education
**3-Lavanya Nilesh Dhande** Age-6 yrs, Occ- Education Non - Applicant no 2 and 3 being minor through legal guardian Mother i. e non applicant no. 1 All R/o Asara Nagar, Anjangaon Bari, Tq. Distt.Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Bhaurao Bapurao Dhande** हे दि. १७.०९.२००७ रोजी अमरावती येथे मयत झाले तसेच **Sushilabai Bhaurao Dhande** या दि. १२.०६.२०१२ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Lata Laxman Thavkar + 3-Vs- Smt. Bharti Nilesh Dhande + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **Lata Laxman Thavkar + 3-Vs- Smt. Bharti Nilesh Dhande + 2** वरीलप्रमाणे सदर्ह मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या एक महिन्याचे आत त्याने या जाकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०८.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेः

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४०
आर.एन.आय.रजि.नं. 49763/89 पोस्टल लायसन्स क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०९६३००,९४२२९५६२६२
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **141/19/2026**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थी भुमी बहुउददेशिय सेवा समिती नया अकोला, अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री गौतम पिरखान खोब्रागडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :-** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०१.०९.२०२६ रोजी दिली.

**सही/-**
शिक्का
**अधीक्षक, (न्याय शाखा )**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२०५४/२०२६
दिनेश + दोन वि.निरंक
पुढील ता.२९.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**
1. **Dinesh Gunwant Tayade,** Aged 59 yrs. Occ.- Pvt. Job
2. **Rakesh Gunwantrao Tayade,** Aged 56 yrs. Occ.- Pvt. Job 1 & 2 both R/o. Near Anadishkti Temple, Laghuvetan Colony, Congress Nagar Road, Amravati
3. **Umesh Gunwantrao Tayade,** Age 54 yrs. Occ.- Service R/o. Ganesh Colony, Shilangan Road, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ratnprabha @ Prabhabai Gunwant Tayade** या दिनांक **११.०८.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार **Dinesh Gunwantrao Tayade +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Dinesh Gunwantrao Tayade +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# जाहीर नोटीस

## विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.५७०/२०२४ ने.ता.१७.११.२०२६

**अर्जदार :**
१. **विष्णू हिम्मतराव राऊत,** वय ३९ वर्षे, व्यवसाय - मजूरी
२. **माला दिलीप राऊत,** वय ३७ वर्षे, व्यवसाय-घरकाम
३. **सौ.पुष्पा हिम्मतराव राऊत,** वय ६५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार क्र.१,२ व ३ रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक बकारामजी सितारामजी राऊत** यांचा **मृत्यू दि.३०/०९/१९८७** रोजी मुबारकगाव,पो.बेलोरा,ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक तुळसाबाई बकारामजी राऊत** हिचा **मृत्यू दि.२२/०८/२००७** रोजी व **मृतक हिम्मतराव बकारामजी राऊत** यांचा **मृत्यू दि.०२/०१/२०२६** रा.बेलोरा,ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे झालेला आहे. **मृतक दिलीप हिम्मतराव राऊत** यांचा **मृत्यू दि.२७/०२/२०२२** रोजी नागपूर, ता.जि.नागपूर येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५७०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना तसेच गैरअर्जदाराला वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२१.०९.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
## वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक :- २१०४/२०२६ पुढील तारीख : २०.११.२०२६

**Amol Rameshpanth Dharmthok +3 Versus NIL**

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants- 1) Amol Rameshpant Dharmthok,** Aged about 48 yrs, Occ-Service, R/o Agrawal Plot, Hanuman Nagar, Choti Umri Akola **2) Sau. Swati Prashant Asare,** Aged about 43 yrs, Occ- Household R/o Near Hanuman Tempal, Akoli Amravati **3) Sau. Shubhangi Gajanan Bute,** Aged about 41 yrs, Occ- Household, R/o Chantrasal nagar, VMV College, Mage, Amravati **4) Anand Rameshpant Dharmathok,** Aged about 38 yrs, Occ-Service R/o Navi Vasti, Amdapr, Badnera, Tq Dist. Amravati.

**Non- Applicant NIL ==Versus==**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Manorama Ramesh Dharmthok** हे दि. २०.०३.२०२६ रोजी अमरावती येथे ममत झाले **Amol Rameshpanth Dharmthok +3 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **Amol Rameshpanth Dharmthok +3 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्ह मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुबतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

## मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : २७६/२०२६ नेमलेली तारीख :- १६-११-२०२६

**१. रूपाली सचिन निमनेकर**
**२. अद्वीता सचिन निमनेकर**
**३. शिला वसंत निमनेकर**
सर्व रा. सालोड (क), ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत सचिन वसंतराव निमनेकर यांचा मृत्यु दि. ०८.०६.२०२६ मध्ये सालोड, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे अर्जदार **क्र. १ ही पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मुलगी व अर्जदार क्र. ३** ही आई आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : ०९ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

MAHAVITARAN

**E-Tender Notice**

The e-tender dully filled in and digitally signed are invited from eligible/Registered and authorized reputed firm/contractor for the following works as per specification given below for MSEDCL, Urban Dn. Amravati. Tender No.T-11 for Annual Contract for Monthly Meter Reading with Bill Printing & Bill Distribution of all Solar net meter & Non–Solar consumers in PC-0 (i.e. RCI, PS, PWW & Other.... etc.) having load Above & Below 20 KW through CMRI of under Amravati Urban Division. Tender amount is Rs. 35.50 Lakh. The tender fee details/documents are available at our website https://etender.mahadiscom.in/eatApp/ w.e.f **14.10.2026 to 21.10.2026.**

PRO 207 /2026
**EXECUTIVE ENGINEER, URBAN DIVISION, AMRAVATI.**

# सिताफळ झाडांच्या लिलावासाठी निविदा मागविल्या

**अमरावती :** मोर्शी येथील खुले कारागृह प्रक्षेत्रावरील ५०० सिताफळ झाडांवरील फळांच्या लिलावासाठी १४ ते २० ऑक्टोबर २०२६ दरम्यान मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्याचे कारागृह अधिक्षकांनी कळविले आहे. निविदा अर्ज व लिलावाच्या अटी –शर्ती संबंधी तसेच झाडांची पाहणी करण्यासाठी कारागृह परिक्षेत्रात कार्यालयीन दिवस व वेळेत संपर्क साधण्याचे तसेच या निविदा २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता कारागृह अधिक्षक यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील असे सांगण्यात आले आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**

# -जाहीर नोटीस-

## सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी,चांदूर बाजार

कि.फौ.अर्ज क्र.३३४/२०२६, ने.ता.२६/११/२०२६

**- अर्जदार-**
**वसीमुन्नीसा अब्दुल शरिफ,**
**वसीमुन्नीसा समद खॉ पठाण (लग्नापुर्वीचे नांव)**
वय ५७ वर्ष, व्यवसाय- मजुरी
रा.चिंचोळी, ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-गैरअर्जदार-**
**जन्म-मृत्यू , विवाह नोंदणी अधिकारी**
ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणवाडा थडी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

ज्या अर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदारा विरुध्द जन्म- मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आंत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने नेमलेल्या वकीलासह सह दिवाणी व फौजदारी न्यायालय क्र.२ चांदूर बाजार येथे हजर राहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.१२/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यांनी दिले.

दिनांक - १२/१०/२०२६

शिक्का
**आदेशानुसार**
**सही/-**
**क.लिपिक**
**सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) चांदूर बाजार**

# जाहीर नोटीस
## जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, अमरावती

क्रमांक/न.भु.-१/अपील अर्ज क्र. ३०८१/२०२६ अमरावती, दिनांक ३०/०९/२०२६

प्रति,
**मोहम्मद तय्यब शेख छन्नु (मव्यत) तर्फे**
**मोहम्मद नासीर वल्द मोहम्मद तय्यब,**
रा. हिरापुरा गेट, अचलपुर शहर, ता. अचलपुर, जि. अमरावती
**विरुध्द-१. अब्दुल गफ्फार अब्दुल रहेमान,**
**२. अब्दुल मजीद अब्दुल रहेमान,**
**३. मोहम्मद रफीक अब्दुल रहेमान,**
अ.क्र. २ ते ३ रा. हबीब नगर, गल्ली नं. २, अमरावती, ता. जि. अमरावती
**४. फरजाना बानो अल्ताफ हुसैन,**
रा. करिम मेडीकल, असुर्या पेट्रोल पंप जवळ, वलगांव रोड, अमरावती, ता.जि. अमरावती
**५. उप अधीक्षक भुमी अभिलेख,** अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती
— **उत्तरार्थी**

**विषय : मौजा अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती येथील शिट नं. २४ बी, प्लॉट नं. १५३ चे बाबत अपिल अर्ज**

**संदर्भ : अपिलार्थी यांचा अपिल अर्ज दिनांक १३/०३/२०२६**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७अंतर्गत मौजा अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती येथील शिट नं. २४ बी, प्लॉट नं. १५३ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुद्ध अपिल सादर केले आहे. परंतु उत्तरार्थी हे सुनावणी वैळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविणेत येते की, दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहील्यास एकतर्फी निकाल देण्यात योईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिले आहे.

शिक्का
**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती**

## मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ **(RMJC)** अर्ज क्र. : २७४/२०२६ नेमलेली तारीख :- १६-११-२०२६

**१. तुकाराम जयराम पानझडे**
**२. गजानन तुकाराम पानझडे** दोन्ही रा. हनुमान मंदीर, अकोली जहा. जामठी ता. मुर्तिजापूर जि. अकोला
**३. बाबाराव तुकाराम पानझडे** रा. शिवणी रसु. ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.
**४. रंजना श्रीकृष्ण इंगळे** रा. बोपी, पापळ, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.
**५. कल्पना प्रकाशराव उचितकर** रा. राजुरा, ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती.
**६. निखील ज्ञानेश्वर चांदणे** रा. वार्ड नं. ६, नांदगाव खंडेश्वर ता. नांदगाव खंडे, जि. अमरावती.

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत कुसुम तुकाराम पानझडे** यांचा **मृत्यु दि. २२.०२.२०२०** मध्ये **शिवणी रसु. ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. **मयताचे अर्जदार क्र. १ हे पती असून अर्जदार क्र. २ व ३ ही मुले, अर्जदार क्र. ४ व ५ ह्या मुली व अर्जदार क्र ६ हा नातु** आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : ०९ ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

# तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय

रा.मा.क्र./३३०/MRC-८१/अंबाठा /२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार **आरीफ खाँ इनायत पठाण रा. अंबाडा ता. मोर्शी जि. अमरावती यांचा स्वतः जन्म दि. १६/६/१९७७** रोजी येथे झाल्याने जन्माची नोंद ग्रामपंचायत अंबाडा येथे करण्याकरीता **निबंधक, ग्रा. पं. अंबाडा** यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहिरनामा वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसाचे** आत आक्षेप वा हरकती दाखल करावा. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. व प्रकरणात पुढील कार्यावाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांकः- ०५/१०/२०२६

शिक्का
**तहसीलदार, मोर्शी**

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **646/2026 कलम २२** **पु.ता.१३.११.२०२६**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री गुरुदेव मंडळ, खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती**
**इ १९३३ /अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री अशोक कृष्णराव ठाकरे, रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- गाव नमुना सात प्रमाणे**- गाव खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती, भुमापन क्र.व उपविभाग -१८, भोगवटदार वर्ग एकची जमीन श्री.गुरुदेव मंडळ यांच्या मालकीची व ताब्यात असुन, त्याचे क्षेत्रफळ - ४.९१.००, आकार रुपये १०.००, खाते क्र.-८६, इतकी शेतजमीन व गाव नमुना सात व गाव नमुना आठ अ प्रमाणे **याची चर्तुःसिमा पुढीलप्रमाणे -** पुर्वेस - दादाराव तेलंगे यांचे शेत, पश्चिमेस - डांबर रोड
दक्षिणेस- खानापुर तळणी रोड, उत्तरेस- श्री निलेश दादाराव गायकवाड यांचे शेत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय उपआयुक्त अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९.१०.२०२६ रोजी दिली.

**सही/-**
शिक्का
**अधीक्षक, (न्याय शाखा )**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

# तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय

रा.मा.क्र./३१४/MRC-८१/अंबाठा /२०२५-२०२६

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार **शितल खंडु कु-हाड रा. चि गवळी ता. मोर्शी जि. अमरावती यांचा स्वतः जन्म दि. ६/७/२००१** रोजी येथे झाल्याने जन्माची नोंद ग्रामपंचायत चिंचोली गवळी येथे करण्याकरीता **निबंधक, ग्रा. पं.** चिंचोली गवळी यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहिरनामा वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसाचे** आत आक्षेप वा हरकती दाखल करावा. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. व प्रकरणात पुढील कार्यावाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांकः- ०५/१०/२०२६

शिक्का
**तहसीलदार, मोर्शी**

## जाहिर नोटिस
## विद्यमान प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब मोर्शी

**मि. अर्ज क्र.३४९/२०२६** **ने.ता.२४/११/२०२६**

**अर्जदार -दादाराव राजारामजी केंडे** वय ५८ वर्ष धंदा नोकरी रा. मोशी ता. मोर्शी जि. अमरावती

**विरुध्द-निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रा. पं. अंबाडा ता. मोर्शी जि. अमरावती**

सर्व लोकास नोटिसद्वारे कळविण्यात येते **अर्जदाराचा की अर्जदाराचा मुलगा नामे चैतन्य दादाराव केंडे** याचा जन्म दिनांक ०२.०५.२००० रोजी अंबाडा ता. मोर्शी जि. अमरावती येथे झाला आहे. अर्जदाराला त्याचे मुलाचे जन्माचे प्रमाणपत्राची विविध शासकिय व निमशासकिय कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. अर्जदाराने जन्माचे प्रमाणपत्र मिळण्यास विद्यमान प्रथम श्रेणी न्यायालय मोर्शी येथे अर्ज केला असुन अर्जावर कोनालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी प्रसिध्दी तारखेपासुन एक महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयात आपले म्हणणे सादर करावे अन्यथा तुमचे गैरहजेरीत अर्जावर सुनावनी होवून निर्णय दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**प्रथम श्रेणी न्यायालय मोर्शी**

## जाहिर नोटीस
## विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, मोर्शी

मि.कि.के.नं. ३३३/२०२६ ने.ता.०२./११/२०२६

**अर्जदार-श्रीकृष्ण महादेव मेश्राम,** वय ५७ वर्ष, धंदा-मजुरी रा. मंगरूळ भिलापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय मंगरूळ भिलापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते की, **अर्जदार नामे श्रीकृष्ण महादेव मेश्राम याचा जन्म दिनांक २२/०४/१९६०** रोजी त्यांचे राहते घरी मंगरूळ भिलापूर येथे झालेला आहे. अर्जदाराचे आईवडीलांनी किंवा त्याचे ईतर कोणत्याही नातेवाईकांनी त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय मंगरूळ (भि) किंवा ईतर कोणत्याही शासकिय कार्यालयांत केलेली नाही. अर्जदाराला वैयक्तीक कामाकरीता जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी सुधारीत अधिनियम २०२६ चे कलम ३ (अ) नुसार त्यांच्या जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना देण्याबाबत सदरचे प्रकरण विद्यमान न्यायालयांत दाखल केले असुन या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यांस त्यांनी प्रसिध्दी तारखेपासुन एक महिण्याच्या आंत विद्यमान न्यायालयांत आपले म्हणणे सादर करावे अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप किंवा हरकत नाही असे गृहीत धरून अर्जावर सुनावणी करून अर्जदार नामे श्रीकृष्ण महादेव मेश्राम याचा जन्म दिनांक २२/०४/१९६० रोजी झाल्याबाबतची जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदार यांना दिल्या जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांकः १२/१०/२०२६

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोर्शी**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ‘ऑक्टोबर हीट’ने राज्य होरपळले



**पुणे**-तीव्र 'एल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सूनच्या पावसात मोठी तूट राहिल्याने राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यातच ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा चटका वाढल्याने कमाल तापमानात वाढ होत असून, 'ऑक्टोबर हीट'चा प्रभाव अधिक जाणवू लागला आहे. दिवसा तीव्र उन्हासह उकाडाही वाढत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. पावसातील अनियमितता आणि दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तापमानातील ही वाढ शेतीसाठी चिंतेची ठरत आहे.

यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात उन्हाचा चटका अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागाने यापूर्वीच वर्तविली आहे. त्यातच गेल्या काही दिवसांपासून कोकणात कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत १ ते ७ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्रात १ ते ५ अंश सेल्सिअस, मराठवाड्यात २ ते ५ अंश सेल्सिअस, तर विदर्भात २ ते ६ अंश सेल्सिअसने वाढ दिसून आली आहे. त्यातच किमान तापमानातदेखील वाढ झाल्याने रात्रीच्या वेळीही उकाडा कायम राहत आहे. कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात कमाल तापमान सरासरीपेक्षा अधिक आहे.

| मध्य महाराष्ट्र | |
|---|---|
| धुळे | ३६ |
| जळगाव | ३७.१ |
| जेऊर | ३६ |
| निफाड | ३६.१ |
| सोलापूर | ३७.६. |

| कोकण | |
|---|---|
| सांताक्रूझ | ३८ |
| डहाणू | ३६.३ |
| रत्नागिरी | ३८.३ |

| मराठवाडा | |
|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ३६.५ |
| धाराशिव | ३६.१ |

| विदर्भ | |
|---|---|
| अकोला | ३८.१ |
| अमरावती | ३८.२ |
| बुलडाणा | ३६.२ |
| चंद्रपूर | ३६ |
| वर्धा | ३६.२ |
| यवतमाळ | ३७.७ |

रत्नागिरी येथे राज्यातील उच्चांकी ३८.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्याचे हवामान विभागाच्या मुंबई केंद्रातर्फे सांगण्यात आले.

**उन्हाचा चटका अधिक असलेली ठिकाणे (तापमान अंश सेल्सिअसमध्ये) :**

**रत्नागिरी ३८.३, अमरावती ३८.२, अकोला ३८.१, सांताक्रूझ ३८, यवतमाळ ३७.७, सोलापूर ३७.६,जळगाव ३७.१. रविवारी (ता. ११) राज्यात नोंदले गेलेले कमाल तापमान (अंश सेल्सिअसमध्ये)**

# जिल्ह्यात पीक नुकसानीचे पंचनामे ९५ टक्के पूर्ण

**अमरावती :** जिल्ह्यात दुष्काळाचा पहिला ट्रिगर लागू झाल्यानंतर पीक नुकसानीच्या पंचनाम्यांना प्रशासनाने वेग दिला असून, आता ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त १४ तालुक्यांतील सुमारे २,०२६ गावांमध्ये पंचनाम्यांचे काम सुरू असून, एकूण ७ लाख ३ हजार हेक्टर क्षेत्रापैकी ९५ टक्क्यांहून अधिक क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाल्याची माहिती आहे. यामुळे उर्वरित पंचनामे लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.

जिल्ह्यातील सुमारे ५ लाख १० हजार खातेदार या प्रक्रियेत सहभागी आहेत. आतापर्यंत ४ लाख ५९ हजार १४१ खातेदारांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण झाली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील १४ पैकी ९ तालुक्यांमध्ये पंचनाम्यांचे काम शंभर टक्के पूर्ण झाले आहे. उर्वरित तालुक्यांमध्येही काम वेगाने सुरू असून, ते लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.



दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंचनाम्यांची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. राज्यातील २६५ तालुक्यांतील ३२ हजार ९३६ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यापैकी ३० हजार ६०८ गावांतील पंचनामे पूर्ण झाले आहेत. राज्यभरात १ कोटी १८ लाख ७९ हजार २२१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे पंचनामे पूर्ण झाले असून, १ कोटी ६ लाख ६७ हजार ४३४ शेतकऱ्यांची पडताळणी पूर्ण झाली आहे.

दुष्काळाची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेता पाणीटंचाईवर उपाययोजना करण्यावरही शासनाचा भर आहे. जलस्त्रोतांचे बळकटीकरण, भूजल पुनर्भरण, विहिरींमधील भूजलपातळीची डिजिटल नोंद आणि भूजल क्षमतेचे नकाशांकन यासाठी निधीची आवश्यकता असल्याची माहिती संबंधित विभागाने सादर केली आहे. जलस्त्रोतांच्या थेट पुनर्भरणासाठी ५४० कोटी रुपये, डिजिटल उपकरणांसाठी ५० कोटी रुपये, भूजल क्षमतेच्या नकाशांकनासाठी ५० कोटी रुपये, तर दुष्काळविषयक उपाययोजनांसाठी ८०० कोटी रुपयांची आवश्यकता नमूद करण्यात आली आहे.

दरम्यान, केंद्र सरकारला १८ हजार कोटी रुपयांचा मदत प्रस्ताव पाठविल्याची चर्चा असली, तरी असा कोणताही प्रस्ताव पाठविण्यात आलेला नसल्याचा खुलासा राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाकडून करण्यात आल्याचे वृत्तात नमूद आहे.एकूणच, अमरावती जिल्ह्यात पीक नुकसानीच्या पंचनाम्यांचे काम अंतिम टप्प्यात आले असून, पंचनामे पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना मदत मिळण्याच्या प्रक्रियेकडे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यात गुरांच्या चाऱ्याची टंचाई रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा सुधारीत आदेश

## चारा शिल्लक राहिल्यासच उद्योगांना वापरासाठी परवानगी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील सोयाबीन आणि तूर पिकांचे कुटार (वैरण) केवळ जनावरांच्या चाऱ्यासाठी आरक्षित ठेवण्याबाबत आणि त्याची बेकायदेशीर साठवणूक रोखण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी आशिष येरेकर यांनी आज सुधारित मार्गदर्शक नियमावलीची घोषणा केल हा आदेश ९ ऑक्टोबर २०२६ रोजी देण्यात आलेल्या मूळ आदेशातील इतर अटी कायम ठेवून तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यातील जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असून कुटाराच्या काळ्या बाजाराला चाप बसणार आहे. शेतकरी आणि गट्टू (बायोमास ब्रिकेट्स/पेलेट्स लँड्स) उत्पादक समूहांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांची दखल घेत, प्रशासनाने यापूर्वीच्या आदेशातील मुद्दा क्र. ०२ रद्द करून नवीन नियमावली तात्काळ प्रभावाने लागू केली आहे. यानुसार ज्या शेतकऱ्यांकडे स्वतःचे पशुधन नाही त्यांनी आपले कुटार विकताना सर्वप्रथम आजूबाजूच्या पशुधन असलेल्या शेतकऱ्यांना देण्याबाबत विचार करावा. त्यानंतरच उर्वरित कुटार बायोमास ब्रिकेट/पेलेट्स निर्मिती किंवा इतर उद्योगांना द्यावे. पशुधन असलेल्या शेतकऱ्यांनी सर्वप्रथम आपल्या पशुधनाच्या चाऱ्यासाठी कुटाराची व्यवस्था करावी. त्यानंतर शिल्लक राहिलेले अतिरिक्त कुटार विक्रीसाठी उपलब्ध करून द्यावे. भविष्यात शासनाच्या चारावाटप धोरणानुसार अशा शेतकऱ्यांवर निर्बंध लागू राहू शकतात. याबाबतचे आवश्यक प्रमाणपत्र विहित नमुन्यात तालुकास्तरीय पशुसंवर्धन अधिकारी तथा दुग्ध व्यवसाय अधिकारी यांच्याकडे सादर करावे लागेल.बायोमास ब्रिकेट/पेलेट्स निर्मिती करणाऱ्या उद्योगांना त्यांच्या रोजच्या आवकच्या किमान ५० टक्के कुटार साठा शासनाच्या आवश्यकतेनुसार इतर शेतकऱ्यांच्या उपलब्धतेसाठी राखीव ठेवावा लागेल. या राखीव साठ्याची माहिती जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे वेळोवेळी सादर करणे अनिवार्य आहे.

## संत गाडगे महाराज वृद्धाश्रमात विद्यार्थ्यांची भेट



**अमरावती**-पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थी संघटनेच्या (ETSA) विद्यार्थ्यांनी वलगाव येथील संत गाडगे महाराज वृद्धाश्रमाला भेट देऊन सामाजिक बांधिलकी जपली. या सामाजिक उपक्रमाचे आयोजन प्रा. एस. डी. टिंगणे व प्रा. आर. एस. राऊत यांनी केले होते. यांच्या पुढाकाराने आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन विभागप्रमुख डॉ.यू.डब्ल्यू.होरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे, हा संदेश या भेटीतून देण्यात आला. समाजातील ज्येष्ठ नागरिकांची सेवा करणे, हेच या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते.



## चमू टेनिकॉइट विभागीय स्तरावर

**तिवसा**-स्थानिक कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय तिवसाच्या १७ वर्ष आतील मुलींची टेनिकॉइट चमू विजयी झाली आहे. नुकत्याच जिल्हा स्टेडियम अमरावती येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये माध्यमिक विद्यालयाच्या मुलींच्या चमुने आपल्या कौशल्याचे शानदार प्रदर्शन करत टेनिकॉइट स्पर्धेमध्ये विजेते पद प्राप्त केले आहे. या विजयी चमूमध्ये धनश्री विजय कातोरे, शामली प्रदीप धवने, अक्षरा गजानन मते, उन्नती श्रीकृष्ण सारवे व भाविशा विलास बोरवार या विद्यार्थिनींचा सहभाग होता. तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १९ वर्षे आतील मुलींची चमू देखील या स्पर्धेमध्ये उपविजयी झाली आहे. विजयी चमुच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गंगाधरराव दंडाळे, सचिव विद्याधरराव दंडाळे, सदस्या छाया दंडाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका जे.ई. सोनारे, सदस्य विलास इंगोले, प्रा. सुनील बुरघाटे, पर्यवेक्षक प्रवीण हरणे प्रा. मिनल पडोळे यांनी कौतुक केले आहे.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मुंबईत सादर केले गदलीनृत्य

**परतवाडा** - येथील भारतीय विद्या मंदिर, अमरावतीद्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयातील आदिवासी विद्यार्थ्यांनी मुंबई येथील शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य) यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात पारंपरिक गदली नृत्य सादर करून आदिवासी संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडविले. या नृत्य सादरीकरणात महाविद्यालयातील १७ विद्यार्थी आणि ४ वादक कलावंत अशा एकूण २१ जणांनी सहभाग घेतला.



या कार्यक्रमात शिवानी दहीकर, चांदणी झारेकर, रोशनी काकडे, जयश्री गवते, अंजू दारसिंबे, रोशनी आखंडे, सपना साकोम, दीपाली बेलसरे, आशा मावसकर, प्रीती भूसुम, अंकिता बेलसरे, मालती धांडे, जयश्री तोटे, परमेश्वर कासदेकर, लोकेश धुर्वे, देवराज जामुनकर आणि प्रभुदास भुसून या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसोबत इंग्रजी विभागाच्या प्रा. डॉ. शीतल काळे यादेखील मुंबई येथे उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाची पूर्वतयारी,महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. एकनाथ तट्टे, डॉ. स्वाती वानखडे, डॉ. रुपेश बाजपेयी, प्रा. जीवन सोळंके, डॉ. बबलू मासोदकर,ऋषिकेश महल्ले आणि प्रियंका देवतळे यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमाबद्दल सहभागी विद्यार्थी, वादक कलावंत आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे कौतुक होत आहे.

## दिवाळी सुट्टीतील सक्तीची शिक्षक प्रशिक्षणे रद्द करा!

### प्राथमिक शिक्षक समितीची शिक्षण आयुक्तांकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**

दिवाळीच्या दीर्घ सुट्टीत आयोजित करण्यात आलेली शिक्षकांची सक्तीची प्रशिक्षणे तातडीने रद्द करावीत, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. शिक्षकांच्या अधिकृत सुट्टयांमध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करून त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक नियोजनात अडथळे निर्माण करू नयेत, अशी भूमिका समितीने घेतली आहे. यासंदर्भात राज्याध्यक्ष विजय दत्तात्रय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षण मंत्री,शिक्षण आयुक्त, प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांना निवेदन सादर केले आहे. दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण असून, या कालावधीत शिक्षकांना कुटुंबीयांसमवेत वेळ घालविणे, नातेवाईकांच्या भेटीगाठी घेणे तसेच धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे पालन करण्याची संधी मिळते. वर्षभराच्या शैक्षणिक कामकाजानंतर मानसिक विश्रांतीसाठीही ही सुट्टी महत्त्वाची असते. परीक्षा वेळापत्रकात झालेल्या बदलांमुळे उपलब्ध होणाऱ्या कालावधीत प्रशिक्षण आयोजित करावे. प्रत्यक्ष उपस्थिती अनिवार्य नसल्यास ऑनलाइन प्रशिक्षणाचा पर्याय द्यावा.



तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत एक दिवसाचे मार्गदर्शन करून उर्वरित कामासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

सुट्टीतील प्रशिक्षणाबाबत स्पष्ट व पारदर्शक धोरण निश्चित करावे, अशा मागण्या समितीने मांडल्या आहेत.'प्रशिक्षणाला आमचा विरोध नाही; मात्र प्रशिक्षणाच्या नावाखाली शिक्षकांच्या अधिकृत सुट्ट्या, वैयक्तिक नियोजन आणि मानसिक स्वास्थ्य यांचा बळी देण्यास विरोध आहे,' अशी भूमिका समितीने मांडली आहे. प्रशासनाने शिक्षकांच्या अडचणींचा विचार करून प्रशिक्षणाबाबत तातडीने पुनर्विचार करावा व सुधारित आदेश निर्गमित करावेत. अन्यथा निर्माण होणाऱ्या असंतोषाची जबाबदारी प्रशासनावर राहील.

## माहितीचा अधिकार लोकशाहीचा कणा, अ‍ॅड.सौरभ गुळधे यांचे प्रतिपादन

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

शासनाच्या कारभारात पारदर्शकता आणून प्रशासनाला जबाबदार धरण्यासाठी माहितीचा अधिकार हा नागरिकांच्या हातातील प्रभावी मार्ग आहे. नागरिकांमध्ये या अधिकाराबाबत जागरूकता वाढली, तर लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम होईल, असे प्रतिपादन अ‍ॅड. सौरभ गुळधे यांनी केले.

छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ६ ते १२ ऑक्टोबर दरम्यान आयोजित माहितीचा अधिकार सप्ताहाची अतिथी व्याख्यानाने सांगता झाली. यावेळी ते मार्गदर्शक म्हणून



बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुवर्णा जवंजाळ होत्या.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरिकांना शासनाच्या कामकाजाची माहिती मिळवून देणारा महत्त्वाचा कायदा आहे. अ‍ॅड. सौरभ गुळधे यांनी माहितीचा अधिकार अर्ज कसा करावा, मागितलेली माहिती मिळाली नाही तर पुढे काय करावे, तसेच या कायद्यांतर्गत कोणती माहिती मिळू शकते, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सार्वजनिक निधीचा वापर आणि शासकीय निर्णयांची माहिती मिळविण्यासाठी हा कायदा उपयुक्त असून, नागरिकांना प्रशासनाला जाब विचारण्याची संधी यातून मिळते. त्यामुळे पारदर्शक, जबाबदार आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाच्या निर्मितीसाठी माहितीच्या अधिकाराबाबत जनजागृती होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.माहितीचा अधिकार सप्ताहानिमित्त यश गुप्त यांनी उपस्थितांना प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. आशिष काळे यांनी केले, तर डॉ. नितेश गुळसुंदरे यांनी आभार मानले.यावेळी डॉ. इचे, डॉ. भारत कल्याणकर, डॉ. प्रवीण सदार, काळे, लिल्हारे, चऱ्हाटे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुर्गादेवी मंदिरात नवरात्र महोत्सव उत्साहात

**कुऱ्हा**-येथील पिपला विहार कॉलनीमधील ओंकारराव मदने यांच्या पुढाकाराने गेल्या ४५ वर्षांपासून श्री दुर्गादेवी मंदिरात दरवर्षी नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.या धार्मिक कार्यक्रमांमध्ये परिसरातील भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असून, श्री दुर्गादेवीचे दर्शन घेऊन भक्तिभावाने पूजा-अर्चना करीत आहेत. त्यामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही धार्मिक परंपरा आजही श्रद्धा आणि उत्साहाने जपली जात आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने



भाविकांना देवीच्या दर्शनासह धार्मिक कार्यक्रमांचा लाभ मिळत आहे.

यावेळी ह.भ.प. वासुदेव महाराज ठोंबरे व वारकरी मंडळी यांच्या उपस्थितीत काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाने नवरात्र महोत्सवाची सांगता होणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## मोर्शी खुले कारागृहातील सिताफळ झाडांच्या लिलावासाठी निविदा सादर करण्याचे आवाहन

**अमरावती**-मोर्शी येथील खुले कारागृह प्रक्षेत्रावरील ५०० सिताफळ झाडांवरील फळांच्या लिलावासाठी १४ ते २० ऑक्टोबर २०२६ दरम्यान मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्याचे कारागृह अधिक्षकांनी कळविले आहे.निविदा अर्ज व लिलावाच्या अटी–शर्ती संबंधी तसेच झाडांची पाहणी करण्यासाठी कारागृह परिक्षेत्रात कार्यालयीन दिवस व वेळेत संपर्क साधण्याचे तसेच या निविदा २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता कारागृह अधिक्षक यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील असे सांगण्यात आले आहे.

## प्रगतिशील महाराष्ट्र-२०२६’ प्रदर्शनात महावितरणच्या स्टॉलचा गौरव

**अमरावती/का.प्र.**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या 'प्रगतिशील महाराष्ट्र-२०२६' प्रदर्शनात परिणामकारक मांडणी व ग्राहकांशी प्रभावी संवाद साधल्याबद्दल महावितरणच्या स्टॉलच्या बेस्ट स्टॉल म्हणून गौरव करण्यात आला.अमळनेर येथे आयोजित तीन दिवसीय प्रदर्शनीत केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध विभागांच्या वतीने एकूण ७५ स्टॉल उभारण्यात आले होते. यात स्टॉलची उत्कृष्ट मांडणी आणि ग्राहकांशी प्रभावी संवाद



केल्याबद्दल महावितरणच्या स्टॉलचा गौरव करण्यात आला.

खा. स्मिता वाघ, पारोळा - एरंडोलचे आ.अमोल दादा पाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट स्टॉलचा पुरस्कार मिळवणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. सांघिक कार्यालयातील उपमुख्य जनसंपर्क अधिकारी प्रवीण स्थूल,अमळनेरचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता ज्ञानेश्वर अंबाडकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला.महावितरणच्या दालनात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसह स्मार्ट मीटरच्या फायद्याची माहिती देण्यात आली. तीन दिवसांत जवळपास १२ हजारांहून अधिक नागरिकांनी महावितरणच्या स्टॉलला भेट दिली. जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी, अधीक्षक अभियंता मदन सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्टॉल उभारण्यात आला.

धरणगाव विभागाचे कार्यकारी अभियंता नीलेश सोनगिरे, जळगाव परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड, कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता मनोज भावसार, सहायक अभियंता हितेंद्र बढे, मनोज वाडिले, विनायक बोरसे, हेमंत सैदाणे, नितीन ठवकर, मोहन नेवाळे, भाऊसाहेब महाजन, तंत्रज्ञ दीपक अहिरे, सुषमा हजारे यांनी प्रदर्शनी दरम्यान ग्राहकांना सर्व योजनांची माहिती दिली. तसेच विद्युत सुरक्षा व वीजबचतीबाबत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. यावेळी प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात येऊन विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. दालनात ग्राहकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवून त्यावर तत्परतेने कार्यवाही करण्यात आली.

### सीईओ सत्यम गांधी यांची प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट

## आरोग्य सेवा व स्वच्छतेचा घेतला आढावा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

१२ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, अंजनगाव बारी येथे भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी आरोग्य केंद्राच्या इमारतीची पाहणी करत आरोग्य सेवांचा आढावा घेतला. तसेच आरोग्य केंद्रातील स्वच्छता व रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पराग राठोड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.



हर्षा गोहत्रे, विस्तार अधिकारी होले, आरोग्य सहाय्यक योगेश गवई व प्रकाश राठोड उपस्थित होते.प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जितेंद्रसिंह राजकुमार, डॉ. रसिका धर्मे, औषध निर्माण अधिकारी धिरज राठोड, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी प्रकाश भडांगे, आरोग्य सहाय्यक अशोक पोकळे, प्रभु राठोड, आरोग्य सहाय्यिका कुंदा राऊत, ज्योती फुसे, आरोग्य सेविका सुकेशनी करुणाधन, सुजाता रोडगे, ग्रामपंचायत अधिकारी विनोद इसळ, आशा गटप्रवर्तिका प्रणीता वहाणे, परिचर आरती गौतले, श्रेयस वानखडे, वाहनचालक वासुदेव तलवारे, डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रियंका कळंबे व आरती महल्ले यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

# बंडखोरी रोखण्यासाठी महायुतीची रणनीती

## पालकमंत्री बावनकुळे आणि राठोड यांच्याकडे महायुतीच्या मतांची जबाबदारी

**-१६ ऑक्टोबरच्या बैठकीत बंडखोरी रोखण्याबाबत चर्चा होणार, -मंत्री उदय सामंत आणि आ.बच्चू कडूंचा विजयाचा दावा**



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शिक्षक मतदार संघातून महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक हे दुसऱ्यांदा विजयी होतील असा विश्वास शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे. महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक यांच्या प्रचार आणि कार्यकर्ता संमेलनासाठी ते आज मंगळवार १३ ऑक्टोबर रोजी शहरात आले असता त्यांनी हॉटेल ग्रँड महफिल मध्ये तीन प्रमुख पक्ष - भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्यांसोबत आणि पदाधिकाऱ्यांसोबत त्यांनी चर्चा केली. यावेळी शिवसेनेचे मंत्री नितेश राणे, आमदार बच्चू कडू देखील उपस्थित होते.




उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ते महायुतीचे उमेदवार किरण सरनाईक यांची निवडणूक रणनीती तयार करण्यासाठी येथे आले आहेत. सरनाईक हे आमचे उमेदवार आहेत. त्यांनी सांगितले की, पदाधिकाऱ्यांसोबत त्यांची मंगळवारी बैठक झाली आहे. दोन दिवसांनी शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत भाजप आणि शिवसेनेची बैठक होणार आहे, ज्यात बंडखोरी रोखणे आणि सर्व उमेदवारांबद्दल चर्चा होणार आहे. या निवडणुकीत भाजपचे दोन नेते संगीता शिंदे आणि चंद्रशेखर भोयर बंडखोरी करून ☞(पान २ वर)

### पुस नदीच्या पुलावर काळाचा घाला!

# ट्रकच्या चाकाखाली दोघांचा मृत्यू

**पुसद-दिग्रस मार्गावरील भीषण अपघात**





**पुसद/प्रतिनिधीः-** पुसद-दिग्रस मार्गावरील पुस नदीच्या नवीन पुलावर मंगळवारी दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास ट्रक आणि स्कुटीचा भीषण अपघात झाला. ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने स्कुटीवरील दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. वर्दळीच्या पुलावर घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, रस्ता सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या अपघातात युसुफ शहा चांद शहा (वय अंदाजे ५५, रा. वसंतनगर, पुसद, जि. यवतमाळ) आणि यादव काळूराम टारफे (वय अंदाजे २८, रा. निगणूर, ता. उमरखेड) यांचा मृत्यू झाला. दोघेही स्कुटी क्रमांक एमएच २९ ☞(पान २ वर)

# जुन्या वादात तरुणावर हल्ला करणारा जेरबंद

**-कपिलवस्तू नगरातील घटना**





**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस ठाणे क्षेत्रातील कपिल वस्तू नगर परिसरात सोमवारी उशिरा रात्री जुन्या भांडणाच्या रागातून शेखर दिलीप सावळे (२७, कपिल वस्तू नगर) याच्यावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. स्थानिक आणि कुटुंबीयांच्या मदतीने त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. अतिरक्तस्राव झाल्याने त्याची स्थिती चिंताजनक असून त्याच्यावर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखा युनिट-२ ने तात्काळ तपासाची चक्रे फिरवली आणि संभाव्य ठिकाणांवर धडक दिली. पोलीस पथकाने सतर्कता दाखवत घटनेच्या काही तासांतच आरोपी अक्षय ☞(पान २ वर)

# वैनगंगा प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहणापूर्वी बाजारभाव अद्यावत करा

## बाधित शेतकऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तहसीलच्या मौजा मांजरखेड कसबा येथे नळगंगा आणि वैनगंगा नदीजोड परियोजनां साठी प्रस्तावित भूमी अधिग्रहणापूर्वी शेतकऱ्यांनी जमिनीचा बाजारभाव सध्याच्या दरानुसार सुधारित करण्याच्या मागणीसाठी आज मंगळवार १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शेतकऱ्यांना भूमी अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्व्यवस्थापनात उचित प्रतिकर आणि पारदर्शितेचा अधिकार अधिनियम, २०१३ च्या कलम २६ अनुसार भूमि अधिग्रहणा ☞(पान २ वर)

### सेवक संयुक्त कृती समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

# प्रयोगशाळा सहायकांच्या वेतनश्रेणीचा संभ्रम दूर



**अमरावती/प्रतिनिधीः-** मंत्रालयात सेवक संयुक्त कृती समितीचे पदाधिकारी अजय देशमुख, रावसाहेब त्रिभुवन, प्रकाश म्हसे, दिनेश दखने आणि माधव राऊळ हे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागात उपस्थित होते. सेवक संयुक्त कृती समितीचा महत्त्वाचा घटक असलेल्या महाविद्यालयीन प्रयोगशाळा सहायक यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ४०००–६००० ही वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रश्नाबाबत राज्यातील विविध विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या स्तरावर संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी येत होत्या.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत सेवक संयुक्त कृती समितीने सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला. विविध निवेदने, मागणीपत्रे, बैठका आणि आंदोलनांच्या माध्यमातून हा प्रश्न ठामपणे मांडण्यात आला. पुणे येथील उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीतही समितीने या प्रश्नासह इतर प्रलंबित ☞(पान २ वर)

# मनपाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन मिळणार

**आयुक्तांनी दिले आश्वासन**

अमरावती/प्रतिनिधीः-

दसरा आणि दीपावली सारखे मोठे सण तोंडावर असताना महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जुलै महिन्यापासून वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. आधीच कमी वेतनात खर्च चालवणाऱ्या या कर्मचाऱ्यांना थकीत वेतनामुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यासंदर्भात जनप्रतिनिधींच्या एका शिष्टमंडळाने आज मंगळवार १३ ऑक्टोबर रोजी मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले यांची भेट घेतली. चर्चेदरम्यान आयुक्तांनी १६ ऑक्टोबर पर्यंत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याचे आश्वासन दिले आहे.शिष्टमंडळाने आयुक्तांना सांगितले की, सणासुदीच्या काळात वेतन न मिळाल्याने कर्मचाऱ्यां समोर घरखर्च चालवणे, मुलांच्या गरजा पूर्ण करणे आणि सण साजरा करणे कठीण झाले आहे. वेळेवर वेतन मिळणे गरजेचे आहे. या मुद्द्याचे ☞(पान २ वर)

# दर्यापूरच्या प्रबोधन शाळेत विद्यार्थिनींच्या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल

## शिस्तीच्या कारणावरुन शिक्षा दिली - प्राचार्य

**शाळेच्या प्रगतीवरुन बदनामीचा दावा**



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील प्रबोधन शाळेतील शिक्षकाने विद्यार्थिनींना छडीने मारहाण केल्याचा व्हिडिओ सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. या व्हिडिओनंतर शाळेचे प्राचार्य नरेंद्र गोंडाणे यांनी आपली भूमिका स्पष्ट करीत संबंधित घटनेबाबत प्रतिक्रिया दिली.

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राहावी यासाठी शाळेकडून काही नियम व अटी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. या नियमांचे पालन करण्याच्या संदर्भात विद्यार्थिनींना शिस्त लावण्यासाठी शिक्षा देण्यात आली, असा दावा प्राचार्य नरेंद्र गोंडाने यांनी केला.

शाळेची विनाकारण बदनामी व्हावी, तसेच शाळेच्या प्रगतीला आळा निर्माण व्हावा या दृष्टिकोनातून हे प्रकरण पुढे आणण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, संबंधित शिक्षा ☞(पान २ वर)

# मजुरांची ट्रॅक्टर-ट्रॉली नाल्यात उलटली

## महिलेचा मृत्यू, दोघे जखमी

**धानोरा वाघोडा मार्गावरील अपघात**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मजुरांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर-ट्रॉली नाल्यात उलटल्याने एका महिलेचा मृत्यू झाला, तर महिला आणि पाच वर्षांचा मुलगा जखमी झाले. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धानोरा सिका ते वाघोडा मार्गावरील कच्च्या रस्त्यावर १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ही दुर्घटना घडली. या प्रकरणी ट्रॅक्टरचालक आणि मालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, ट्रॅक्टर क्रमांक एमएच २७ बीबी २२०६ आणि ट्रॉली क्रमांक एमएच २७-२०८५ मधून मजुरांची वाहतूक केली जात होती. चालकाने वाहन भरधाव आणि निष्काळजीपणे चालविल्याने ट्रॉली रस्त्यालगतच्या नाल्यात उलटल्याचा ☞(पान २ वर)

# ७ मेडिकलमधून विना बिल औषधांची विक्री

**-अन्न व औषध प्रशासन आणि टास्क फोर्सची कारवाई**



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स आणि अन्न व औषध प्रशासनाने सोमवार आणि मंगळवारी शहरातील विविध भागातील ७ मेडिकल दुकानांची अचानक तपासणी केली. या तपासणीत काही खास प्रकारच्या औषधांचा स्टॉक, विक्री रेकॉर्ड जुळत नसल्याचे आणि काही ठिकाणी विना बिल औषधांची विक्री करण्यात येत असल्याची माहिती उघडकीस आली आहे. यामुळे ☞(पान २ वर)

# हुंडा छळ प्रकरणातील आरोपींना अटकपूर्व जामीन

**ॲड. रुबीना शेख व ॲड. अर्चना पाटील यांचा यशस्वी युक्तिवाद**





**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक यास्मीन नगरातील हुंडा छळ प्रकरणातील चार आरोपींना न्यायाधीश रामटेके यांच्या न्यायालयाने अटकपूर्व जामीनावर मुक्त केले आहे. आरोपींमध्ये शेख राहील शेख शफीक, शेख शफीक शेख उस्मान, शेख शाहीद शेख शफीक आणि शमीना परवीन शेख शफीक यांचा समावेश आहे. आरोपींच्या वतीने ॲड.रुबीना शेख आणि ॲड.अर्चना पाटील यांनी यशस्वी युक्तिवाद केला. एफआयआर नुसार २१ वर्षीय विवाहितेने सर्व आरोपींविरुद्ध नागपुरी गेट ठाण्यात गुन्हा ☞(पान २ वर)

# पोलिस असल्याचे सांगून वृद्धाला गंडविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** पोलिस असल्याचे भासवून अज्ञात व्यक्तींनी ७४ वर्षीय वृद्धाला सुमारे २ लाख २५ हजार रुपयाने गंडविले. ही घटना सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोला रोडवर घडली. महेश तिवारी (वय ७४), रा. प्रोफेसर कॉलनी, बडनेरा, हे सोमवारी सकाळी अकोला मार्गावरील मंदिरात दर्शनासाठी जात होते. दरम्यान बडनेरा-अकोला टी-पॉइंटजवळ दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांना थांबविले. आपण पोलीस कर्मचारी असल्याचे सांगत त्यांनी पुढे धोका असल्याची बतावणी केली. सुरक्षेच्या कारणास्तव अंगावरील सोन्याचे दागिने काढून ठेवण्यास सांगितले. त्यांनी गळ्यातील सोनसाखळी आणि हातातील दोन सोन्याच्या अंगठ्या काढून दिल्या. त्यानंतर गाडीच्या डिक्कीत ☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यात महावितरणचे स्वतंत्र विभाग कार्यालय सुरू करा

**राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी ; उपकार्यकारी अभियंत्यांना निवेदन**



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील वाढती लोकसंख्या, कृषी क्षेत्राचा विस्तार आणि विज ग्राहकांच्या वाढत्या समस्या लक्षात घेता महावितरणचे स्वतंत्र विभाग कार्यालय दर्यापूर येथे सुरू करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार )दर्यापूर तालुकाध्यक्ष निलेश साहेबराव मोपारी यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन आज (दि.१३) महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता दर्यापूर यांना दिले आहे. दर्यापूर हा अमरावती जिल्ह्यातील महत्त्वाचा तालुका असून, येथे मोठ्या प्रमाणात ग्रामिण लोकवस्ती आणि शेती व्यवसायावर अवलंबून असलेली लोकसंख्या आहे. तालुक्यातील नागरिक, शेतकरी, व्यापारी ☞(पान २ वर)

# पाण्याशिवायच साईट पट्टीची मुरम दबाई

## चांदूरबाजार-बेलोरा रस्त्याच्या कामात ठेकेदाराचा मनमानी कारभार



**बेलोरा/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार तालुक्यातील बहिरम ते मोझरी दरम्यान सध्या कॉंक्रीटीकरण रस्त्याचे काम वेगाने सुरू आहे. या अंतर्गत चांदूरबाजार ते बेलोरा या मुख्य रस्त्याचे काम सुरू असून, या कामात ठेकेदाराकडून नियमांची उघडउघड पायमल्ली केली जात असल्याचे समोर आले आहे. रस्त्याच्या साईड पट्टीवर मुरूम टाकून त्यावर कोणत्याही प्रकारचे पाणी न मारता कोरडीच दबाई केली जात असल्याने कामाच्या गुणवत्तेवर ग्रामस्थांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार, रस्त्याच्या कडेला (साईड पट्टी) खोली करून त्यात मुरूम टाकल्यानंतर त्यावर योग्य प्रमाणात पाणी टाकून रोलरच्या साहाय्याने त्याची व्यवस्थित दबाई करणे बंधनकारक असते. यामुळे मुरूम योग्यरीत्या बसतो आणि रस्ता मजबूत होतो. मात्र, संबंधित ठेकेदार पाणी न टाकताच घाईघाईने मुरमाची दबाई करत आहे. यामुळे पावसाळ्यात किंवा वाहनांच्या वजनाने साईड पट्टी धसून मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्याच्या साईड ☞(पान २ वर)

नाग विदर्भ चरखा संघ मुल
द्वारा संचालित
खादी ग्रामोद्योग भांडार
गांधी चौक, अमरावती मो. ८१४९७५११५९
प. पुज्य म. गांधी जयंती निमित्य
२ ऑक्टोंबर पासून ४५ दिवसपर्यंत २०%
प्रमाणे सवलत सुरु राहील
खादी २०%
पॉलीवस्त्र २०%
रेशम २० %
उलन २०%